
# शब्द रुची

जानेवारी २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ७६





अध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे

## ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन



# ZEE मराठी नव्या वर्षात महामनोरंजनाचा धुमधडाका

**झी मराठी घेऊन येत आहे महामनोरंजनाचं वर्ष. दर्जेदार मनोरंजनाची ही परंपरा कायम ठेवत येणाऱ्या नव्या वर्षात झी मराठीने प्रेक्षकांसाठी खुला केला आहे निखळ मनोरंजनाचा खजिना!**



## रक्षण्या शिवछत्रपतींचे स्वराज्य, शंभुराजे होणार सज्ज

आप्त स्वकीयांची कुरघोडी, दुष्मनाची रोज नवी खेळी, निधड्या छातीवर संकटं झेलत उभा ठाकला आहे स्वराज्याचा छावा! छत्रपतींच्या सिंहासनावर संघर्षाची गादी, आता कशी फुंकली जाईल राज्याभिषेकाची तुतारी? 'स्वराज्य रक्षक संभाजी' सोम. ते शनि. रात्री 9 वाजता

**गाथा संघर्षाची, कथा शौर्याची**

## भव्य विवाहाची 'सरंजामशाही'



सुरु झाली आहे लगीनघाई, शाही विवाह सोहळ्याची झालीय जय्यत तयारी... लग्नानंतर कोणतं वळण घेईल ही लोकप्रिय प्रेमकहाणी? विक्रांतचा भूतकाळ ठरवेल का त्यांच्या संसाराची भविष्यवाणी? 'तुला पाहते रे' सोम. ते शनि. रात्री 8.30 वाजता

**अनपेक्षित वळण, धक्कादायक कारण**

## रात्रीस खेळ चाले 2

काय असेल भीतीचं नवं रूप? काय असेल वाड्यात दडलेलं नवं गूढ? नवीन पात्र पाहायला मिळतील की जुन्याच पात्रांची असेल नवीन गोष्ट? आता उलगडणार वाड्यातील रहस्यमय घटनांमागचं गूढ! सुरु होणार एक नवा रहस्यमय खेळ, 14 जानेवारीपासून सोम. ते शनि. रात्री 10.30 वाजता तीच वेळ, नवा खेळ

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जानेवारी २०१९, वर्ष सहावे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**



**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**


**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com


**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


**साहित्यसंमेलन विशेष**
अरुणाताई : एक मंत्राक्षर / ६
**गीतेश गजानन शिंदे**
**राजकवी भा.रा. तांबे यांचे पत्र / १०**

**गौरव**
डॉ. म.सु. पाटील यांच्या समीक्षादृष्टीचे विशेष / ११
**डॉ. प्रतिभा कणेकर**
सामाजिक प्रश्नांना भिडणाऱ्या कादंबऱ्या / १३
**डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**

**काव्यरंग – रमेश पानसे / १६**

**ऐसी अक्षरे**
अरुण साधू नावाच्या एका गूढाची दंतकथा / १७
**शब्दांकन : नीला उपाध्ये**
शब्दांची आनंदयात्रा / २४
'डॉ. विजया वाड यांच्याशी एक संवाद

**आपल्या मातीतला चित्रपट**
'अव्यक्तो' – अव्यक्त नात्याची गोष्ट / २७
**संतोष पाठारे**

**निमित्त**
भारतीय स्त्रियांच्या मुक्तिगाथेचा आरंभ सांगणारे नाटक /२९
**सुभाष थोरात**
हिंदू कोड बिलाचा इतिहास / ३२
**रेखा ठाकूर**

**प्रतिभेचे चांदणे**
'मर्डर इन द कॅथेड्रल' / ३५
**धनंजय गांगल**

एका वाचकाची जडणघडण – **ज्ञानेश्वर शेंडे** / ३८

बालवाचकदिन : अभिवाचन स्पर्धा – **चांगदेव काळे** / ४०

**'ग्रंथाली' ४४ वा चौरस वाचकदिन वृत्तांत / ४१**

**मराठीप्रेमी पालक महासंमेलन वृत्तांत / ४८**

**'ग्रंथाली' पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५९**

**मेहता पब्लिशिंग हाऊस ग्रंथपान / ७०**

ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ७१

## संपादकीय...

भिंतीवरले कॅलेंडर बदलले. २०१९ सुरू झाले. ''वर्ष किती भराभरा जातात ना? दिवस पाखरांसारखे उडून जातात. काही कळत नाही.'' दरवर्षीचे हे स्वगत आपण परत मनात म्हटले, जनातही म्हटले.

काळ हलकेच कूस बदलतो, काळ वाळूसारखा निसटतो, काळाचा हलता-झुलता पडदा सरकत राहतो, काळ बदलतो सतत नेपथ्य नि काळाच्या प्रत्येक तुकड्याचा अर्थ आपण शोधत राहतो. आजच्या काळाच्या पोटात काय दडलंय? कोलाहलाच्या टोकावर आज आपण उभे आहोत. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' तर कायमच, पण खऱ्याखोट्याच्या, विश्वास-अविश्वासाच्या, चूक-बरोबरच्या, सीमारेषा पुसून जाव्यात असा हा काळ. अनेक गोष्टींपासून तुटत चाललेल्या माणसाची, त्या धरून ठेवण्यासाठीची जीवतोड धडपड हे या काळाचे वैशिष्ट्य. आपण सभोवतालच्या माणसांपासून वेगळे पडतोय नि त्याचवेळी माणसांसोबत राहण्याकरता तगमगतोय अशी एक वेगळीच जाणीव हा काळ माणसाला करून देतोय.

आत्यंतिक कनेक्टेड राहता येईल असं 'मोबाईल' नामक साधन माणसाच्या हाती आलं आहे. अनेकांच्या दिवसाची सुरुवात मोबाईलवरच्या 'गुडमॉर्निंग' म्हणणाऱ्या रंगीबेरंगी फुलांनी होते. मोबाईलमुळे आपला कृतियुक्त प्रतिसाद आवरून धरण्याचा काळ जवळजवळ शून्यावर आला म्हणजे आनंद, दु:ख, राग, मत्सर, द्वेष सारंच तत्क्षणी व्यक्त करता यायला लागलं. मनातलं वैफल्य बाहेर काढण्याकरता मोबाईल मदतीला आला. माणूस समोर असला की समोरच्या माणसाला काही बोलताना किमान विचार केला जायचा. आता माणूस प्रत्यक्षात समोर नसल्याने प्रतिक्रिया व्यक्त करताना ती थेट दिली जाते. व्यक्त होण्याची इतकी घाई होते की या प्रक्रियेत क्रूरतेच्या कमाल पातळ्या माणूस ओलांडू लागतो. मोबाईलवरच्या गट संवादांमध्ये तर मानवी क्रूरतेचे आत्यंतिक दर्शन घडते. एखाद्याला एकटं पाडणं, कोंडीत पकडणं, दुर्लक्षित करणं हे गटसंवादांमध्ये हमखास घडतं. माणसं मर्यादा ओलांडून एकमेकांवर तुटून पडतात. त्यातून माणसांना वैफल्य येतं. वैफल्याचा हा एक नवा प्रकार! माणसांच्या सगळ्याच जाणिवा अलीकडे इतक्या टोकदार-धारदार झालेल्या दिसतात की त्यांत मानवी नात्यांमधली कोवळीक तुडवली जाते आहे. पायाखालची जमीन जणू नाहीच, सगळेच मानवी संबंध अधांतरी लटकल्यासारखे! यातून मानवी संबंधांना आज कृत्रिम रूप येत चालले आहे. सोयीसाठी ते जोपायसाचे नि जिथे कसलाही स्वार्थ साधला जात नाही तिथे ते क्षणार्धात तोडून टाकायचे.

कोणत्याही मानवी नात्यांमध्ये थोडातरी उजेड एकमेकांना देता यायला हवा. त्या उजेडात आयुष्य झळाळून उठेल असा एखादा तरी क्षण सापडायला हवा. ते होणार नसेल तर कृत्रिम नातेसंबंधांचे डोंगर कितीही रचले तरी काय उपयोग?

० ० ० ०

मानवी नातेसंबंधांच्या अराजकाच्या या काळात वृद्धांचा प्रश्न हा सर्वाधिक काळजीचा प्रश्न आहे. लहान बाळांना पाळणाघरात दिवसभर ठेवून घरी सायंकाळी परत आणलं जातं पण वृद्धाश्रमात पोहोचलेले वृद्ध घरात परत येण्याचं प्रमाण कमीच! वयोमानामुळे दुबळ्या झालेल्या या माणसांची मनं मुलामाणसांनी नाकारल्यावर अधिकच खचत जातात. घरातील वृद्धांचा सांभाळ हा मुद्दा अलीकडे फार बिकट होऊन बसला आहे. नोकरीकरता स्त्री-पुरुष दोघांनाही घराबाहेर पडावे लागल्यामुळे म्हाताऱ्या माणसांना कुलुपबंद ठेवायचे हे चित्र आज अनेक ठिकाणी दिसते आहे. चाळींमधली, झोपड्यांमधली दारं चोवीस तास बंद नसतात, तिथे माणसांना निदान एकाकी वाटत नाही पण उंच टॉवर्स आणि फ्लॅट संस्कृतीत वृद्धांचा एकटेपणा अंगावर काटा आणतो. दिवसाचे चोवीस तास टीव्हीचा हलता पडदा पाहात राहायचा, नाहीतर रोजचाच पेपर परत-परत वाचायचा हे रूटिन अनेक वृद्धांच्या वाट्याला आलं आहे. नोकरी-शिक्षण याकरता बाहेर पडलेली घरातली माणसं परतल्यावर त्यांच्या-त्यांच्या रूम्समध्ये शिरतात. ज्याला-त्याला घरात प्रायव्हसी हवी. (मोबाईलमुळे खाजगी काही राहिलं नाही असं म्हणतानाच घरातली प्रायव्हसी मात्र आटोकाट जपली जाते.) बंद फ्लॅट्समध्ये हे 'बंद रुम्सचं' परत आणखी एक जग! अशा वातावरणात वृद्धांचा जीव घुसमटला नाही तरच नवल! वयामुळे आलेलं परावलंबित्व त्यांना आगतिक करतं नि ही माणसं त्यांचं एकटेपण सोसत राहतात. अशावेळी जोडीदारही मृत्युमुळे दुरावला असेल तर त्या वृद्ध व्यक्तीचं एकटेपण केवळ सुन्न करणारं! पैसे कमवण्याचा ताण, महत्त्वाकांक्षा-अपयश यातून उभे राहणारे पेच, करिअरमधील तणाव या सर्वात घरातल्या वृद्धांना आपण अधिकाधिक एकटं करतोय का? मानवी नात्यांबाबत उभे राहणारे हे प्रश्न टाळता येण्याजोगे नाहीत.

अरुणा ढेरे यांच्या या ओळी हे वास्तव नेमकं उभं करतात.

'करकरत मिटले संवादाचे दरवाजे
तेव्हा ऊर फुटेपर्यंत हाका घातल्या
त्याही नाही कुठल्याच शुभेच्छेपर्यंत पोहचू शकल्या.'

एकमेकांपर्यंत आवाज पोहोचावा नि त्याने परस्परांना बळ मिळावं, या शुभकामनांसह २०१९ चं स्वागत करूया.

० ० ० ०

२४-२५ डिसेंबर रोजी 'ग्रंथाली'चा वाचकदिन साजरा झाला. दरवर्षीच नवनवीन कल्पना घेऊन 'ग्रंथाली' कार्यक्रम आयोजित करत असते. समाजात वाङ्मयीन पर्यावरण निर्माण व्हावे, या पर्यावरणातून साहित्य-संस्कृती-समाज यांच्याकडे पाहण्याची समज वृद्धिंगत व्हावी हा उद्देश अशा प्रकारच्या कार्यक्रमामागे असतो. त्याकडे संवेदनशीलपणे पाहणारा, अशा उपक्रमांचा भाग होणारा वाचकवर्ग समाजात तयार व्हायला हवा.

'ऑथर इज डेड'सारख्या रोलां बार्थच्या निबंधाने लेखकाकडे पहायची दृष्टी पूर्णपणे बदलली. लेखकाला प्रतिसृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव समजण्याची पारंपरिक धारणा लयाला जात चालली तसतसे वाचकाचे स्थान अधिकाधिक ठळक होऊ लागले. लेखकाच्या शब्दांमधल्या रिकाम्या जागांना अर्थ देणारा वाचक म्हणजे केवळ बघ्या नाही. सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारामधला तो सर्वाधिक सक्रिय घटक असायला हवा.

निखिलेश चित्रे यांचे 'आडवाटेची पुस्तकं' हाती आलं. त्यातल्या मनोगतातला हा भाग आवर्जून देते आहे.

'' 'मी का वाचतो?' या प्रश्नाचं प्राथमिक उत्तर आनंदासाठी असं देता येईल, पण वाचताना आणि वाचून झाल्यावर वाचकात अनेक सूक्ष्म बदल घडत असतात. पुस्तकं केवळ आनंदच देतात असं नाही. वेळप्रसंगी भक्कम आधारही देतात. निराशेच्या भोवऱ्यात अडकलेल्या वाचकाला ललित साहित्य मदतीचा उबदार हात देतं. इतर समानधर्मी वाचकांशी जोडत आपल्या आतलं आणि भोवतालचं जग अधिक समंजसपणे समजून घ्यायला शिकवतं. याचा अर्थ साहित्य म्हणजे मानसोपचार केंद्र किंवा व्यक्तिमत्त्व शिबिर आहे असा नाही. मात्र साहित्यातून जगण्याचं आकलन समृद्ध होत असल्यामुळे त्यात वाचकाला आतून बदलण्याची ताकद असते.''

आतून बदलण्याची गरज तर प्रत्येकालाच असते कारण मी परिपूर्ण आहे हा अहंकार कुणी कितीही मिरवला तरी तो खरा नाही. वाचनातून आतून बदलण्याची निकड जाणवत राहो आणि बदलण्याची दिशाही सापडो!

**- डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

॥ग्रंथाली॥


**आमची आई**

**किशोर कुळकर्णी**




**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

जळगावच्या किशोर कुळकर्णींचं 'आमची आई ' हे आई या विषयावरचं पुस्तक म्हणजे 'ग्रंथाली'नं साहित्य प्रकारात घातलेली मोलाची भर होय. जळगावच्या सामाजिक, औद्योगिक, राजकीय, साहित्यिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या नामांकित व्यक्तींनी त्यांच्या आईविषयीच्या आठवणी, त्यांना मिळालेले संस्कार इथे आहेत. या आठवणींचं, मातृस्मरण शब्दांकन म्हणजे हे पुस्तक! **- सुधीर जोगळेकर**




**मु.पो. आई**

**संपादन**
**संदीप रामराव काळे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले की जाणवतं, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, न डगमगणारी, मुलांसाठी तगमगणारी, कधी हळवी, कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. ह्या पुस्तकाच्या बुद्धिजीवी संपादकांच्या हृदयातील हळवं संचित संकलनाच्या माध्यमातून वाचकांसमोर येतंय. हा ठेवा जपून ठेवण्यासारखा आहे. **- शरद पवार**

**९२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार नसल्याच्या बातम्या साहित्य वर्तुळातून येत होत्या. महामंडळाचा हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आणि ऐतिहासिक! अध्यक्षपदाच्या पूर्वीच्या निवडप्रक्रियेवर होणारी टिका आणि दरवर्षी होणारे नवे वाद यामुळे ही प्रक्रिया बदलावी असा सूर अनेक वर्षांपासून होताच. कारण त्यामुळे सारस्वतांना या उच्चपदासाठी राजकारण्यांना लाजवेल अशी कृत्य करण्यापासून सुटका मिळणार होती आणि योग्य अशा व्यक्तीची सन्मानाने या पदावर निवड होणार होती. यानिमित्तानं साहित्यातील काही महत्त्वपूर्ण नावं चर्चेत आली, आणि चर्चेअंती ज्येष्ठ साहित्यिका, कवयित्री, लेखिका, संशोधक, विदुषी डॉ. अरुणा ताई ढेरे यांचं नाव निश्चित झालं.**

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन

# ‘अरुणाताई : एक मंत्राक्षर’

**गीतेश गजानन शिंदे**

**अ**रुणाताईंची पहिली भेट कधी झाली असेल, तर अर्थातच त्यांच्या कवितेतून! ‘मंत्राक्षर’ हा त्यांचा कवितासंग्रह सर्वप्रथम माझ्या वाचनात आला, तो महाविद्यालयात असताना. कवितेतील त्या अनुभवांनी मी भारावून गेलो होतो. एका वेगळ्या जातकुळीची कविता माझ्यासमोर आली होती. कारण त्याआधी विंदा, पाडगावकर, सुर्वे, शांताबाई, इंदिरा संत, ग्रेस, ढसाळ, मर्ढेकर आणि समकालातील इतर महत्त्वाचे कवी आत मुरवून झाले होते. मंत्राक्षर नंतर अरुणाताईंचे आणखी काही संग्रह सापडतात का या शोधातून ‘निरंजन’ हा कवितासंग्रह हाती लागला आणि त्यातील काव्य उजेडाने मनातील स्निग्धपणा व्यापून टाकला. त्यांचा ‘प्रारंभ’ हा पहिला कवितासंग्रह शोधण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या प्रती शिल्लक नसल्याचे समजले. मग हाती लागलं ते ‘कृष्णकिनारा’. कुंती, राधा आणि द्रौपदी या कृष्णाच्या आयुष्यातील महत्त्वाच्या स्त्रिया किंवा या तीन फुलांना गुंफणारा दोरा म्हणजे कृष्ण. पुराणात ऐकलेली ही पात्र थेट भेटली ती अरुणा ताईंच्या लेखनातून. आपल्या कल्पनाशक्तीच्या, लालित्यपूर्ण लेखनाच्या जोरावर त्यांनी जो काळ रेखाटला तो महाभारतातला असला तरीही वर्तमानातही आपण या पात्रांच्या सुख-दुःखाशी समरस होतो.

मी, संकेत म्हात्रे आणि पंकज दळवी आमच्या कोलाज संस्थेद्वारे ‘क’ हा प्रयोग घेऊन आलो. एक अतिथी कवी आणि त्यांच्या ‘अनहर्ड’, ‘अनरेड’ कवितांसोबत त्या कवीचा लेखनप्रवास मुलाखतीतून उलगडायचा अशी रुपरेषा असलेला हा कार्यक्रम. पहिले दोन प्रयोग झाल्यावर मार्च महिन्यात महिला दिनाचे औचित्य साधून ‘क-विमुक्ता’च्या माध्यमातून इंदिरा संत, शांताबाईंनंतर समकालीन मराठी कवयित्रींचा काव्यप्रवास उलगडावा, त्यातील कंगोरे शोधावे असे ठरले. त्यासाठी शोध घेतला असता पहिले नाव समोर आले ते अरुणाताईंचेच. मग त्यांचा फोननंबर शोधला असता अरुणाताई बाहेरगावी गेल्याचे समजले. त्यानंतर त्यांचा मोबाईल नंबर मिळवून त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याशी सर्वप्रथम बोलणं झालं ते गेल्या फेब्रुवारीत. त्यावेळी त्या अनेक प्रकल्पात, कार्यक्रमांत व्यस्त असल्याचे समजले. पण त्यांना ‘क’ची कल्पना मनस्वी आवडल्याचे आणि भविष्यात नक्कीच तुम्हा तरुणांसोबत प्रयोग करण्यास आवडेल, असे त्यांनी सांगितले. त्या शब्दांनी फार हुरुप आला आणि असेही जाणवले की अरुणाताईंवर ‘क’चा एक विशेष प्रयोग करावा लागेल. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा एप्रिलमध्ये त्यांच्याशी संपर्क केला असता ताईंसोबत जूनमध्ये ‘क’चा प्रयोग निश्चित झाला. मग संकेतसोबत त्यांच्या ‘निरंजन’, ‘मंत्राक्षर’, ‘जावे जन्माकडे’, ‘निळ्या पारदर्शक अंधारात’ या कवितासंग्रहांची परायणं केली. अधनंमधनं फोनवर ताईंशी संवाद सुरू होताच पण संहिता लिहिण्याआधी आम्ही निवडलेल्या कवितांचा आराखडा अरुणाताईंना सांगण्यासाठी आणि त्यांच्या डायरीतील ‘अनरेड’ कविता ऐकण्यासाठी पुण्याला त्यांच्या घरी जाण्याचे ठरले. तो दिवस मला आजही आठवतो. दुपारी त्यांनी सागितलेल्या वेळी आम्ही त्यांच्या घरी पोहचलो तेव्हा ताई जवळच कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. मग तासभर त्यांच्या घरी मी आणि संकेत एकमेकांना



त्यांच्या आवडलेल्या कविता ऐकवत होतो. जिना चढताना अरुणाताईंनी त्याचा कानोसा घेतला असावा आणि प्रसन्न मुद्रेने आत येत आम्ही म्हणत असलेल्या कवितेची पुढची ओळ म्हटली. त्यांना प्रत्यक्ष भेटायची ती पहिलीच वेळ. त्यानंतर सलग पाच तास मंतरलेले गेले. त्यांच्या आम्हाला भावलेल्या कविता आम्ही सादर करून दाखवत होतो. ताई मोठ्या उत्सुकतेने हे सर्व टिपून घेत होत्या, जणू त्यावेळी त्या आमच्याच वयाच्या झाल्या होत्या. त्यांच्या डायरीतून बऱ्याच कविता ऐकण्याचं, त्यांच्या हस्ताक्षरावरून हात फिरवण्याचं भाग्य आम्हाला मिळालं. सोबत त्या आई-अण्णांच्या आठवणी सांगत होत्या. त्यांची एक ओळ मनावर विशेष कोरली गेली ती म्हणजे, 'घरी अभाव इतके होते की कशाचंच काही वाटायचं नाही. त्या सर्वांची उणीव भरून काढली ती माणसांच्या आणि पुस्तकांच्या श्रीमंतीने. पुस्तकंच जणू आमच्या घराच्या भिंती आहेत असं वाटायचं आणि मी अभिमानाने सांगायचे की मी पुस्तकांच्या घरात राहते.'



पुस्तकांवर मुलासारखं प्रेम करणाऱ्या इतिहासतज्ज्ञ, ज्येष्ठ संशोधक डॉ. श्री. रा. चिं. ढेरेंचा समृद्ध वारसा पुढे नेण्याचा किंबहुना तो वृद्धिंगत करण्याचा वसाच जणू अरुणाताईंनी घेतला. पुणे विद्यापीठातून बी.ए. आणि एम.ए. करत असताना प्रथम येत, सुवर्णपदकासह वीसहून अधिक पारितोषिके, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथा-कादंबऱ्यांचा आदिबंधात्मक अभ्यास' या विषयात पीएचडी ही शैक्षणिक पात्रता एकीकडे तर दुसऱ्या बाजूस त्यांच्या सृजनशील जाणिवेतून निर्माण झालेलं चौफेर साहित्य या सर्वांचा प्रभाव माझ्यावर होताच, पण ताईंच्या मितभाषी स्वभावामुळे संवादामध्ये दडपण मात्र जाणवलं नाही. उलटपक्षी अनेक किस्से सांगत त्यांनी वातावरण फार खेळीमेळीचं केलं. त्यांचे वडील म्हणजेच अण्णा दर वाढदिवसाला त्यांना पुस्तकच भेट म्हणून द्यायचे. घरी लोकसाहित्याचं, इतिहासाचं वातावरण असलं तरी अण्णांनी त्यांच्यासाठी सर्व कवाडं खुली केली होती. लोकसाहित्यातले वेचे अण्णा त्यांना वाचून दाखवत असत पण त्याचबरोबर आधुनिक कविताही वाचली पाहिजे म्हणून ते सजग असत. त्यामुळेच विंदा, इंदिरा संत, बापट यांच्या जोडीने ग्रेसही वाचले. तसेच नामदेव ढसाळ, दया पवार हे कवीही तितक्याच आत्मीयतेने अभ्यासल्याचे ताई सांगत होत्या. त्यांच्या बोलण्यातून एक काळ जिवंत होत होता. या संवादातून अनेक साहित्यिक, कवी त्यांच्याशी असलेलं नातं उलगडून सांगत होत्या. ईमेल, वॉटस ॲपच्या जगातील पत्रसंवाद न अनुभवलेल्या आमच्या पिढीला इंदिरा संत, शांताबाई, ग्रेस, जी.ए., सुनिताबाईंनी लिहिलेली पत्र त्यांच्या तोंडून ऐकणं म्हणजे आमच्यासाठी खजिनाच होता. आमच्या आग्रहाखातर 'क'मध्ये सुनिताबाईंनी अरुणाताईंना लिहिलेला पत्रसंवादही उलगडून सांगितला. 'तुझी कविता ही बावनकशी सोन्यासारखी आहे म्हणून तुला भेट म्हणून हे सोन्याचं वळं' हे सुनिताबाईंचं पत्रातील वाक्य सांगताना ताईंच्या डोळ्यांतील कृतज्ञता अश्रूंतून उभी राहिली होती. तर शांताबाई वयाने मोठ्या असल्या तरी त्यांच्यातील मैत्रीपूर्ण नातं इतकं घट्ट होतं की पहिल्या कवितासंग्रहासाठी कवितांची निवड असो वा त्यासाठीचा पाठपुरावा हे सारं या नात्यातूनच घडलं. ही आठवण साहित्यातील सकस वातावरण अधोरेखित करणारी होती. 'प्रारंभ' आणि 'यक्षरात्र' हे कवितासंग्रह आऊट ऑफ प्रिंट असल्याने अभ्यासता आले नसल्याचे समजताच ताईंनी त्यांच्याकडील बाईंड केलेली या कवितासंग्रहांची शेवटची प्रत मोठ्या विश्वासाने मला दिली. शेवटी पाच तासांच्या दीर्घ चर्चेनंतर आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो तेव्हा मी आणि संकेत दोघेही भारावलेल्या मन:स्थितीत होतो.

परतल्यावर त्यांच्या 'प्रारंभ' आणि 'यक्षरात्र' काव्यसंग्रहाचे वाचन सुरू केले. ऊन्हं तापत होती, मे महिन्याचा रुक्षपणा शिगेला पोहचला होता आणि मनात पावसासाठी साकडं सुरू होतं. त्याच दरम्यान 'प्रारंभ' कवितासंग्रहातील 'आषाढाचे कृष्ण मेघ' या कवितेपाशी नकळत थांबलो. शब्दांसोबत अलवारपणे सूर काळजात निनादले आणि आपसूकपणे मी गाऊ लागलो. सुचलेला तो मुखडा फोनमध्ये लगेच रेकॉर्ड केला आणि कविता पुढे वाचू लागलो तर काही मिनिटातच अंतऱ्यासकट संपूर्ण चाल लागली होती. हा अनुभव माझ्यासाठी विलक्षण होता. पावसाच्या आगमनासाठी आसुलेल्या माझ्या मनाला अरुणाताईंच्या शब्दांची साथ लाभली होती आणि त्यातूनच सुचलेली चाल पुढे तीन-चार दिवस घोळवत राहिलो. मग पुन्हा स्क्रिप्टींगच्या, तालमीच्या वेळी दोघाही मित्रांना ती ऐकवली आणि अरुणाताईंची परवानगी असेल तर कार्यक्रमात ती कविता गायचा निर्णय ठरला. मग कार्यक्रमाच्या आठवडाभर आधी अंतिम स्क्रिप्ट आणि आम्ही बसवलेल्या कार्यक्रमाची तयारी दाखवण्यासाठी ताईंची मुंबईत भेट झाली, तेव्हा मी ते गीत त्यांना ऐकवलं. लागलीच त्यांनी चाल आवडल्याचं आनंदानं सांगितलं. कार्यक्रमातून जेव्हा मी ते सादर केलं तेव्हा श्रोत्यांचा प्रतिसाद पाहून ताईंनी, 'बघतोस ना किती दाद मिळतेय ते' हे कौतुकाने म्हटलेलं वाक्य आजही कानात साठलंय. परिसस्पर्श म्हणजे तरी दुसरं काय?

'क' ह्या कार्यक्रमातून आम्ही लेखनप्रवासाविषयी आणि एकूणच साहित्यिक, सामाजिक जाणिवांविषयी ताईंना प्रश्न विचारले. ''चांगली कविता अंतर्मुख करणारी की टाळ्यांची दाद मिळवणारी?'' ह्या प्रश्नावर, ''चांगली कविता म्हणजे दोन शब्दांमधली जागा. कोणताही कवी त्याच्या मनातील अमूर्त भावांना कवितेतून उतरवू पाहतो. जो जास्तीत जास्त त्यात यशस्वी होतो त्याला कविता गवसते'' असे अरुणाताईंनी म्हटले. तर ''पुराणातील, लोकपरंपरेतील स्त्रियांची सांगड एकविसाव्या शतकातील स्त्रियांशी घालणं तितकंसं साजेसं आहे का?'' या प्रश्नाला उत्तर म्हणून अरुणाताईंनी त्यामागची भूमिका स्पष्ट करत 'जनी रंगमहाली विठूच्या' आणि 'राधेवरील कविता' सादर केल्या. या कवितांमागची



**'क'च्या कार्यक्रमास संकेत म्हात्रे, अरुणा ढेरे, पंकज दळवी आणि गीतेश शिंदे**

पार्श्वभूमी कथित करून आजची स्त्री जरी मुक्त असली तरी तिच्या पायात अजूनही बेड्या असल्याचे सांगितले. एका प्रवासात ताई त्यांच्या दोन मैत्रिणींसोबत असतानाचा किस्सा सांगितला. एक खेडूत बाई जिने डोक्यावरून पदर घेतला होता आणि ती आपल्या नवऱ्याच्या धाकात असल्यासारखी वाटत होती. आम्हा तिघा मैत्रिणींच्या गप्पा ऐकून तिने न राहवून विचारलं, 'आप घुमने जा रही हो?' यावर होकारार्थी उत्तर मिळाल्यावर लगेचच तिने आश्चर्याने म्हटलं, 'अकेले!' सोबत पुरुष नाही म्हणून ती खेडूत स्त्री अस्वस्थ झाली होती आणि तिने विचारलं, ''मरदने छोडा क्या?'' या प्रश्नाशी थांबायला झालं. खरं म्हणजे स्त्रीलाच बंधनाची सवय झालीय की काय? असं वाटू लागलं.

तुमची कविता बाईपणाबद्दल जरी असली तरी तिने फेमिनिझमचे उसने अवसान घेतलेले नाही आणि त्यात पुरुषांबद्दलची आक्रस्ताळी चीडही नाही या प्रश्नावर ताई म्हणाल्या की 'आजवर पुरुषाकडे फक्त एकाच मानसिकतेतून पाहण्यात आले असून वेग वेगळ्या टप्प्यांवर भेटणारा पुरुष हा बाईच्या घडणीसाठी तितकाच महत्त्वाचा आहे. आपल्याकडे स्त्री आणि पुरुष यांच्यात नवरा-बायको हेच नातं पराकोटीचं समजलं जातं. स्त्री-पुरुष नात्याला लैंगिकता जोडण्यात येते, पण नवऱ्यापलिकडेही पुरुष हा बाप असतो, भाऊ असतो, मुलगा असतो, कधी प्रियकर असतो तर कधी सखा असतो. त्यामुळे त्याच्या भोगाचा जसा विचार केला जातो त्याचप्रमाणे त्याच्या त्यागाचाही विचार व्हायला हवा. यालाच जोडून त्यांनी सादर केलेल्या 'पुरुष असाही असतो राधे' या कृष्ण व अनयावरील दोन कवितांनी रसिकांना अंतर्मुख केले. कार्यक्रमातून त्यांनी लोकसाहित्याचे संदर्भ देत या विषयाचे कंगोरे तर उलगडलेच पण विविध आकृतिबंधातील कविताही सादर केल्या. 'क'सारख्या प्रयोगशील काव्यचळवळीतून एका कवीला सलग ऐकता येतं, रसिकांना त्याच्याशी संवाद साधता येतो. जे पंचवीस-तीस कवींच्या मंचीय गर्दीतून साधता येत नाही, तो काव्यानुभव अशा मैफिलीतून टिपता येतो त्यामुळे मी कविसंमेलनांना शक्यतोवर जात नाही असेही सांगितले. एकूणच समृद्ध करणारा तो दोन तासांचा कार्यक्रम संपूच नये असं आम्हासोबतच रसिकांनाही वाटत होतं, कारण बाहेर जोरदार पाऊस सुरु असतानाही सभागृह हाऊसफुल्ल झाले होते ते फक्त ताईंचे विचार ऐकण्यासाठी!

त्यानंतर ताईंशी अधनंमधनं फोनवर बोलणं व्हायचं. 'अधोरेखित' दिवाळी अंकाच्या कविता विभागाचे संपादन करताना मी त्यांना कविता देण्यासंदर्भात फोन केला तेव्हा त्यांनी प्रांजळपणे गेल्या दीड वर्षात एकही कविता न लिहिल्याचे आणि सर्वच कविता छापून आल्याचे सांगितले. मी करत असलेल्या नव्या उपक्रमास भरभरून आशीर्वाद तर दिलेच पण 'भविष्यात एखादी कविता नक्कीच देईन' असं विश्वासाने म्हटले. त्यानंतर ताईंची भेट झाली ती थेट नोव्हेंबरमध्ये. अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर ठाणे ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने ताईंचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यानिमित्ताने पुन्हा एकदा ताईंच्या निवडक कविता सादर करण्याची जबाबदारी आम्हा तरुणांवर ग्रथालयाचे अध्यक्ष डॉ. विद्याधर वालावलकरांनी सोपवली होती. कमी कालावधीत हा कार्यक्रम बसवण्यात आला होता. सत्काराच्या दिवशी कॉनफरन्स रूममध्ये आम्ही तालीम करत होतो आणि नेमकं मी कविता म्हणत असतानाच ताई आत आल्या. सर्वजण उठून उभे राहिले तेव्हा त्या संकोचाने म्हणाल्या, ''अहो, कशाला उठताहात, चालू दे तुमची तालीम.'' त्यांनंतर पुन्हा ती खोली ताईंच्या सात्विक भावांनी, बोलण्याने भारून गेल्याचा अनुभव मिळाला. आणखी एक गोष्ट यालाच जोडून नमूद करावीशी वाटते. ताईंच्या एका अंभगात 'घर लावण्याचे' अशी ओळ आहे. तालमीच्या वेळी सादर करणाऱ्या व्यक्तीने 'घर लावणे' या प्रतिमेऐवजी 'लावण्याचे' असे म्हणून याला 'स्त्री लावण्याशी' जोडले. मला ते खटकत असल्याचे आणि हा चुकीचा अर्थ घेतल्याचे मी सांगितले. तालमीत त्यावर चर्चाही झाली. मी माझ्या मतावर ठाम होतो, परंतु अखेर संपूर्ण अभंगाचा शब्दश: विचार करून कार्यक्रमात स्त्री लावण्याच्या संदर्भातच ती ओळ वाचण्यात आली तेव्हा अरुणाताईंच्या चेहऱ्यावरचे भाव झपाट्याने बदलले. इतके की तो अभंग सादर करणाऱ्या गायिकेच्या ते लक्षात आल्याने पुन्हा दुरुस्त करून तिने ती ओळ अचूक म्हटली, तेव्हा समाधानाचं हसू त्यांच्या चेहऱ्यावर उमटलं होतं. आपल्या कवितेकडे तटस्थपणे पण तितक्याच सजगतेने पाहणाऱ्या ताईंची ओळख नव्याने या प्रसंगातून होत होती. सहा कवितासंग्रह आणि इतर प्रकाशित-अप्रकाशित कविता धरून सात-आठशे कविता तरी त्यांनी आजवर लिहिल्या असतील, पण त्यातील एका कवितेतील अभंगाच्या एका पदावरही त्यांचं इतकं बारीक लक्ष होतं. यातून आपली कविता आत किती मुरवावी लागते हेच दिसून येतं. नकळतपणे त्यांच्या नुसत्या सहवासातून मला हे सर्व सापडत होतं.

मागच्या दोन दशकांपासून आपल्या कवितांमधून आपल्या लेखनसामर्थ्याच्या खुणा अरुणाताईंनी रसिकांच्या प्रत्ययास आणून दिल्या आहेत. या दशकामध्येही त्यांचा लेखनप्रवास झपाट्याने आणि विविध अंगांनी वाढतोय. आज त्यांच्या नावावर कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, समीक्षात्मक लेखसंग्रह, ललितलेखसंग्रह, बालवाङ्मय अशा विविध प्रकारांमधील सुमारे ५० पुस्तके जमा आहेत. राज्यपुरस्कारांसह इतर अनेक प्रतिष्ठित साहित्य पुरस्कारांनी त्यांचे लेखन सन्मानित केले गेलेले आहे. 'प्रारंभ' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह १९८६ ला प्रकाशित झाला. त्यातील कविता वाचताना तुमच्या लक्षात येईल की त्या चढत्या क्रमाने तुमच्या

मनाचा ठाव घेतात. त्यानंतर 'यक्षरात्र', 'मंत्राक्षर', 'निरंजन', 'पानावरचे थेंब', 'जावे जन्माकडे' असे विविध टप्प्यांवर आलेले कवितासंग्रह असोत वा 'मराठी प्रेमकविता' हे शांताबाई शेळके यांच्याबरोबरचे संपादन, 'कवितेच्या शोधात' सारखा कवितांचा आस्वाद घेणारा लेखसंग्रह अशा लेखनातून कवितांबरोबरची त्यांची बांधीलकी जशी समजते त्याप्रमाणेच कवयित्री म्हणून होत गेलेला त्यांचा विकासही लक्षात येतो. लोकसाहित्य, लोकपरंपरा आणि प्राचीन मराठीशी घरामध्ये वडिलांच्या निमित्ताने सतत संबंध येत होता. निरनिराळ्या अभ्यासकांचे त्यांच्या घरात येणे-जाणे, होणाऱ्या चर्चा, पुण्यासारख्या ज्ञानपंढरीत वास्तव्य या साऱ्या गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीत कळत-नकळत हातभार लागला होता, पण त्याहीपेक्षा त्यांचं व्यक्तिमत्त्व घडण्यात त्यांची स्वत:ची डोळस श्रध्दा, कानावर पडेल ते टिपून घेण्याची जागरूकता, अभ्यासाने अलक्षित क्षेत्रांचा धांडोळा घेण्याची वृत्ती आणि परिश्रम, चिकाटी व गतिपूर्ण सातत्य या वैशिष्ट्यांचाही मोठा वाटा आहे. त्यांच्या सर्वच लेखनातून अगदी झट्कन लक्षात येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी साकारलेली विविध स्त्री रूपं. 'स्त्री आणि तिचे भावजीवन' हा त्यांच्या सर्वच लेखनाचा केंद्रबिंदू आहे. स्त्रीच्या जीवनातील विविध अवस्था, तिची मानसिक आंदोलने, तिने जोडलेले, तिच्याशी जोडले गेलेले भिन्नस्तरीय नातेसंबंध या सर्वांचे चित्रण त्या मोठ्या ताकदीने करतात. उदाहरणच द्यायचं झालं तर, झोक्यावर झुलणाऱ्या, रानात फुले वेचू पाहणाऱ्या छोट्या मुलीपासून ते नवथर प्रेमामध्ये न्हाऊन निघणाऱ्या प्रेमिकेपर्यंतची सर्व रुपं आपल्याला त्यांच्या कवितेत गवसतात. त्याचबरोबर संथ, संयत प्रेमाचा आविष्कार करणारी समंजस प्रेमिकाही भेटते. 'तो' आणि 'ती' यांचे जुळत जाणारे नाजूक भावबंध, एकमेकांमधले गुरफटणे, छोट्या-छोट्या गोष्टींवरून होणारे रुसवे-फुगवे, त्यातील ताणतणाव, एकमेकांविषयीची ओढ या साऱ्यांचे मोठे उत्कट चित्रण त्यांच्या सुरुवातीच्या कवितांमध्ये दिसते. त्यांच्या कवितांचे वेगळेपण कशात आहे तर त्यांच्या अनुभवांची जी रचना त्या करतात, त्याचबरोबर त्या अनुभवांचं तीव्रपण त्यांच्या कवितांतून व्यक्त होतं आणि ते अधिक वेधक ठरतं. सामाजिक कविता असो वा प्रेमकविता त्यांचा अनुभव आपल्याही मनात अगदी खोलवर रुजत जातो. त्याचबरोबर त्यांचं संस्कारित, मृदू, उत्कट मन हेही आपल्याला तितकच मोहवत राहतं.

शब्द, कविता, कवितेची निर्मिती या साऱ्यांशी अरुणाताईंचं फार खोलवरचं नातं आहे. कविता ही त्यांच्या अवघ्या अस्तित्वालाच व्यापून राहिली आहे. त्यांच्या कविता वाचताना असं लक्षात येतं की कवितेशिवाय जगणं त्यांना अशक्य आहे म्हणूनच संशोधनाच्या क्षेत्रात खोलवर रूजलेल्या असूनही त्यांना स्वत:ची ओळख कवयित्री म्हणून करून दिलेली त्यांना फार आवडते. कारण तो त्यांचा अंतस्थ स्वर आहे. स्त्री, भूमी आणि सर्जनशीलता यांचं नातं सनातन; तसंच स्त्रीहृदयाला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना, तिचे शारीर कष्ट, तिचे भोग हेही सनातनच! त्यांचा आविष्कार अरुणा ढेरेंच्या कवितेत झाला नसता तरच नवल. सर्वच स्त्री लेखिकांप्रमाणे 'स्त्री' मध्यवर्ती असली तरीही त्यांच्या कवितांमधून कुठेही स्त्रीमुक्तीचा आक्रमक आविष्कार किंवा बेगडी आक्रोश मुळीच दिसत नाही. लोकसाहित्य, लोकसंस्कृती यांच्या अभ्यासाचा परिणाम म्हणा किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असणारा समजूतदारपणा म्हणा, स्त्रीच्या या सनातन व्यथेकडे बघण्याची त्यांची भूमिका समजूतदार, समंजस अशी आहे. कणव, सह-अनुभूती तर आहेच पण त्यापलिकडे जाऊन एक वेगळ्या प्रकारचा शहाणा स्वीकारही आहे. त्यांचे सारे कवितासंग्रह कालानुक्रमाने पाहिले तर आरंभीच्या कविता कुणाच्या तरी वैयक्तिक सुखदुःखांशी निगडित असलेल्या दिसतात, स्वानुभवाच्या अनेक छटा त्यात असाव्यात असे वाटत राहते, पण गेल्या दशकातील कवितांमध्ये मात्र त्या वैयक्तिकाकडून समाजाकडे वळल्यासारख्या दिसतात. स्वत:ला अलिप्त ठेवून स्त्रियांची मानसिकता व्यक्त करत असतानाही त्यांच्या कवितेचा अंत:स्वर समजुतीचा असतो. अरुणाताईंच्या कवितेत सामाजिकता क्वचितच आढळते हा आरोप समीक्षकांकडून केला जातो, परंतु त्या आपल्या कवितेतून कोणतही तात्कालिक विधान करत नाहीत. 'जनी', 'रुक्मिणी' या कविता वरवर स्त्री मनाचं दु:खं जरी मांडणाऱ्या वाटल्या तरी सामाजिक रचनेबद्दल, स्तराबद्दल आणि एकूणच समाजाच्या मानसिकतेबद्दलचा ऊहापोह या कवितांतून होतो. मूल्यांची पडझड होत असताना, संस्कृतीची अधोगती होत असताना त्यांच्या सुजाण, संवेदनशील मनाची तडफड होणं स्वाभाविक आहे. किंबहुना हे वास्तव आपण बदलू शकत नाही, उघड्या डोळ्यांनी हा मूल्य ऱ्हास पाहावा लागतो याची अगतिक चीडही त्यांच्या लेखनात आढळते. एकूणच अरुणाताईंच्या कवितांचा विचार करता चित्रकाराप्रमाणे उजळ रंगांचा वापर आणि कुंचल्याच्या फटकाऱ्याप्रमाणे कमी शब्दांत नेमकं चित्र उभं करण्याची हातोटी दिसून येते.

शेवटी काळ हा सर्वांत मोठा समीक्षक असल्याचे म्हटले जाते. अरुणाताईंचं लेखन गेले तीन दशकं रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवतंय यावरून काळाच्या कसोटीवर ते नक्कीच तावूनसुलाखून निघालेलं आहे असं म्हणता येईल. आता साहित्यरसिकांना वेध लागलेत ते ९२व्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून होणाऱ्या डॉ. अरुणा ढेरे यांच्या अध्यक्षीय भाषणाचे, पण जरी अध्यक्षपदाची ही माळ त्यांच्या गळ्यात सन्मानाने पडलेली असली तरी संमेलनाचा धुरळा एकदा खाली बसल्यावर पुन्हा एकदा अरुणाताई आपल्या संशोधनात, लेखनात आणि कवितेत गढून जाणार आहेत याची खात्री वाटते कारण त्या अशा कोणत्याच मान-सन्मानाला भुलणाऱ्या किंवा त्यावर संतुष्ट होणाऱ्यांपैकी नाहीत. खरं सांगायचं तर त्यांच्या लेखनाचे अजून अनेक कप्पे आपल्याला शोधायचेत. त्याला अनेक दारं आहेत. अगदी त्यांच्याच कवितेत सांगायचं तर,

खूप दारं आहेत या कवितेत लपलेली
आणि तुम्हाला ती शोधून काढायचा खेळ खेळायचाय...

**– गीतेश गजानन शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६
geeteshshinde@gmail.com

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन



**राजकवी भा. रा. तांबे यांनी ग्वाल्हेरहून लिहिलेले हे पत्र. ते दिनांक १६-७-१९३५ रोजी काळ्या शाईत लिहिलेले आहे. १९८१-८२च्या सुमारास ज्येष्ठ संपादक हरिभाऊ मोटे यांनी ते राम देशपांडे यांच्या हस्ताक्षर संग्रहासाठी उपलब्ध करून दिले आहे. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या संदर्भात ते अतिशय बोलके आहे.**




फाळक्यांचे घर
लष्कर (ग्वाल्हेर)
१६-७-३५


सप्रेम सा.न.वि.वि.

आपले ता. ११ चे पत्र पोहोचले. आपण मजवर प्रेम करिता व माझ्या लेखांची कदर करिता म्हणून प्रतिभेची सेवा करायची मला इच्छा होते, अशी परस्परांच्या ऋणानुबंधाची गोष्ट आहे. कोणी कोणाचे ऋणी असावयाचे? मी यशवंतराव व 'बी' यांचे लेख वाचले. आपण म्हणता त्याप्रमाणे ते बोधप्रद होतील असे मलाही वाटते. असा एखादा लेख मीही पाठवावा अशी आपली इच्छा आहे. सवडीप्रमाणे मी लेख लिहिण्याचा यत्न करीन, पण तूर्त माझी प्रकृती खोकल्याने अस्वस्थ असल्यामुळे वीस तारखेच्या आत हे कार्य होईल असे मला वाटत नाही. तथापि आपला शब्द वाया जाऊ नये एवढ्यासाठी मी आपल्याकडे अलिकडे लिहिलेली एक कविता पाठवित आहे. ती आपल्यास सव्वीस तारखेच्या प्रतिभेत छापता येईल आणि आपल्या इच्छेप्रमाणे नाहीतरी अल्पस्वल्प कशीतरी सेवा मुदतीच्या आत केल्याचे मला समाधान वाटेल.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची मला महत्त्वाकांक्षा वाटत नाही. आपण सर्व महाराष्ट्रीयांनी जो माझा आदर केला आहे आणि करीत आहा तो जन्मभर पुरेसा आहे. कसल्याही कीर्तीची अपेक्षा मी केली नाही. कोणाच्याही पुढेपुढे करून जनतेपुढे मिरविण्याची मी अपेक्षा केली नाही किंवा माझ्यात काही वैशिष्ट्य आहे अशी भावना मला स्पर्शिली नाही. मी कीर्तीचा भुकेला नाही. आपल्या खोलीत स्वस्थपणे बसून गाजावाजा न करिता शांतपणे आणि निर्वेधपणे जी अल्पस्वल्प तुटकीमोडकी सरस्वती सेवा हाताने घडेल, ती करावी इतकेच मी जाणतो. लोक त्याने चीज करितात, माझी पुस्तके मी विनंती न करिता, मला कसल्याही प्रकारचा त्रास न होऊ देता छापून काढतात, ही त्यांची थोरवी आहे व कृपा आहे. त्याचा अभिमान मला नको? संमेलनाला आवश्यक साधन म्हणून काही लेख लिहावयाचा असता तर मी परिश्रम करून वीस तारखेच्या आतही पाठविला असता. पण अध्यक्षपदाच्या उमेदवारीकरिता मला काही करावेसे वाटत नाही. यावेळी माझे नाव ठळकपणे जनतेपुढे यावा, ही आपली इच्छा मजवरील आपल्या प्रेमाची द्योतक आहे आणि तीबद्दल मी आपला आभारी आहे. अध्यक्षपद मजकडे चालूनच आले तर काय करावयाचे त्याचा मी विचार करीन, पण त्यासाठी यत्न करणे मला नको. कळावे. कृपया लोभ असावा.

आपला
भा.रा. तांबे

**राम देशपांडे यांच्या सौजन्याने उपलब्ध**



**आदिबंधात्मक समीक्षा, तृष्णेची स्त्री केंद्रियता, अस्तित्वप्रत्यय अशा अंगांनी नवा समीक्षाविचार मांडणारे मराठीतील ज्येष्ठ समीक्षक म.सु. पाटील यांना 'सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध' या पुस्तकासाठी साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाला. त्यांच्या समीक्षादृष्टीच्या काही विशेषांचा हा परामर्श...**






# डॉ. म.सु. पाटील यांच्या समीक्षादृष्टीचे विशेष

**डॉ. प्रतिभा कणेकर**

**डॉ.** म. सु. पाटील यांच्या 'सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध' ह्या ग्रंथाला नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्या ह्या ग्रंथनिर्मितीमागे निश्चितच त्यांना वाटणारे कविमनाविषयीचे कुतूहल आणि काव्यनिर्मितीविषयीची उत्सुकता ह्या प्रेरणा आहेत. प्रदीर्घकाळ ते ह्या विषयांचा अभ्यास करीत आले आहेत व त्याविषयी चिंतन करीत आले आहेत. ज्ञानेश्वरांपासून वसंत आबाजी डहाके यांच्यापर्यंतच्या विविध काळातील व विविध प्रकृती-प्रवृत्तींच्या कवींचे काव्य त्यांनी असोशीने वाचले आहे. कवीच्या काव्यनिर्मितीमागे असलेल्या प्रेरणा, कवीच्या काव्यात्म अनुभवाचे स्वरूप, कवीच्या संवेदनशीलतेचे विशेष, कवीने घेतलेला वास्तव जीवनातील अनुभव, काव्यानुभवात रुपांतरित होताना कवी अनुभवत असलेले सर्जनप्रक्रियेतील द्वंद्व या विषयांचे त्यांनी प्रस्तुत ग्रंथात विवेचन केले आहे. त्याचप्रमाणे गूढानुभव, स्वप्नानुभव व काव्यानुभव यांतील सीमारेषा व काव्यात्म अनुभवाला प्राप्त होणारी विश्वात्मकता यांचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे. एखादा अनुभव काव्यात्म होतो तेव्हा कोणत्या घटकांतून त्या अनुभवाला कवितेत सेंद्रिय रूप प्राप्त होते; अशा अनेक अंगांनी त्यांनी येथे कविमनाचा व त्याच्या सर्जनप्रेरणांचा शोध घेतला आहे. भारतीय साहित्यशास्त्र व भारतीय तत्त्वविचार, पाश्चात्य साहित्यविचार व पाश्चात्य सौंदर्यशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान अशा विविध ज्ञानशाखांचे त्यांनी उपयोजन केले आहे व आपले याविषयीचे आयुष्यभराचे चिंतन जणू 'कॅप्सुल'च्या रूपात वाचकाला दिले आहे. 'सर्जनप्रेरणा व कवित्वशोध' या त्यांच्या ग्रंथामागे त्यांचा अनेक वर्षांचा व्यासंग आहे त्याचप्रमाणे त्यांची व्यासंगातून तयार झालेली समीक्षादृष्टी आहे. प्रस्तुत लेखातून त्यांच्या समीक्षादृष्टीचे विशेष मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

डॉ. म. सु. पाटील लिहू लागले, त्या काळात मराठी साहित्यात शहरी-ग्रामीण भागातून कितीतरी नवे जीवनानुभव अनिवारपणे व्यक्त होऊ लागले होते. या नव्या साहित्यकृतींच्या अर्थांकनास, भारतीय साहित्यशास्त्रातील संज्ञा जशाच्या तशा उपयोजू पाहणाऱ्या काही समीक्षकांस जेव्हा ते शक्य झाले नाही तेव्हा त्यांना रसविचार अडगळीचा वाटू लागला, परंतु म. सुं. ना भारतीय साहित्यशास्त्र टाकाऊ वाटले नाही. किंबहुना भारतीय साहित्यशास्त्र हा त्यांच्या साहित्यविचाराचा व समीक्षेचा कणा राहिला. 'भारतीयांचा साहित्यविचार' या त्यांच्या ग्रंथातील त्यांचा 'भारतीयांची रूपकल्पना' हा निबंध म्हणजे भारतीय साहित्यशास्त्रातील रसविचाराला त्यांनी प्राप्त करून दिलेले नवे परिमाण आहे. येथे त्यांनी अभिनवगुप्तांचा आधार घेतला आहे. 'साधारणीभूत संवेदन म्हणजे रस' असे अभिनवगुप्त म्हणतात. रसिकाच्या आस्वादप्रक्रियेत त्याच्या मनात अनुरूप भाव निर्माण होण्यासाठी ते प्रथम निर्मात्याच्या मनात उद्भवावे लागतात. काव्यनिर्मितीच्या वेळी कवीचे जे अंत:स्फूर्त भाव असतात त्यांना पूर्वनिश्चित असे रूप नसते. प्रतिमांकित होत होतच ते रूपित होत जातात. युंगचे आदिबंध काय किंवा अभिनवगुप्तांचे स्थायीभाव काय, ती कार्यप्रेरित न झालेली शक्तिकेंद्रेच आहेत. सुझान लँगर यांना अभिप्रेत असलेले अनुभव हेच होत. या तिहींना रूपाशिवाय अर्थ नसतो. स्थायी भाव किंवा आदिबंध ह्या कवीच्या अनुभवाच्या आकलनाच्या व आविष्काराच्याही मुशी असतात. त्यांच्या आधारेच मानवाची प्राथमिक पातळीवरील रूपनिर्मिती होत असते. ती एकीकडे भाषिक असते तर दुसरीकडे घटनात्मक असते. आकलनाची मूस बदलली की वस्तू-घटना यांचे प्रतिभासही बदलतात. प्रतिभावंत कवी आकलनाच्या मुशीत युगजाणीव देखील ओतत असतो. 'अभिनवगुप्ताचा आस्वादविचार कवी-नट व रसिक यांना एकाच पातळीवर आणणारा आहे' ह्याचा आधार घेऊन म. सु. पाटील विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांना रूपाचे संघटक तत्त्व म्हणून मानतात; कारण त्यातूनच रसाभिव्यक्तिक्षम असे शब्दरूप तयार होत असते. रससूत्राकडे बघण्याची दृष्टी त्यांनी किंचित बदलली व भारतीय रसविचारात गर्भित असलेल्या रूपकल्पनेची

ते नीटस मांडणी करू शकले. स्वाभाविकच रसानुवर्ती असलेला भारतीयांचा औचित्यविचार, शब्दशक्तिविचार, वक्रोक्तिविचार, ध्वनिविचार व भावविचार हे साहित्यकृतीचा रूपबंध घडविणारे घटक म्हणून त्यांना महत्त्वपूर्ण वाटले.

साहित्यविचारात देशी-परदेशी असा भेद करणे त्यांना मानवत नाही. भारतीय साहित्यशास्त्र व पाश्चिमात्यांकडून आलेले नवनवे ज्ञानव्यूह यांतील अनुबंध त्यांनी अनेकदा दाखवून दिले आहेत. समीक्षेसाठी आवश्यक तेथे त्यांनी भारतीय व पाश्चिमात्य संमिश्र परिभाषिताचा वापर केला आहे. 'काव्याची चिन्हमीमांसा' या त्यांच्या 'कवितेचा रूपशोध' या पुस्तकात समाविष्ट झालेल्या लेखात त्यांनी 'काव्य ही एक चिन्हव्यवस्था आहे' या सूत्राधारे काव्यातील चिन्हांची स्वरूपवैशिष्ट्ये उलगडून दाखविली आहेत. त्यासाठी प्रामुख्याने याकोबसनचे भाषा संप्रेषणाचे प्रारूप व रशियन रूपवादातील संकल्पनांचे त्यांनी उपयोजन केले आहे. तरी आपल्या विषय विवेचनात ते स्पष्टपणे म्हणतात, ''आपला शब्दशक्तींचा विचार, किंवा मुख्यवृत्ती व अमुख्यवृत्ती यांचा विचार म्हणजे भाषिक चिन्हव्यवस्था व काव्यात्म चिन्हव्यवस्था यांचा अभ्यास आहे, असे प्रस्तुत अभ्यासकास वाटते.'' (कवितेचा रूपशोध, १९९९, पृ. ४६) त्यांची ही दृष्टी भारतीय व पाश्चिमात्य तौलनिक साहित्यशास्त्राची दिशा सूचित करते.

साहित्यसौंदर्याचा आस्वाद घेताना साहित्यकृतीकडे जाण्याच्या अनेक वाटा ते चोखाळतात. समीक्षा हे एक शास्त्र असेल परंतु एखाद्या साहित्यकृतीची प्रत्यक्ष समीक्षा करताना केवळ तार्किक दृष्टी उपयोगाची नसते. तेथे समीक्षकाकडे भावयित्री प्रतिभा असावी लागते. समीक्षा कलागुणांचे विवेचन करील परंतु समीक्षकाला एका विशिष्ट साहित्यकृतीत त्या कलागुणांनी काय साधले आहे ते सांगता आले पाहिजे असे त्यांना वाटते. अनेकदा म. सु. पाटील यांचे समीक्षालेख दीर्घ वाटतात. याचे कारण साहित्यकृतीची त्यांना आलेली प्रतीती अनेकपदरी असते. उदाहरणांची विपुलता असण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, आपला कुठलाही मुद्दा उदाहरणाशिवाय स्पष्ट होऊ शकत नाही अशी त्यांची धारणा आहे. काव्यसमीक्षेत ते अनेक उदाहरणे देत अभ्यासकासमोर काव्यसंहिता उभी करत जातात. कवीच्या काही अलक्षित रचनांकडे अभ्यासकाचे लक्ष वेधणे, एखादा तात्त्विक मुद्दा वाचकाच्या आकलनाच्या कक्षेत आणून देणे, याही गोष्टी ते देत असलेल्या उदाहरणांमधून साधत असतात. कवितेच्या शब्दरूपांमधून कवींच्या संज्ञाक्षेत्रात प्रवेश करावयाचा आणि कवितांमधील प्रतिमांचा अर्थ लावत, कवितांचे अर्थांकन करीत त्या वाचकाला प्रतिसाद देण्यास अनुकूल करावयाच्या ही त्यांची पद्धत आहे.

म. सु. पाटील यांची सर्वच समीक्षा पूर्णत: संहिताकेंद्री आहे. संहिताबाह्य घटकांना ते कधीही साहित्यिकतेचे मूल्यांकन करताना संहितेहून प्रभावी होऊ देत नाहीत. साहित्यकृती उलगडण्यासाठी आदिबंध, संज्ञामीमांसा, रूपवाद, संरचनावाद, कथनमीमांसा, शैलीविचार, भारतीय साहित्यशास्त्र, मार्क्सवाद अशा विविध साहित्यविचारधारांचे उपयोजन करीत साहित्यकृतीचे साहित्यशास्त्र मांडत जायचे व त्यांतून त्या साहित्यकृतीच्या मूल्यांकनाचा निकष घडवायचा; अशी त्यांची रीत आहे.

म. सु. पाटील समीक्षालेखन करीत असल्याच्या काळात लौकिकतावादी विचार समीक्षेत अधिक प्रभावी होता. 'सामाजिक जाणीव' हे साहित्याच्या पुरोगामित्वाचे लक्षण मानले जात होते; अशा काळात 'साहित्य म्हणजे रूपित आशय' अशा भूमिकेतून केवळ कळकळ, केवळ सहानुभूती, केवळ कर्तव्यभावना या गोष्टी सामाजिक जाणिवेच्या कवितेला जन्म देण्यास पुरेशा नसतात. सामाजिक जाणिवेचा उदय जगण्यावाढण्याच्या आणि संज्ञाविकासाच्या निकडीतून व्हावा लागतो (साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध, २००१, पृ. २५) असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले. याचा अर्थ, ते सामाजिक जाणिवेचे काव्यात्म जाणिवेत रूपांतर होणे, ही अट महत्त्वाची मानतात. व्यंजकता, अनेकार्थसूचकता, दुपदरीपणा वा अनेकपदरीपणा, रूपकात्मता इत्यादी नावांनी जे काव्यविशेष ओळखले जातात ते केवळ कलानिकष किंवा कलाविशेष नव्हेत. ते जीवनप्रेरणांशी व तत्संबंधी वास्तवाशी निगडित आहेत; ही त्यांची धारणा आहे.

१९७५ मध्ये देशात लादल्या गेलेल्या आणीबाणीनंतर कला व स्वातंत्र्य, कलावंताचे स्वातंत्र्य, सामाजिक बांधीलकी हे मुद्दे ऐरणीवर आले. त्या काळात त्यांनी मांडलेली भूमिका अशी आहे की, आपल्या कलाविषयक जाणिवांशी अव्यभिचारी निष्ठा ठेवून जीवनाचे चित्रण करता येणे हे कलावंताचे स्वातंत्र्य आहे. कलावंताचे स्वातंत्र्य त्यांनी नेहमी कलावंताच्या संज्ञाविकासाशी निगडित केले. एखाद्या कलाकृतीची महानता ठरविताना कलावंताच्या विशिष्ट विचाराच्या बांधिलकीचा निकष लावणे त्यांना मान्य नाही. 'बांधीलकी व वाङ्मयीन महात्मता' या निबंधात त्यांनी स्पष्ट केले आहे की, जी साहित्यकृती एक कलावस्तू म्हणून वाचकाच्या आस्वादप्रक्रियेत जितक्या अधिकाधिक सौंदर्यवस्तूंना जन्म देते त्यावर तिची वाङ्मयीन महात्मता अवलंबून असते. अशा साहित्यकृतींतून स्वत:च्या श्रेयाचा शोध घेता-घेता कलावंत दुसऱ्याचे हरपले श्रेय त्याला मिळवून देत असतो; या दृष्टिकोनातून ते कलावंताचे स्वातंत्र्य, कलावंताची बांधीलकी व साहित्यकृतीतील महानता यांचा अनुबंध लावतात.

डॉ. म. सु. पाटील यांनी नाटक, कथात्म साहित्य, आत्मचरित्र व सर्वाधिक प्रमाणात कवितेची जी प्रत्यक्ष समीक्षा केली तिच्यामागे त्यांची अशी विशिष्ट समीक्षादृष्टी उभी आहे. त्याच दृष्टिकोनातून त्यांनी देशीवाद वा दलित सौंदर्यशास्त्र याविषयीच्या आपल्या भूमिका मांडल्या आहेत. एकूणच साहित्यव्यवहाराकडे ते अतिशय गंभीरपणे पाहतात.

म. सु. पाटील यांचा साहित्यविचार व त्यांनी मराठी समीक्षेला दिलेला 'तृष्णामूलकतेचा सिद्धांत' याविषयी मराठीचे अभ्यासक त्यांचे नेहमीच ऋणी राहतील. 'म. सुं. चा साहित्यविचार' व त्यांचा 'तृष्णामूलकतेचा सिद्धांत' हे स्वतंत्र लेखांचे विषय आहेत.

**– डॉ. प्रतिभा कणेकर**
भ्रमणध्वनी : ९९२०८३३१४०

हिंदीतील ज्येष्ठ लेखिका चित्रा मुद्गल यांना त्यांच्या 'पोस्ट बॉक्स नं. २०३-नालासोपारा' या कांदबरीच्या लेखनाबद्दल 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार नुकताच जाहीर झाला. तृतीय पंथीयांची वेदना आणि वास्तव यावर ही कादंबरी प्रकाश टाकते. त्यांच्या कादंबरीविश्वाचा हा संक्षिप्त आढावा...



# सामाजिक प्रश्नांना भिडणाऱ्या कादंबऱ्या

**डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**

चित्रा मुद्गल आधुनिक हिंदी साहित्यातील श्रेष्ठ, संवेदनशील आणि बहुचर्चित लेखिका आहेत. त्या स्वत: सामाजिक चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या असल्यामुळे शोषित, दलित, पीडित समाजाशी त्यांचा जवळून संबंध आला आहे. स्त्रियांच्या समान हक्कांसाठी 'समन्वय' नावाची एक संख्या त्या चालवितात. समाजाच्या जडणघडणीत या चळवळींचा सहभाग असतो, अशी त्यांची धारणा आहे.

चित्रा मुद्गल यांचा जन्म १० डिसेंबर १९४४ रोजी चेन्नईमध्ये झाला. सोमैया कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांचा परिचय दत्ता सामंतांशी झाला. त्यांच्या प्रेरणेने त्या संघटित व असंघटित कामगार आंदोलनांमध्ये काम करू लागल्या. वीस वर्षांच्या असताना 'जागरण' संस्थेच्या त्या सचिव झाल्या. ही संस्था घरकाम करणाऱ्या बायकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष करीत होती.

सन १९६४ पासून त्यांच्या लेखनाची सुरुवात झाली. तेरा कथासंग्रह, चार कादंबऱ्या, तीन बाल कांदबऱ्या, चार बालकथासंग्रह आणि पाच संपादित पुस्तके इतका मोठा त्यांचा साहित्यसंसार आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्या विविध पुरस्कारांनी सन्मानित झाल्या आहेत.

१) 'एक जमीन अपनी' या कादंबरीला फणीश्वरनाथ रेणू पुरस्कार, २) 'आवा' कादंबरीला २००० सालचा 'साउथ एशियन कथा ग्रुप, लंडन येथून दिला जाणारा 'इंदू शर्मा कथा सन्मान', २००० सालचा हिंदी अकादमीचा 'साहित्यकृती' पुरस्कार, मध्यप्रदेशचा 'वीर सिंग देव' पुरस्कार आणि उत्तर प्रदेशचा 'साहित्यभूषण सन्मान', ३) 'गिली गड्डू' कादंबरीला - 'रत्नीदेवी गोएंका' पुरस्कार, मुंबई, चक्रधर पुरस्कार मध्यप्रदेश, ४) आणि आता 'पोस्ट बॉक्स नं २०३ नालासोपारा' कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

स्त्रीवादाबद्दलची त्यांची मतं स्पष्ट आणि प्रखर आहेत. त्यांचं म्हणणं आहे की स्त्री आपलं ध्येय गाठण्याचा मार्ग स्वत: शोधू शकते. म्हणूनच स्त्रीने पाय खेचणारे विचार दूर सारून पुढे झेप घ्यायला हवी.

'लिव्ह-इन-रिलेशनशिप'बद्दल बोलताना त्या म्हणाल्या, स्त्रीस्वातंत्र्याला माझा पाठिंबा आहे परंतु आपल्या देशात सुरक्षित वातावरण होईपर्यंत मुलींना संयमाने राहायला हवं. या नात्यात त्यांना जर फसवलं गेलं तर कायदाही त्यांना फार मदत करू शकत नाही. समाज तर नाकारतो. त्यामुळे समाजाचा पूर्ण पाठिंबा हवा.

चित्रा यांची पहिली कादंबरी 'एक जमीन अपनी'. (ही भूमी माझी) या कादंबरीची नायिका 'अंकिता' सुशिक्षित व स्वावलंबी आहे. स्वत:चे निर्णय घेण्याची क्षमता तिच्यात आहे म्हणूनच निर्णयामुळे होणारा त्रास ती सहन करते परंतु निर्णय बदलत नाही. घरच्यांचा विरोध पत्करून सुधाशूंबरोबर लग्न करते. परंतु तिचे विचार आणि लेखनस्वातंत्र्याची गळचेपी होऊ लागल्यावर सगळं वातावरण बिनसतं. मग प्रेम, सौहार्द्र आणि एकमेकांबद्दलचा आदरही संपतो व तिथे राहण्यात काहीच अर्थ राहात नाही. सगळं सोडून ती पुन्हा आईकडे परत आली. आई खूप गंभीर व कठोर होती. तिने तिला पदराखाली घेतलं. भाऊ-भावजयीनेसुद्धा समजून घेतलं.

'अंकिता', 'नीता' आणि 'मेहता' या तीन पात्रांभोवती कादंबरी बांधली आहे. तिघांची खूप मोठी ट्रॅजेडी आहे. अंकिताच्या मनात स्त्रीबद्दल अपार आस्था आहे. कोणीही तिची कुचेष्टा करावी हे तिला सहन होत नाही. घटस्फोटित स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन स्त्री असो वा पुरुष, स्वच्छ नसतो. तिला अपमानित केलं जातं, चारित्र्यहीन ठरवलं जातं. समाजातील अशा लहान-लहान गोष्टींमधले ताण चित्रा सूक्ष्मपणे व्यक्त करतात. सुधाशूंचा मित्र हरिंद्र तिला घर-नोकरी शोधायला मदत करतो. तिच्या बुद्धिमत्तेचं कौतुक करतो, परंतु तिने त्याच्यासारखं पत्रकार व्हावं, त्याच्या मते जाहिरात क्षेत्रातील कॉपीरायटरचं काम प्रतिष्ठेचं नव्हे.

सगळीच पात्र वेगळ्या प्रकारे स्वाभिमानी, कर्तबगार असल्यामुळे काहीशी आत्ममग्न आहेत. साहजिकच पात्रांचा परस्परांशी असलेला

संवाद कधी-कधी कठोर वाटतो. उदा. नीता, अंकितासारखी जीवनमूल्यांना महत्त्व देत नाही. फक्त व्यवहार बघते. अंकिताच्या वागण्यामुळे एक गिऱ्हाईक तुटलं. मग तिलाही नोकरीतून दूर करण्यात आलं. नीताने ते आव्हान स्वीकारलं. ती म्हणाली, ''ज्या गोष्टी अंकिताला वर्ज्य आहेत त्या नीताला चालतात. अंकू, आज सत्य परिस्थिती अशी आहे की मला जे मिळवायचं आहे ते तुझ्या मार्गावरून कोणालाच मिळणार नाही. तुला ठाऊक आहे, तू ज्यांना खांद्यावर हात ठेवू दिला नाहीस ते तुझ्याबरोबर झोपल्याच्या गोष्टी सांगतील. मग तूच सांग आपण या मूर्खांना गाढव बनवून त्यांच्या डोक्यावर बसून का बोलायचं नाही?'' नीताचं तर्कशास्त्रच वेगळं.




नीता, अंकिता आणि मेहताची आई, त्यांच्या पिढीच्या संस्कारांचं, आदर्शांचं, प्रेमाचं प्रतीक आहेत. आपल्या मुलांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहून त्यांना त्या पुढे जायला यथाशक्ती मदत करतात.

या माणसांप्रमाणेच ही कादंबरी जाहिरात एजन्सीवर केंद्रित आहे. एजन्सीची संकल्पना, व्यवस्थापन, प्रत्यक्ष चित्रण, वितरण त्यातील राजकारण इत्यादी अनेक गोष्टींबद्दल तसेच चेहरे आणि मुखवटे याबद्दलही अतिशय सूक्ष्मपणे लिहिलं आहे.

मूल्य, नीती-नियम सगळं काही धाब्यावर बसवून, जगावेगळे निर्णय घेणारी, जग जिंकू पहाणारी नीता आतून खूप घाबरलेली आहे. एका लग्न झालेल्या पुरुषाबरोबर लग्नाशिवाय राहाण्याचा धोका तिला समजला नाही. गर्भवती झाल्यावर सुधीरचा खरा चेहरा तिला दिसला. मेहताच्या पत्नीने कोकिळाने केलेली आत्महत्या तिला पलायन वाटत होती परंतु जीवनाच्या संघर्षात ती हरली आणि तिने आत्महत्या केली. तिचा अंकितावर पूर्ण विश्वास होता म्हणून आपल्या मुलीची जबाबदारी मात्र तिने तिच्यावर सोपविली. नीता पत्रात म्हणते, ''मी मूल्य तोडली. पतिपत्नीच्या दास्यत्वाच्या संबंधातून मुक्त व्हायची इच्छा केली. शुद्ध स्वरूपात, स्त्री-पुरुष संबंधातील सूक्ष्मता आणि उदात्तता जगण्याची इच्छा केली... पण...

अंकू, 'मानसीला' भविष्यकाळातील...स्त्रीला तुझ्या हाती सोपवत आहे. माझा विश्वास आहे, तुझ्या प्रेमळ कुशीत 'मानसी' आपल्या अस्तित्वाचा शोध घेऊ शकेल. तुझ्या इवल्याशा मुलीला तुझ्याजवळ घेऊन ये... तुझी नीतू...''

नव्या स्त्रीची प्रतिमा शोधण्याचा आणि नवीन-जुन्याचा मेळ घालणारी ही सुंदर कादंबरी!

दुसरी कादंबरी आहे 'आवा'. 'आवा' म्हणजे कुंभाराची विटांची भट्टी. दत्ता सामंत म्हणाले होते- 'जशी ही भट्टी योग्य रचली नाही आणि योग्य तापली नाही तर विटा ठिसूळ होतात. तसेच समाजाची योग्य रचना व्हायला हवी. योग्य आकार मिळायला तरच समाजाचा विकास होतो.'

या कादंबरीत लेखिकेने राजकारणातील राजकारण, पक्षातील राजकारण, समाजातील, जातिधर्माचं राजकारण, जाहिरात क्षेत्रातील राजकारण अशा अनेक स्तरांवर राजकारणाचं सूक्ष्म चित्रण केलं आहे. संपूर्ण कादंबरी एखादं महाकाव्य आहे असं वाटतं. इथे माणसा-माणसांमधली नाती आणि त्यातली गुंतागुंत फारच परिणामकारक आहे. जणू आयुष्यभराचा संघटनांमधील कामाचा अनुभव शब्दबद्ध झाला आहे. एका कामगाराच्या घरातून संघर्ष करायला उभी राहिलेली नमिता जगण्याच्या धडपडीत, घर वाचविण्याच्या धडपडीत कुठून कुठे पोहोचते. इतक्या लहान वयात पहिली मुलगी म्हणून आईचं प्रेम न मिळालेली, प्रेम ासाठी आसुसलेली नमिता आयुष्याची नव्याने सुरुवात करण्यासाठी कामगारवस्तीत परत येते.

संघटनेवर लेखिकेचा पूर्ण विश्वास आहे. तरीही त्यात होणारे अन्याय त्या स्पष्टपणे मांडतात. नमिताची आणि तिच्या वडिलांची अण्णासाहेबांवरील निष्ठा चित्रा मुद्‌गल जितक्या आत्मीयतेने मांडतात, तितक्याच उपरोधाने वासवानी मॅडम च्या तोंडून वास्तव जिवंत करतात. मॅडम अतिशय उपरोधाने बिटरम ग्लास कंपनीच्या अठरा महिने चाललेल्या संपाबद्दल बोलतात, ''अठरा महिने चाललेला कापडगिरण्यांचा आत्मघाती संप कोण विसरणार? कामगारांनी दहा किलोमीटर लांबीचा मोर्चा काढला होता. लंडनमधील वर्तमानपत्रांनी बोलकी छायाचित्रं छापून, शीर्षक दिलं होतं, 'जगातील आठवं आश्चर्य!' मला अशा महत्त्वाकांक्षी कामगारनेत्याचा तिरस्कार वाटतो. एक नंबरचा डोकंफिरू माणूस आहे. मारेकरी! मिल बंद करून देशाच्या उद्योगधंद्याचं कंबरडंच मोडून टाकलं. त्या विचित्र माणसाची नशा अजून उतरत नाही. स्वत: कधी उपाशी झोपला नसेल.''

नमिताच्या आयुष्यात वासवानी मॅडमचा प्रवेश तिच्या अतिशय दु:खी अवस्थेत झाला. नोकरीचं अमिष दाखवून त्या तिला हळूहळू मॉडेलिंगकडे घेऊन गेल्या आणि ती संजय कनोईच्या जाळ्यात अडकली. पुढे मग जाहिरातीचं विश्व आणि तिच्याशी खेळलं गेलेलं कपट नाटक. दुसरीकडे आई आणि मावशीची कारस्थानं तर पवारसारख्या महत्त्वाकांक्षी, संधिसाधू, हुषार

आणि स्वार्थी माणसाचा संदर्भ आहे. शाहबेनसारखी समाजसेविका, जी स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी पापड लाटून घेते आहे. त्याचवेळी झोपडपट्टी, सुनंदा, तिची आई, कुटुंबातील हेवे-दावे... केवढा मोठा कॅनव्हास लेखिकेने चितारला आहे. जणू महाकाव्यच!

'वसुधैव कुटुंबकम्' ही आपली परंपरा आहे आणि या परंपरेनुसार आजोबा-आजींशिवाय आपलं घर पूर्ण होत नाही. समाजातील बदललेली जीवनशैली, आपापसातील स्पर्धा यामुळे माणसं आत्मकेंद्री होत आहेत. त्यामुळे एकत्र कुटुंब ही परंपरा संपत चालली आहे आणि वृद्धाश्रमाची संख्या वाढते आहे.

चित्रा यांची तिसरी कादंबरी 'गिली-गड्डू' अर्थात चिमण्या. मराठी अनुवाद 'हुरहुर'. ही कादंबरी दोन विधुर वृद्धांच्या जीवनावर आधारित आहे. अतिशय संवेदनशील आणि आशयगर्भ असूनही ही साधी-सरळ कथा नव्हे तर माणसाने जगण्यावर, माणसांवर, नात्यांवर कसं प्रेम करावं, कसं जपावं हे सांगणारी कथा आहे. दोन सेवानिवृत्त (विधुरांच्या) आयुष्यातील फक्त तेरा दिवसांच्या घटनांबद्दल आणि बदलणाऱ्या जीवनमूल्यांबद्दल मार्मिक चर्चा या कादंबरीत आहे. पत्नीच्या सहकार्याने सर्व संकटांचा सामना करणारा पुरुष जेव्हा एकटा पडतो, तेव्हा त्याच्या आयुष्यात येणारं जीवघेणं एकटेपण, असमर्थता, अस्वस्थता याचं सूक्ष्म चित्रण आहे.

सकाळच्या वेळी टॉमीला (कुत्र्याला) घेऊन फिरायला गेलेले जसवंतबाबू टॉमीच्या ओढाताणीत पडतात आणि समोरून येणारे कर्नलसाहेब त्यांना हात देऊन उठवतात. तिथेच त्या दोघांच्या मैत्रीला सुरुवात होते. युद्धभूमीवर दररोज मृत्यू बघणाऱ्या कर्नलसाहेबांना मृत्यूची भीती वाटत नाही. उलट जगण्यावर त्यांचं खूप प्रेम असतं. जसवंतबाबूंना ते आपल्या घराचं, मुलं, सुना, नातवंडं यांचं रसभरीत वर्णनं सांगतात. वेगवेगळे इतके प्रसंग सांगतात की जसवंतबाबू रंगून जातात. त्यांना कर्नलसाहेबांना भेटण्याची ओढ लागते. वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला नेतात आणि विचारतात. ''मित्रा मथुरा, वृंदावन बघितलं का? नाही? ठीक आहे. आपण जाऊ कधीतरी. सध्या कालिंदीकुंजमध्ये जाऊया. तिथे यमुना व कुंज आहे. फक्त कृष्ण नाही.'' मग हसत हसत म्हणतात, ''दोन कृष्ण असताना मूर्खासारखं बोलतोय.''

असं आनंदी जीवनाचं चित्र रंगवणारे कर्नल खूप दु:खी आहेत. तरीही त्यांचा संघर्ष चालूच असतो आणि त्यातून जे जगदीशबाबूंना स्वतंत्र, समर्थ, स्वाभिमानी जीवनाचा संदेश देतात. लेखिका कर्नलकडून एक वेगळा विचार देतात, ''मित्रा, आपल्याला खरं तर सदैव दु:खात रहायची सवय झाली आहे. साध्याशा गोष्टीचा आपल्याला त्रास होतो.''

त्यांच्या चौथ्या कादंबरीला 'पोस्ट बॉक्स नं. २०३ नालसोपारा'ला प्रतिष्ठित असा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. त्यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना त्या म्हणाल्या, ''हा माझ्या सामाजिक बांधिलकीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या माझ्या साहित्याचा सन्मान आहे.'' ही कादंबरी तृतीयपंथीयांच्या जीवनातील दु:ख, वेदना, संघर्ष आणि स्वप्न व्यक्त करणारी आहे. आपल्याच घरातून हाकलल्या गेलेल्या विनोदची मर्मांतक पीडा त्याने आपल्या आईला लिहिलेल्या पत्रातून व्यक्त झाली आहे. असं वाटतं खरंच - 'हिजडा' हा शब्द एक शिवीच आहे. त्याला किन्नर म्हटल्यावरही त्याचा अपमान होतोच. इथे सरकारी कायदे, अधिकार, त्यातील सत्य-असत्य मतांचं राजकारण याबद्दल मार्मिक चर्चा आहे. परंतु आई आणि मुलाचं नातं अतिशय हळुवारपणे उलगडलं आहे. भूतकाळातील आठवणी आणि कठोर वर्तमान यांचा सुंदर मेळ घातला आहे. आपल्या नवऱ्यासमोरच नव्हे तर मुलं-सुनेसमोरही जोरात न बोलणारी प्रेमळ, अशिक्षित आई तृतीयपंथी मुलाच्या विरहाने, त्याला घरातून हाकलल्याच्या अपराधाने खूप दु:खी आहे परंतु मुलाच्या प्रेमाची असोशी इतकी आहे की घरातील कोणाला तो नकोय पण त्याच्याशी संबंध ठेवण्यासाठी ती पोस्टबॉक्स नंबर देण्याचा जगावेगळा उपाय सुचवते.

लिंगपूजक समाज लिंगविरहीत माणसांना कसं स्वीकारणार? म्हणून अशा समाजापासून मुक्ती हा या कादंबरीचा उद्देश आहे. विनोद म्हणतो, ''स्त्री-पुरुष लिंगविभाजन ठीक आहे. परंतु अन्य = ० असं का? आम्ही तुम्हाला ओळख देत आहोत. म्हणून हा वर्ग (शून्य) बनविला आहे.'' सत्ताधाऱ्यांच्या राजकारणाचा तो धिक्कार करतो. आमदार त्यांच्या आरक्षणाचा मुद्दा पुढे करून त्यांची मतं मिळवू पाहातात परंतु विनोद सगळ्या तृतीयपंथीयांना घरी परत जाण्यासाठी प्रयत्न करायला सांगतो. त्यांना वेगळी ओळख, जमात, आरक्षण नको. घर हवंय.

त्याच्या आईने आपल्या अपराधाची जाहीर क्षमा मागितल्याचं पत्र वर्तमानपत्रात देऊन त्याला घरी परत बोलावलं आहे आणि पतीला विनंती केली आहे की माझ्या तीनही मुलांना संपत्तीचा समान भाग मिळावा आणि विनोद घरी आल्यावर त्याने अग्नी द्यावा. आपल्या मुलावरचा अन्याय दूर होण्यासाठी मरेपर्यंत एक आई झगडली.

एका ज्वलंत सामाजिक प्रश्नाचा, माणुसकीच्या दृष्टिकोनातून केलेला विचार खूप तर्कपूर्ण व मार्मिक आहे. विचार करायला लावणाऱ्या चारही कादंबऱ्या सामाजिक प्रश्नांना थेटपणे भिडल्या आहेत.

**- डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९८२०००९८५९
vasudhavs@yahoo.co.in

# मृत्यू : दोन कविता

**रमेश पानसे**




१
मृत्यूपूर्वी आलो होतो तुझ्या दर्शनाला
मृत्यूनंतर ठाऊक नसते असे पिसे गगनाला!
तेव्हा जणू, की केवळ होते तुटत बंध धरेचे
आधाराला वळ पाठीवर, बळ इथल्या मुक्तीचे!

२
वयाच्या वाढीबरोबर
परिचितांच्या मृत्यूच्या बातम्या वाढत जातात!
काहींच्या बातम्या क्षणभर चटका लावूनही जातात
पण आताशा, तसे फारसे घडत नाही, बातम्या मनाला त्रास
देत नाहीत.
अज्ञात ज्ञाताच्या परिघात येते, तेव्हा विश्वचक्रच उलगडते.
दिवस-रात्रींप्रमाणे जन्म-मरण,
वाढत्या वयाची सायंकाळ, उद्या जन्मेल त्याची सकाळ
त्याच्या दुपारी आणखी एक सकाळ.
ज्याच्या वेळी कुणा एकाची अंधारी रात्र
आपण यायचे, राहायचे, जायचे दुसऱ्यासाठी जागा करून,
आपण म्हातारे व्हायचे ते दुसऱ्याला जागे करून,
त्याच्या हाती मशाल ठेवून, आपला कणभर उजेड राखून ठेवून
आपल्या जनुकांतून!
आपल्या मनुकांतून!!

**ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि भाषातज्ज्ञ रमेश पानसे संवेदनशील कवीही आहेत. गेली सुमारे सत्तर वर्षे ते कविता लिहिताहेत. त्यांचं कवितांचं प्रेम केवळ काव्यलेखनापुरतं मर्यादित नाही. कवितेच्या संदर्भात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमही त्यांनी चालवले. उदा. कविता उलगडण्याचे प्रयोग, कविता कवींकडून लिहून घेणे, कवितांचे संकलन, 'ऋचा' प्रकाशनाची उभारणी इत्यादी. त्यांनी पूर्णपणे कवितेला वाहिलेले 'ऋचा' हे मासिक सुरू करून त्यांचे वीस अंक प्रकाशित केले. 'लिटिल मॅगझिन'च्या चळवळीतील हे शेवटचं मासिक! पाऊस सखा आणि आम्ही कुणीही नाही (आणीबाणीच्या काळातील कविता) असे त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'शब्द रुची'च्या वाचकांसाठी त्यांच्या या दोन नव्याकोऱ्या कविता!**

**टीप : मनुका – memes : जीवशास्त्रीय जनुकांचा संस्कृतीय सम-सखा**

**२१ डिसेंबर २०१८ रोजी 'साहित्य अकादमी'ने मुंबई येथे 'माझ्या दृष्टीने' या उपक्रमाअंतर्गत दिनकर गांगल यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी लेखक आणि पत्रकार अरुण साधू यांचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्यकृती यांचा वेध या व्याख्यानातून घेतला. त्यातील हा निवडक अंश.**

# अरुण साधू नावाच्या एका गूढाची दंतकथा


"'पत्रकारिता म्हणजे घाईघाईत खरडलेले साहित्य' अशी संभावना सहसा समीक्षकांकडून पत्रकारांच्या लिखित शब्दांची केली जाते, पण मराठी पत्रकारितेच्या इतिहासात असाही एक बहाद्दर होऊन गेला की, कथा-कादंबरी-चित्रपट-कथा-नाटक-समकालीन इतिहास-अनुवाद सर्वच प्रांतात त्याच्यासाठी मानाचे चौरंग मांडणे समीक्षकांसाठी अटळ ठरले! हा पत्रकार म्हणजे अरुण साधू.''

***दिनकर गांगल आपल्या दिवंगत मित्राविषयी भरभरून बोलत होते आणि उपस्थित श्रोत्यांसमोर अरुण साधू नावाची गूढ दंतकथा उलगडत होती.***

'कथा युगभानाची'मध्ये साधूंच्या निवडक तेरा कथांचा परामर्श घेताना प्रस्तावनेत ज्येष्ठ समीक्षक मीना गोखले यांनी म्हटले आहे, त्याप्रमाणे पत्रकार व लेखक असणाऱ्या अरुण साधू यांनी महत्त्वपूर्ण लेखन केलेले असले तरी, मराठी वाचक त्यांना मुख्यत: (दहा कादंबऱ्यांची निर्मिती करणारा) एक समर्थ कादंबरीकार आणि विशेषत: 'मुंबई दिनांक' (१९७२) व 'सिंहासन' (१९७७) या (राजकीय कादंबरीचा मानदंड निर्माण करणाऱ्या) कादंबऱ्यांचा कर्ता म्हणून ओळखतो, पण कादंबरीबरोबरच कथा, नाटक, एकांकिका, चरित्र, अनुवाद, पटकथा, नियतकालिकांतील स्तंभलेखन आणि चीन, क्युबा व रशिया या तीन देशांतील क्रांती व ती घडवणारे क्रांतिकारक यांच्याविषयीचे इतिहासग्रंथ अशा विपुल निर्मितीतून साधूंचे साहित्यिक कर्तृत्व सिद्ध झाले आहे. मात्र कादंबरीकार म्हणून साधूंच्या योगदानाची जेवढी चर्चा झाली आहे. तिच्या मानाने १९८३ ते २००६ या कालावधीत प्रकाशित झालेले साठ कथांचे सहा कथासंग्रह नावावर असूनही कथालेखक म्हणून साधूंची पुरेशी दखल घेतली गेलेली नाही. खरं तर, त्यांच्या सर्वच लेखनाप्रमाणे त्यांच्या कथालेखनाची वाटचालही 'लोकल' संदर्भांकडून 'ग्लोबल' संदर्भांकडे झेपावणारी आहे, असा प्रत्यय येतो कारण मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा ठेवणारे साधू स्वत:ही परिवर्तनवादी युवकांचेच प्रतिनिधी होते!

वयाच्या एकविसाव्या वर्षी १९६२ मध्ये साधूंनी पत्रकारितेच्या जगात प्रवेश केला. पुण्याच्या दैनिक केसरीचे वार्ताहर (१९६२-६४); मग इंडियन एक्सप्रेसच्या पुणे ब्युरोत वार्ताहर (१९६४-६६); मग पुण्याच्याच 'साप्ताहिक माणूस'मध्ये विशेष प्रतिनिधी सहसंपादक (१९६६-६७) अशी कामे ते करीत. अशोक जैन/दिनकर गांगल या आपल्या पत्रकार-मित्रांपाठोपाठ साधूही मुंबईत आले. तिथल्या इंडियन एक्सप्रेसमध्ये वार्ताहर म्हणून (१९६७-७२); नंतर १९७३ ते ७८ मध्ये मुंबईच्या 'द टाइम्स फ्री इंडिया'त वार्ताहर १९७८-१९८७ मध्ये त्यांनी 'द स्टेटसमन'चे पश्चिम भारतासाठी विशेष प्रतिनिधी म्हणून काम बघितले. मध्यंतरीच्या काळात (१९८०-८५) न्यूयॉर्कच्या 'टाइम' मासिकाचे पश्चिम भारतासाठीचे मुक्त प्रतिनिधी म्हणूनही ते कार्यरत होते. बातमीदारीपासून सुरू झालेली त्यांची पत्रकारिता १९८७-८९ पर्यंत फ्री प्रेस जर्नल-बुलेटिनचे संपादकपद लाभून बहरली. या सर्व कालखंडात कैक इंग्रजी-मराठी वृत्तपत्रांत राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक विषयांवर ते स्तंभलेखन करीतच होते. शेवटी १९९५ ते २००१ या कालखंडात त्यांनी पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागात विभागप्रमुख म्हणून वृत्तविद्या-अध्यापनाचे कामही केले. त्यांच्या काहीशा अकाली मृत्यूनंतर त्यांच्या 'झिपऱ्या' या कथेवर मराठी चित्रपट निघाला. तत्पूर्वी 'डॉ. आंबेडकर', 'यशवंतराव चव्हाण' या दोन गाजलेल्या चित्रपटांच्या संहिताही त्यांनी लिहिल्या होत्या. सुदैवाने २००७ सालच्या अ.भा. मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना भूषवता आले होते.

अमरावती जिल्ह्याच्या अचलपूर तालुक्यातील परतवाडा येथे १९४१ साली जन्मलेले साधू अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातून १९६१ साली बी.एस्सी. झाल्यावर पुढील वर्षी एम.एस्सी. करता करता 'केसरी'त अर्धवेळ विद्यार्थी बातमीदार होण्यासाठी पुण्यात आले, तेव्हापासूनच एकाच खोलीत राहण्याइतपत त्यांच्याशी दोस्ती असलेल्या गांगलांना स्वाभाविकच 'अरुण साधूंचे आपण जिगरी दोस्त आहोत' असे वाटायचे. पुढे अशोक जैनच्या पाठोपाठ गांगल व अरुण साधूही मुंबईत पत्रकारितेत नशीब जोखायला आले तेव्हा, त्या तिघांनाही कुर्ल्याच्या नेहरू नगरमध्ये पत्रकार कोट्यातून




एकाच इमारतीत सदनिका मिळाल्या आणि पुढे वांद्रे-अंधेरी-चेंबूर येथे मोठ्या सदनिका मिळेस्तोवर ते तिघेही सपत्नीक सख्खे शेजारी म्हणून आठ-दहा वर्षे कुर्ल्यालाच राहत होते.

गांगल पुढे म्हणाले, ''अरुण साधूंचा स्वभाव तसा समूहाला भिडणारा कधीच नव्हता; स्वत:च्या कोषातच वावरणारे ते होते पण मित्रांच्या घोळक्यात वावरताना एक सहृदय स्नेही म्हणून त्यांच्यातील उबदारपणा या जवळच्या मित्रांना नेहमी जाणवत राहायचा! त्यामुळेच २००७ साली साधूंना अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद साधूंना लाभले तेव्हा त्या निवडीचे सर्वदूर ज्या उत्साहाने स्वागत झाले. ते कौतुक ऐकताना स्वत:ला साधूंचे घनिष्ट स्नेही समजणाऱ्या मला प्रश्न पडला- आपण गेली ६८ वर्षे घट्ट मित्र म्हणून ओळखतो, ते अरुण साधू हेच का?

नंतर पंधरा महिन्यांपूर्वी १५ सप्टेंबर २०१७ला साधू तसे अकालीच कालवश झाले, तेव्हा त्यांच्याविषयी जे-जे अनेकांकडून बोलले-लिहिले, ते ऐकून-वाचून पुन्हा मनात आलं-साधू व्यक्तिश: प्रत्येकाला किती वेगवेगळे दिसायचे! त्यांची पत्नी अरुणा यांना तरी ते खरेखुरे उमजले असतील का? मृत्यूनंतर काही महिन्यांनी साधूंच्या 'झिपऱ्या'वरील चित्रपट प्रदर्शित झाला. त्या निमित्ताने निरनिराळ्या लोकांशी गप्पा मारताना साधूंच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी ठाऊक नसलेले पैलू माझ्यासमोर येत राहिले. 'मुंबई मराठी साहित्य संघा'ने 'तिसऱ्या पिढीचे आत्मकथन' नावाचे पुस्तक प्रकाशित केले. त्यातील साधूंवरील लेखातून त्यांच्याविषयी आणखी नवीनच माहिती मिळाली. एकूणच, 'अरुण साधू नावाच्या एका गूढाची दंतकथा' म्हणून एक चांगला लेख आपण लिहू शकू, असं सारखं मला वाटत राहिलं...'

अरुण साधूच्या साहित्यिक कर्तृत्वाचा आलेख सतत वाढतच राहिला. पुण्यात आल्या-आल्या 'माणूस'मध्ये त्याने केलेल्या लिखाणामुळे त्याला चांगले नाव मिळू लागले होतेच. 'माणूस'च्या श्री.ग. माजगावकरांकडे तरुण होतकरू लेखक हुडकायची क्षमता होती. 'अनिल बर्वे व अरुण साधू' या दोन तरुणांना श्रीभाऊंनी घडवलेले तरुण लेखक म्हणून तेव्हा साहित्यिक वर्तुळात ओळखलं जायचं! अशी योग्य माणसं योग्य वेळी लाभण्याच्या बाबतीत अरुण साधू भाग्यवान होता. 'इंडियन एक्सप्रेस'मध्ये तो वार्ताहार म्हणून लागला तर, तिथे कल्पक वृत्तसंपादक राव त्याच्या हुशारीवर इतके खूष होते की, त्याला राजकीय वार्ताक्षेत्रापासून सर्व वृत्तक्षेत्रांत काम करण्यासाठी पूर्ण वाव दिला होता. ते काम करता-करता, बॅकबेवर पडणारे भराव बघता-बघताना त्याने 'मुंबई दिनांक' लिहायला घेतली. झपाटल्यासारखा लिहायचा तो! रात्री कार्यालयातून बाहेर पडल्यावर शेवटची गाडी हुकली तर पहाटेची पहिली गाडी मिळेस्तोवर बोरीबंदर स्थानकाच्या बाकावर बसून तो झरझरा लिहीत बसायचा! पाटण्यासारख्या दूरच्या रेल्वे प्रवासाला आरक्षण न करता निघणारा आणि परत आल्यावर झपाटल्यासारखा 'रिपोर्ताज' लिहिणारा हा लेखक! उगाच नाही मित्रवर्य कुमार केतकरने त्याच्यावर लिहिताना त्याला 'परग्रहावरचा माणूस' असे विशेषण लावले होते!

'शापित' कादंबरी त्याने एशियाडच्या प्रवासात लिहिली होती. विषयानुरूप त्याची लेखनशैली बदलताना 'मुखवटे', 'शोधयात्रा'मध्ये बघायला मिळते. 'सूटेबल बॉय'चे 'शुभमंगल' म्हणून अप्रतिम अनुवाद करताना ती शैली वेगळीच होते. मूळ चौदाशे पानी कादंबरीचा सहाशे पानांत संक्षेपाने नेटका अनुवाद करणे म्हणजे काही सोपी गोष्टी नव्हती. लेखक म्हणून त्याची ताकद आपल्याला तिथे कळते!

'आपण लेखक म्हणजे, प्रतिब्रह्मदेव असतो' असे अभिमानाने नेहमी बोलणारा; स्वतंत्र साहित्यलेखन-स्तंभलेखन-अनुवादादि डोंगराएवढी कामं झपाटल्यासारखी हातावेगळी करणारा आमचा हा मित्र शेवटची दहा वर्षे मात्र जणू जीवनेच्छाच गमावून कोषातच गेला होता. मीना गोखले यांनी त्याला लावलेले 'युगभानाचा कथाकार' हे एक विशेषण वगळता त्यांच्या साहित्याचा समीक्षकांनी यथायोग्य परामर्श कधी घेतलाच नाही, याचा सल अखेरपर्यंत त्यांच्या मनात राहिला.

**– शब्दांकन : नीला उपाध्ये**

**दूरध्वनी : (०२२-२५२२१६८६)**


ग्रंथाली **चौरस** वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

**क्षणचित्रे**



राजदत्त






अरुण काकडे





एन. चंद्रा





मुक्ता बर्वे





अरुण शेवते





संजय कृष्णाजी पाटील

संजय कृष्णाजी पाटील लिखित 'आभाळ झेलण्याचे दिवस', 'दशक्रियेची चित्रकथा', 'हरवलेल्या कवितांची वही', 'लेझीम खेळणारी पोरं' आणि 'शून्य प्रहर' या पाच पुस्तकांचे प्रकाशन सुदेश हिंगलासपूरकर, राजदत्त, एन. चंद्रा, सयाजी शिंदे, अरुण काकडे, मुक्ता बर्वे आणि अरुण शेवते यांच्या उपस्थितीत पार पडले.

॥ग्रंथाली॥ चौरस वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

क्षणचित्रे



रविराज गंधे



डॉ. सिसिलिया कार्व्हालो



नीलिमा भावे



डॉ. दीपक पवार



सुधीर थत्ते











'माध्यमरंग', 'परिमळामाजि कस्तुरी', 'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता', 'दूरस्थाचा पसारा', 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१८' या पुस्तकांचे प्रकाशन सुदेश हिंगलासपूरकर, भारती बिर्जे-डिग्गीकर, नीलिमा भावे, रविराज गंधे, सुधीर थत्ते, दिनकर गांगल, डॉ. म.सु. पाटील, नंदिनी थत्ते, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, स्वप्ना वाघमारे-जोशी आणि डॉ. दीपक पवार यांच्या उपस्थितीत पार पडले.



भारती बिर्जे-डिग्गीकर





सूत्रसंचालन
मृण्मयी भजक







सूत्रसंचालन
डॉ. लतिका भानुशाली

'नक्षत्रलिपी', 'हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी', 'ट्रंप : एक वादळी जीवनपट' या पुस्तकाच्या प्रकाशन भारती बिर्जे-डिग्गीकर, नीलिमा भावे, रविराज गंधे, दिनकर गांगल, डॉ. म.सु. पाटील, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, स्वप्ना वाघमारे-जोशी, नंदिनी थत्ते, सुधीर थत्ते आणि डॉ. दीपक पवार यांच्या उपस्थितीत पार पडले.

## साहित्य अकदामी पुरस्कार विजेते २०१८
## मा. म.सु. पाटील यांचा सत्कार हस्ते दिनकर गांगल



दिनकर गांगल



भारती बिर्जे-डिग्गीकर, नीलिमा भावे, रविराज गंधे, दिनकर गांगल, डॉ. म.सु. पाटील, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, स्वप्ना वाघमारे-जोशी, नंदिनी थत्ते आणि सुधीर थत्ते



डॉ. म.सु. पाटील



आकर्षक व्याजदराने गृह/कार कर्जाचा लाभ घ्या
ज्यामुळे तुम्हाला घेता येईल
अधिक मोठे घरआणि अधिक मोठी कार
युनियन होम
5 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 30 वर्षांपर्यंत
युनियन माईल्स
2 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 7 वर्षांपर्यंत
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा । दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
गौरवशाली भागीदार
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
हेल्पलाईन नं.: 1800 208 2244 / 1800 22 2244 (टोल फ्री नं.) । 080 2530 0175 (सशुल्क) । +91 80 2530 2510 (एन आर आय साठी)
www.unionbankofindia.co.in | @unionbankofindia @UnionBankTweets UnionBankInsta YouTube UnionBankofIndiaUtube unionbankofindia

प्रणयाच्या पन्नास छटा... तीन पुस्तकांच्या मालिकेत..

जगभर खळबळ माजवणाऱ्या **Erotica...**












ई.एल.जेम्स

## फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे

अनुवाद
शोभना शिकनीस

पृष्ठसंख्या - ५४८
किंमत - ₹ ७००

## फिफ्टी शेड्स डार्कर

अनुवाद
डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या - ५५२
किंमत - ₹ ७००

## फिफ्टी शेड्स फ्रीड

पृष्ठसंख्या - ६२८
किंमत - ₹ ७००

या कथानकावर चित्रपट प्रदर्शित

---

देशाचे रक्षकच देश उध्वस्त करायला निघाले तर..?
कूट राजनीतीचा रहस्यभेद करणारी विलक्षण कादंबरी...




## ब्लॅक लिस्ट

अनुवाद
बाळ भागवत

TBC-27-6

पृष्ठसंख्या - ३७६
किंमत - ₹ ४५०

TBC सभासदांना निम्म्या किंमतीत

Book Available

अमेरिकेबरोबर युद्धाची वेळ आलीच तर चिनी लष्कराने सर्वंकष युद्धाची योजना आखून ठेवली होती;
पण ती भलत्यानेच चोरली आणि...?



ब्रॅड थॉर




## फुल ब्लॅक

अनुवाद
बाळ भागवत

TBC-28-1

पृष्ठसंख्या - ३८८
किंमत - ₹ ४५०

TBC सभासदांना निम्म्या किंमतीत

Book Available

मेहता पब्लिशिंग हाऊस

Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta Books
950+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665

Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book -
play.google.com/store/books
www.amazon.in/b?node=15513892031

**महाराष्ट्र विश्वकोशमंडळाच्या माजी अध्यक्षा आणि वाचकप्रिय लेखिका डॉ. विजया वाड यांचं पालकत्वाची जडणघडण करणारं 'प्रिय आईबाबा' हे एकशेपंचविसावं पुस्तक नुकतंच प्रकाशित झालं. इतका विस्तृत लेखनप्रपंच सोपा नाही. लेखनातून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचं प्रतिबिंब लख्खपणे उमटलं आहे. आधुनिक विचारांचं स्वागत करणारी ही लेखिका सतत काळाबरोबर चालणारी आहे...**



# शब्दांची आनंदयात्रा

## डॉ. विजया वाड यांच्याशी एक संवाद

**प्रश्न :** तुम्ही कोणकोणत्या प्रकारचे लेखन केलेत?

**उत्तर :** मी सर्व साहित्यप्रकार आजमावले. कथा, कविता, नाटक, चित्रपटकथा, कादंबरी, बालसाहित्य, प्रवासवर्णन इत्यादी. लेखणीला सदैव दैवत मानून शब्दांमध्ये रमले म्हणून आयुष्य सुंदर झाले. शब्द माझे सारथी झाले आणि प्रकाशकांनी आत्मीयता दाखविल्याने माझी १२५ पुस्तकेही झाली. आणखी एक, विश्वकोशामुळे संशोधनात्मक लिखाणाचाही गाढा अनुभव आला.



**प्रश्न :** मुलांसाठी तुम्ही खूप लेखन केलेत. आजचे मुलांसाठीचे लिखाण कोणत्या प्रकारचे असावे असे आपल्याला वाटते? आजच्या काळात मुलांसाठी लेखन करताना कोणती आव्हाने समोर आहेत?

उत्तर : मुलांसाठी लेखन हे माझ्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचे क्षण आहेत, जे मी अनेकानेक वर्षे अनुभवले आहेत. इतकं निर्मळ, सुंदर जग आहे ना बालकांचं, की त्यांच्यासाठी लिहिताना मी परत परकरी पोर होते. बालकांचे जग आता अंगणातून संगणकापर्यंत पोहोचले आहे. इंटरनेट हा त्यांच्या आयुष्याचाच एक भाग बनल्याने जग जवळ आलेय. ज्ञानाच्या कक्षा रुंदावून अवाढव्य मोठ्या झाल्यायत, पण त्यामुळे एक मोठा तोटा झालाय. व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्रॅम यात गुंग झालेली मुले जगाच्या जवळ नि कुटुंबापासून दूर गेली आहेत. 'कनेक्टेड विथ द वर्ल्ड' आणि 'डिसकनेक्टेड विथ द फॅमिली' असे झाले आहे. त्यामुळे कुटुंबसंस्कृती जोपासणारे लिखाण याच माध्यमांचा वापर करून झाले तर मुलांना आईची माया नि बापाच्या छातीची ऊब, आजी-आजोबांचे प्रेम नव्याने कळेल. तसेच पैसा नि यंत्रे यापेक्षा 'माणूसपण' मोठे हेही कळेल. ही आव्हाने लक्षात घेऊनच मी बालकोशाची एक २२ तासांची वेबसाईट डेव्हलप केली आहे. ती ८ डिसेंबर रोजी सुकृत खांडेकर यांनी जगास अर्पण केली. marathibalkosh.in हा तिचा पत्ता असून त्यात एकूण दोनशे लेखक-कवी सहभागी झाले आहेत. खूप बालकेही यात आनंदाने नाचताना, गाताना तुम्ही बघू शकाल. अनेक मानवी मूल्यांचे जतन करणाऱ्या कथा, विज्ञानकथा, निखळ मनोरंजन करणाऱ्या गोष्टी, गाणी, नाटके, नृत्यनाट्ये, संगीतिका, नाट्यछटा, एवढंच काय ॲनिमेशन फिल्मसही या वेबसाईटवर बघायला मिळतील. देशभक्ती, निसर्गप्रेम, समता, बंधुता, विश्वात्मक एकता अशी मूल्ये उपदेश न करता, न कंटाळा आणता मनोरंजनातून मुलांना सांगितलीयत. रोज एक नवी गोष्ट, नवी कविता सांगावी असा प्रश्न बालकांच्या आईबाबांना आता पडणार नाही कारण या साईटवर ३६५ बालकथा नि ३६५ बालकविता ऑडिओ व्हिज्युअल स्वरूपात उपलब्ध आहेत आणि नामवंत ते नवोदित, सर्व बालसाहित्यकार त्यात उपस्थित आहेत. यातले 'फुलवा' हे संगीतमय नृत्यनाट्य, 'शबरीची बोरे' ही ॲनिमेशन फिल्म बालकांना जामच आवडेल. 'डॉ. निशिगंधा वाड एज्युकेशन ट्रस्ट' तर्फे याची निर्मिती केली असून ही वेबसाईट विनामूल्य आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टने अर्थसहाय्य केले म्हणून हे शक्य झाले. आजच्या काळाला अनुसरून या सर्व बालकोशांना पुस्तकांमधून वेबसाईटवर का घातले.? जगभरातल्या बालकांना, ज्यांना मराठीचे प्रेम आहे, त्यांना बालसाहित्याशी जोडण्यासाठी! आनंद भरभरून लुटण्यासाठी. 'मुलांना पुस्तकाकडे नेण्याकरिता नव्या माध्यमांचा प्रभावी वापर करा,' असे मला सांगावेसे वाटते.

**प्रश्न :** बालकोशांची परंपरा आपणाकडे फारशी नाही. विश्वकोशाचे काम करताना आपण मुलांसाठी कुमारकोश केलेत. नंतर

विश्वकोशाची परिपूर्ती केल्यावर चक्क बारा बालकोश केलेत. ह्याविषयी सविस्तर सांगा.

**उत्तर :** विश्वकोशांची निर्मिती करताना कुमारकोशांची निर्मिती करावी असे मे.पुं. रेगे, डॉ. श्रीकांत जिचकार यांना वाटत होते पण परिचय ग्रंथनिर्मितीनंतर दुर्दैवाने हे काम थांबले. दोघांनी या जगाचाच निरोप घेतला. मग आम्ही हा रथ पुढे नेला. संपादक मंडळाने 'जीवसृष्टी आणि पर्यावरण' हा महत्त्वाचा विषय निवडला. ही सूचना डॉ. जयंत नारळीकर यांची होती आणि होमी भाभा विज्ञानशिक्षणसंस्थेचे तत्कालीन संचालक डॉ. हेमचंद्र प्रधान, त्यांचे सहकारी विजय लाळे, नरेंद्र कुलकर्णी यांनी हे दोन कोश पूर्ण करण्यास मला अपार मदत केली. एखाद्या प्रकल्पाचा जन्म परिकथेसारखा असतो; पण तो पूर्णत्वास नेणे हे काम किती जिकिरीचे असते हे मी आपणास सांगायला हवे थोडेच? महाराष्ट्रातील दोनशे नामवंत शास्त्रज्ञांनी नोंदी पाठवल्या त्या आम्ही तीन चाळण्यांतून तपासल्या. मी भिरभिर भिंगरी होऊन फिरले, एवढे कष्ट घेऊन तो मुलांपर्यंत रंगीत स्वरूपात पोहोचावा म्हणून महाराष्ट्र शासनास निधीसाठी साकडे घातले. या कोशाला सात नामवंत शास्त्रज्ञांनी अंधांसाठी बोलके केले. मला आठवते, मी सतत 'लॅब'मध्ये चकरा मारीत असे. या नोंदी तयार झाल्यावर मला वाटले, त्या कुमारांना आवडतील की नाही? 'जड' तर होणार नाहीत? मग सोलापूर, इचलकरंजी, मुंबई इथल्या ज्युनिअर कॉलेजात त्यांचे वाचन केले. कुमारांच्या सूचना लक्षात घेऊन पुनर्लेखन केले. माधव शिरवळकर या संपादक सदस्यांनी संपूर्ण बोलका कुमारकोश इंटरनेटवर टाकण्यास अपार मदत केली. या कामात इतक्या लोकांचे सहकार्य लाभले म्हणून सांगू? मी 'मुंगी' होऊन सतत 'साखर' गोळा केली. कष्टाळू जीवनपद्धती मोठे प्रकल्प साकार करते, हे मला विश्वकोशाने शिकविले. महाराष्ट्र शासन, शासकीय प्रेसचे गोसावी सर, वाई आणि 'होमी भाभा'चे संपादकीय मंडळ या साऱ्यांच्या सहकार्याने कुमारकोश प्रकाशले. संपादकाला जेव्हा हजारो हात आत्मीयतेने मदत करतात तेव्हाच हा जगन्नाथाचा रथ डौलाने चालतो, याचे 'विश्वकोश', 'कुमारकोश' हे प्रतीक आहे. विश्वकोश ग्रंथवाचन स्पर्धांमधली सर्वात लोकप्रिय स्पर्धा 'कुमारकोश' आणि 'महाराष्ट्र कन्या कोश' ठरली. ग्रंथवाचनाने मुले, मोठी माणसे समृद्ध होतात पण ते वाचण्यासाठी ग्रंथवाचन स्पर्धा घ्याव्यात ही कल्पना मी 'शिक्षक' असल्यानेच माझ्या डोक्यात आली. प्रथम 'मास्तरणीचे डोके' असे कुणाकुणाला वाटलेही पण नंतर या योजनेने उत्तम मूळ धरले. माझ्या सहसंपादक मंडळातील सदस्य गावोगावी गेले. नऊ वर्षांत आम्ही १८० गावे सर केली नि १८० स्पर्धा घेतल्या. लोकांनी विश्वकोश विकत घेऊन स्पर्धेत भाग घेतला, हे सांगताना मला आनंद आणि अभिमान वाटतो. तर्कतीर्थांनी सुरू केलेला हा प्रकल्प ५३ वर्षांनी पूर्ण झाला नि चार मुख्यमंत्र्यांच्या काळात ५ विश्वकोश आणि २ कुमार कोश निघाले. विश्वकोश'ज्ञ-ज्ञेयवाद'पर्यंत नेऊन 'परिपूर्ती'चे भाग्य मला लाभले. ह्यात घरी-दारी मला सहकार्य करणारे अनंत हात आहेत याची मला जाणीव आहे. माझ्यासोबत १८-१८ तास काम करणारे




वाईचे जुने जाणते नि अगदी तरुण हात सोबत होते म्हणूनच शेवटच्या चारशे नोंदी आम्ही पूर्ण करून नियोजित वेळेआधी दहा दिवस वाईच्या महागणपती पुढे तो ठेवू शकलो. परिपूर्तीचा खंड! अपूर्व समाधानाचा क्षण!

तो डिजिटल करण्यास अशोकराव चव्हाण यांनी २० लक्ष रुपये मंजूर केले नि २६००० पृष्ठे सिडॅकचे महेशे कुलकर्णी नि सहकारी यांनी मला अपार मदत करीत marathivishwaskosh.in वर घातली. १५ लक्ष वाचक १०५ देशांतून मिळाले नि विश्वकोश न राहता विश्वात आला. विलासराव देशमुख यांनी मोठ्या विश्वासाने म्हटले होते, 'अडलेला रथ मार्गी लावा ताई.' ते काम शासकीय सहकार्याने पूर्णत्वास गेले. विश्वकोशाची एक अडतीस मिनिटांची फिल्म आम्ही तयार केली. विख्यात शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर तिचे भाष्यकार होते तर निवेदन रीमा लागू यांनी केले होते. संपादन, निर्मिती संकल्पना माझी. अरविंद जगतापही लेखनासाठी सोबत राहिला. मी विश्वकोशाचे अभिमानगीत लिहिले. अशोक पत्कींनी

ते संगीतबद्ध केले. शंकर महादेवन यांनी ते गायले नि वाईच्या रम्य परिसरात 'सुबोध भावे'वर ते चित्रित झाले. ते आम्ही संकेतस्थळावर टाकताच त्यास लाखो लाईक्स आला.

विश्वकोश जनमानसात रुजावा म्हणून केलेल्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेला फळ मिळाले. सुलेखनकार अच्युत पालव यांनी विश्वकोशाचे अभिमानगीत अत्यंत सुरेख सुलेखित केले. विश्वकोशाच्या या वेबसाईटला महाराष्ट्र शासनाचा 'प्लॅटनिम' पुरस्कार, कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाचा राष्ट्रीय पुरस्कार आणि आशियाई मानांकन 'मंथन'ने मिळवून दिले.

**प्रश्न :** आता बारा बालकोशांबद्दल सांगा.

**उत्तर :** बालकोश ८ ते १४ वयोगटासाठी तयार करावयाचे ही संपूर्ण माझी कल्पना, आवडीतून निर्माण झालेली आहे. येथे मला पूर्ण स्वातंत्र्य होते. मग प्रथम २०१५मध्ये आम्ही ५ बालकोश काढले. ३६५ कथा, ३६५ कविता आणि महाराष्ट्रातले नामवंत ते नवोदित लेखक या प्रकल्पात सहभागी झाले. रोज 'झोपतानाची गोष्ट-गाणे, आईबाबांसाठी नवे-नवे' हे सूत्र यात महत्त्वाचे होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेबांनी यासाठी मुद्दाम वेळ काढून प्रकाशन केले म्हणून आनंद वाटला. मग आम्ही न थांबता आणखी सात कोश तीन वर्षांत काढले. त्यात 'खाऊकोश' विशेष गाजला. हातोहात संपला. 'किशोरी आरोग्यकोश' तर वर्षभरात दुसरी आवृत्ती निघून खपला. कोण म्हणतो मुले वाचत नाहीत? देशभक्तिपर कवितांचा बालकोश, पक्षीप्राणी कोश, पुष्पफल कोश, निसर्ग कोश या कोशांनी बहार उडविली. साक्षी परब या महाराष्ट्रात पहिल्या आलेल्या बारावीच्या मुलीने वीस मुलांच्या सहभागासकट मला पक्षीप्राणी कोशात सहकार्य केले. ५० पक्षी, प्राणी, फळे, फुले अशी २०० गोष्टींची माहिती बालकांनी (७ वी ते १० वी) गोळा केलीय, बालकोशांची चित्रे १२०० बालकांनी काढलीयत. मनिषा कदम, वैशाली कार्लेकर, एकनाथ आव्हाड, प्रियंवदा करंडे, मंगल गोगटे या सर्वांनी कोणत्या ना कोणत्या बालकोशासाठी मला संपादन सहाय्य केले आहे. बारा बालकोशांसाठी काम करताना मला इतके बालमित्र मिळाले नि महाराष्ट्रभर 'फिरंती' करता आली की 'अवघा आनंदीआनंद' आहे. सारे कोश संपूर्ण रंगीत. सारे 'कॉस्ट प्राईस'ला विकले, त्यामुळे धननिर्मिती नाही झाली कारण तो उद्देशच नव्हता. मात्र 'संतोष' आयुष्यभराचा मिळाला. ८ डिसेंबरला त्याची सांगता झाली. २०१५ ते २०१८ तीन वर्ष बारा बालकोश!

**प्रश्न :** मुलांना पुस्तकांकडे नेण्याकरिता काय प्रयत्न करायला हवेत?

**उत्तर :** पुस्तक वाचनस्पर्धा, बोलक्या पुस्तकांची निर्मिती, आईबाबांचा झोपेपूर्वीचा गोष्टींचा तास, प्रार्थनासभेत नव्या पुस्तकांची ओळख, बालसाहित्यकारांसमवेत गप्पागोष्टी, ई-पुस्तके, 'यू-ट्युब झलक', 'प्रॉक्सी पिरियडला पुस्तकपेटी'तून पुस्तकवाचन, वर्गात 'माझे आवडते पुस्तक' स्पर्धा. 'पुस्तक वाचक' बालपुरस्कार, रीडिंग अवर्स, कितीतरी प्रकारे पुस्तकांकडे मुलांना आकर्षित करता येईल. मी ते केले आहे ४० वर्षे. माझे विद्यार्थी वाचते नि लिहिते केले याचा आनंद नि अभिमान वाटतो मला.

प्रश्न : 'अवेळ' या कथासंग्रहाला, अनेक पारितोषिके उमेदीच्या काळात मिळाली. तुमच्या 'स्त्री'विषयक लिखाणाबाबत सांगा ना.

उत्तर : स्त्रीचे आत्मभान जागृत व्हावे, तिने 'मुक्याने' मरू नये 'बोलते' होत, 'गर्जत' जगावे असे मला वाटते. माझ्या मुलींनी हुंडाबळी होता नये. माझ्या मुली समर्थ, जागत्या, स्वबळावर 'उभ्या' हव्यात ही इच्छा मनी धरून शब्द लिहिले. जीवनभर 'माणूस' म्हणून जगा नि जगू द्या हेच माझी लेखणी सांगत्येय! मी पन्नास वर्षांपूर्वी माझे स्वातंत्र्य मोठ्या युक्ती-प्रयुक्तीने मिळविले. मुलींना एकविसाव्या शतकात ते मिळायलाच हवे, पण असे करताना दुसऱ्याच्या 'पायावर पाय' देणे नको, हेच सांगायचंय मनापासून.

**प्रश्न :** तुमचं शिक्षणविषयक लेखन आणि त्यामागची भूमिका याबद्दल सांगा.

**उत्तर :** मी हाडाची शिक्षिका. त्यामुळ मुले नि पालक यांची 'सखी', 'आई', 'ताई', 'नानी'देखील! त्यामुळे अभ्यास कसा करावा?, पालकत्व कसे निभवावे, आत्मविश्वास कसा वाढवावा, 'यश' म्हणजे काय? परीक्षा बिनधास्त देण्याचे मार्ग, आपली मुले, आपल्या मुली वाढविताना काय काय करावे, प्रिय आई-बाबा नि मुले यांचे आनंदी कुटुंब अशा अनेक अंगांनी समुपदेशन केले नि ती पुस्तके अमाप वाचली गेली. माझे कितीतरी वाचक मला त्यासाठी धन्यवाद देतात. 'उत्तम शिक्षक होण्यासाठी' हे पुस्तक तर मला 'ओळख' देऊन गेले बघ.

**प्रश्न :** आयुष्याकडे पाहण्याची तुमची दृष्टी साहित्यातून ठळकपणे दिसते.

**उत्तर :** हो. खूप सकारात्मकपणे बघते मी. आयुष्य म्हणजे आनंदयात्रा मानते. प्रत्येक नवा दिवस नव्या संधीचा मानते माणसे 'जोडते' 'तोडण्यावर' विश्वासच नाही. 'सॉरी' म्हणायला लाजत, कचरत नाही. दुसऱ्याचे अभिनंदन करताना जीव छोटा होत नाही. 'जगा नि जगू द्या', 'कुढू कुंथू नका' हा संदेश गोष्टीतून देते. माझ्याशी सूडबुद्धीने वागणाऱ्यावर समशेर उचलायला कचरत नाही.

**प्रश्न :** आणि तुमचे वाचक? त्यांचे तुमचे नाते कसे आहे?

उत्तर : त्यांच्यावर एक ग्रंथच लिहावा लागेल, इतके प्रेम मला वाचकांनी दिले आहे.

**संवादक : डॉ. वीणा सानेकर**

# आपल्या मातीतला चित्रपट

**अनेक विदेशी चित्रपट रसिकांना भारून टाकतात, त्यांची चांगलीच चर्चाही होते पण आपल्याच मातीत वेगवेगळ्या भाषांमध्ये विविध चित्रपटांची सकस निर्मिती होत राहिली आहे. या प्रादेशिक चित्रपटांचे रंग टिपणारे हे सदर 'शब्द रुची'तून यावर्षी वाचकांच्या भेटीला येत आहे...**

# 'अब्यक्तो' - अव्यक्त नात्याची गोष्ट

**संतोष पाठारे**

दोन व्यक्तींमधील प्रेम इतर दोन व्यक्तींमधील दुराव्याचं कारण ठरु शकतं? रोजच्या जीवन व्यवहारात आपापली नाती सांभाळताना असे भंडावणारे प्रश्न पडतात. त्यांची उकल होण्यासाठी आपल्या माणसासमोर व्यक्त होणं गरजेचं असतं अन्यथा नातेसंबंधातील हा दुरावा अधिक रुंदावतो.

अर्जुन दत्ता या बंगाली दिग्दर्शकाने त्याच्या 'अब्यक्तो' या पहिल्याच चित्रपटासाठी एक अत्यंत नाजूक विषय निवडला व त्याची संयमित हाताळणी करुन उत्तम चित्रपट पाहण्याचा अनुभव प्रेक्षकांना दिलाय. व्यापक सामाजिक पार्श्वभूमीवर व्यक्तिगत सुखदुःख, नातेसंबंध यांचा पट मांडण्याची बंगाली दिग्दर्शकांची परंपरा सत्यजित राय, मृणाल सेन यांच्यापासून समकालीन कौशिक गांगुली, ऋतुपर्णो घोष यांपर्यंत आहे. अर्जुन दत्ता हे या यादीत जोडलं गेलेलं एक आश्वासक नाव आहे. अर्जुन दत्ताला याआधी फक्त 'द सिक्थ एलिमेंट' हा लघुपट दिग्दर्शित करण्याचा अनुभव होता. कोणत्याही प्रशिक्षण संस्थेत चित्रपट निर्मितीचे धडे न गिरवता केवळ उत्तमोत्तम भारतीय व जागतिक चित्रपट पाहून त्याने चित्रपट दिग्दर्शन करण्याचा निर्णय घेतला. स्वतःच लिहिलेल्या पटकथेवर 'अब्यक्तो' निर्माण केला. नुकत्याच गोव्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील भारतीय पॅनोरमा व मुंबईतील आशियाई चित्रपट महोत्सवात 'अब्यक्तो'ला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'अब्यक्तो' ही गोष्ट आहे दिल्लीत इंजिनियर म्हणून काम करत असलेल्या इंद्रची ! इंद्र आपल्या मैत्रिणीबरोबर राहतोय. वडिलांच्या मृत्यूनंतर तो कोलकत्यात राहणाऱ्या त्याच्या आईकडे येतो. आईला भेटावं, तिचं सांत्वन करावं अशी त्याची अजिबात इच्छा नाही. वडिलांच्या पश्चात अनिवार्य असलेल्या काही औपचारिक गोष्टी त्याला पूर्ण करायच्या आहेत. आईबद्दल मनात असलेली अढी त्याच्या प्रत्येक कृतीतून व्यक्त होत राहते. लहानपणापासून तिने खेळांपासून-शिक्षणापर्यंत टाकलेला दबाव या अढीला कारणीभूत असतो. त्याचा सर्वाधिक ओढा असतो तो त्याचे वडील कौशिक आणि त्यांचा मित्र रुद्र यांच्याकडे! भातुकलीचा खेळ असो की डॉलहाऊसची जोडणी, त्याच्या वडिलांनी त्याला कोणताही खेळ खेळण्याची मुभा दिलेली असते, रुद्र काका कडून त्याने शेक्सपियरचं साहित्य ऐकलेलं असतं अशा या वातावरणात आईचं शिस्तप्रिय असणं त्याला खटकत आलेलं असतं. त्याचाच परिणाम म्हणून तिच्या इच्छेनुसार इंजिनियर झाल्यानंतर तो दिल्लीला नोकरी करणं पसंत करतो. इंद्रचं असं दुरावणं त्याच्या आईला टोचत राहतं. अखेरीस ती त्याला त्याच्या लाडक्या रुद्र काकाला भेटायला सांगते. रुद्रकाका त्याला कौशिक, साथी (आई) आणि त्यांच्या नात्याबद्दल जे काही सांगतात ते ऐकून इंद्रच्या मनात आईबद्दल आदर निर्माण होतो. तिच्या अव्यक्त भावना तो समजून घेतो आणि त्यांच्यात आजवर होऊ न शकलेला एक मनमोकळा संवाद निर्माण होतो.

नवऱ्याचे त्याच्या मित्राबरोबर असलेले प्रेमसंबंध समजल्यानंतर होणारी स्त्रीची तगमग, तिने आपल्या मुलाला यापासून दूर ठेवण्यासाठी केलेला त्रागा हा 'अब्यक्तो'चा मूळ गाभा आहे. मात्र दिग्दर्शकाने ही गोष्ट इंद्रच्या दृष्टिकोणातून मांडली आहे. आई आणि मुलगा यांच्यातील विस्कटलेलं नातं त्याने केंद्रस्थानी ठेवलं आहे. अनेकदा आपण आपल्या वडिलधाऱ्यांच्या वागण्याचे संदर्भ समजून न घेता त्याच्या कृती व निर्णयांकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहतो या सगळ्याचा परिणाम त्या नात्यावर होत असतो. रोजचं आयुष्य अपरिहार्यपणे एकत्र जगावं लागतं मात्र त्याला विसंवादाचीच धार अधिक असते. इंद्र व त्याची आई, साथी यांच्यातील हा विसंवाद चित्रपटाच्या पहिल्या दृश्य मालिकेतच स्पष्ट होतो. इंद्रचा दिल्ली ते कोलकत्ता हा प्रवास, साथीने त्याची जेवणासाठी वाट पाहणं, घरी शक्य तितक्या उशिरा पोहचण्यासाठी इंद्रने प्रवासातच आपलं जेवण उरकून घेणं यातून इंद्र व साथीमधील ताणलेलं नातं अधोरेखित होतं.

इंद्रच्या मनातील आईबद्दलचा तिरस्कार स्पष्ट करण्यासाठी



दिग्दर्शकाने केलेली दृश्यांची मांडणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. अल्झायमर झालेल्या आजीला तो भेटायला गेल्यानंतर आजीने विचारलेला तुला 'आईने खूप मारलं का?' हा प्रश्न इंद्रला पुन्हा त्याच्या बालपणीच्या दुखऱ्या जखमा उघड्या करतो. आपली आई सुंदर दिसते, ती अप्रतिम गाते याचं कौतुक इंद्रला आहे पण उघडपणे तो तिला हे कधीच सांगत नाही. साथीसुद्धा कौशिक आणि रुद्रच्या नात्याबद्दल इंद्रला सांगत नाही. इंद्रच्या मनात त्या दोघांची असलेली प्रतिमा तिला डागाळू द्यायची नाहीय. 'अब्यक्तो'चं एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यातील पात्रांना दिग्दर्शक त्यांच्या स्वभावानुसार जिवंत करतो. त्यांना उगीच काळ्या पांढऱ्या छटा देत नाही. इंद्रची आईविषयक असलेली मतं आपल्याला पटतात, त्याचं आतल्या आत धुमसत राहणं आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे साथीने इंद्रला बालपणापासून दिलेली वागणूक तिच्या तगमगीतून तिने भोगलेल्या मानसिक वेदनेतून आली आहे याचा उलगडा झाल्यानंतर प्रेक्षकांना तिच्याबद्दलही सहानुभूती निर्माण होते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे इंद्रला आपले वडील व रुद्रकाकाच्या संबंधाबद्दल समजल्यानंतर त्याला त्यांचा राग येत नाही. ते दोघं प्रियकर असले तरीही त्याच्या बालपणापासून या दोन व्यक्ती त्याच्या जिव्हाळ्याच्या होत्या व निरंतर त्या तशाच राहतील याचा तो उच्चार करतो. वडिलांच्या या वेगळ्या व कदाचित जग ते स्वीकारु शकणार नाही अशा नात्याला तो मोकळेपणाने स्वीकारतो. आईच्या स्वभावामागची बाजू समजल्यानंतर तो तिच्याशी नव्याने मायेचं नात प्रस्थापित करतो.

दिग्दर्शक अर्जुन दत्ताला अपेक्षित असलेल्या या आशयाला प्रकाशचित्रणकार सुप्रतिम भोल आणि संकलक सुजय दत्ता रे या तंत्रज्ञांच्या कामगिरीने अधिक उठावदार केलंय. सुप्रतिमने या संयत कथेला तितक्याच हळुवारपणे चित्रित केलंय. चित्रपटाचं सुरुवातीचं दृश्य आणि शेवटी होणारी इंद्र व रुद्रची भेट, सुजय दत्ताच्या संकलनामुळे अधिक प्रभावी झाली आहे.

साथीची भूमिका करणारी अर्पिता चटर्जी ही अभिनेत्री स्वतः एक उत्तम गायिका असल्यामुळे रवीन्द्रनाथ टागोर लिखित गीते पडद्यावर तिने सुंदरपणे सादर केलीत. आपल्या नवऱ्याच्या अशा विवाहबाह्य संबंधाना स्वीकारून आतल्या आत कोलमडून गेलेली, आपला मुलगाही त्याच्याप्रमाणे होणार नाही ना? या भितीने त्याच्या वर्तुणुकीवर सतत लक्ष ठेवणारी, प्रसंगी त्याला मारणारी आई, या सर्व छटा अर्पिता चटर्जीने सुंदर रितीने दाखवल्या आहेत. दिल्लीमधील नाट्य वर्तुळात प्रसिद्ध असणाऱ्या अनुभव कांजीलाल या तरुण रंगकर्मीने इंद्रची भूमिकाही तितक्याच ताकदीने केलीय.

आदिल हुसेन या गुणी कलाकाराने रुद्रची लहानशी पण महत्त्वाची भूमिका स्वीकारल्यामुळे दिग्दर्शकाला त्या व्यक्तिरेखेचा आब राखण्यात यश आलयं. रुद्रचं कौशिकवर केवळ शारीरिक प्रेम नाही तर तो त्याच्या मृत्यूपर्यंत त्याची सोबत करतो. साथीची मानसिक घालमेल तो समजू शकतो. प्रेमाच्या या विचित्र तिढ्यात सर्वात जास्त त्रास साथीला होतोय याची त्याला पूर्ण जाणीव आहे.

अर्जुन दत्ताने 'अब्यक्तो'ला शेवटाकडे एका सकारात्मक समेवर आणलंय. व्यक्तीच्या प्रवृत्तीमुळे नात्यात पडणारा पीळ समजुतीने सोडवला तर आयुष्य सुंदर होऊ शकतं, गरज असते ती फक्त एकमेकांना जसे आहोत तसं स्वीकारण्याची. अत्यंत तरलपणे जगण्याचं मर्म सांगणारा 'अब्यक्तो' दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतो.

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in

**सध्या मराठी रंगभूमीवर 'हिंदू कोड बिल' या नाटकाचे प्रयोग होत आहे. हिंदीतील सुप्रसिद्ध नाटककार राजेशकुमार यांनी लिहिलेले, प्रमोद नवार यांनी मराठी भाषेत अनुवाद केलेले तसेच संजय खिलारी यांनी दिग्दर्शित केलेले हे नाटक निर्माते मनोहर एस. पवार यांनी आपल्या 'स्पंदन थिएटर'तर्फे रंगभूमीवर आणले आहे. आजकाल समाजप्रबोधनपर गंभीर आशय असलेल्या नाटकांना सहसा कोणी हात घालत नाही. मनोरंजनप्रधान धंदा करतील अशी नाटके निवडली जातात. त्यामुळे या संदर्भात मनोहर पवार यांचे आपण या नाट्यनिर्मितीबद्दल अभिनंदन करायला हवे.**

# भारतीय स्त्रियांच्या मुक्तिगाथेचा आरंभ सांगणारे नाटक

**सुभाष थोरात**

'**हिं**दू कोड बिल' हे अनुवादित नाटक आहे. अर्थात अनुवादित नाटके मराठी रंगभूमीला नवीन नाहीत. उलट असे म्हणता येईल की - जागतिक दर्जाच्या अनुवादित, रूपांतरित नाटकांनी मराठी रंगभूमी समृद्ध केली आहे.

'हिंदू कोड बिल' भारतीय समाजातील संस्कृती संघर्षाचे प्रतिनिधित्व करते. आपल्या जातिग्रस्त समाज कुठल्याही कलाकृतीला एक 'जातकुळी' असते आणि प्रेक्षकही त्या जातकुळीला अनुसरूनच वागत असतात. अर्थात काही कलाकृती या सर्व भेदाभेदांच्या पलीकडे जाऊन यशस्वी होतात, पण सर्वसाधारणपणे आपल्या कलाविश्वात 'जातकुळीचा' प्रश्न असतो. 'हिंदू कोड बिल' असे नाव असलेले हे नाटक अपरिहार्यपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाशी जोडले जाते कारण या प्रश्नावर जो अटीतटीचा संघर्ष झाला त्यांच्या केंद्रस्थानी बाबासाहेब होते. त्यामुळे 'हिंदू कोड बिल' म्हटले की सर्वांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आठवतात. त्यामुळे हे 'दलित' नाटक असावे अशी एक समजूत रूढ होते आणि या जातकुळीमुळे त्याचा प्रेक्षक ठरतो. अर्थात हे नाटक तसे नाही परंतु भारतीय स्त्रिया या दलित वर्गातच गणल्या जातात, त्या अर्थाने पाहिले तर मग हे 'दलित' नाटक आहे आणि ते स्त्रियांच्या गुलामीला कारणीभूत असणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या विरोधात आहे. त्यामुळे या नाटकाची जातकुळी स्त्रीदास्य विरोधाची आहे कारण 'हिंदू कोड बिल' हे भारतीय स्त्रियांच्या मुक्तिगाथेचा आरंभ आहे.

स्त्रीदास्याचा प्रश्न हा कोणा एका देशाचा प्रश्न नाही तर तो अवघ्या मानवजातीचा प्रश्न आहे. आदिम समाजाच्या विघटनानंतर मानवी समाजाच्या विकास प्रक्रियेत इतर अनेक प्रश्नांसारखाच या प्रश्नाचा जन्म झाला. ज्यामुळे अर्धी मानवसंख्या गुलामीत लोटली गेली. या प्रश्नावर जगभर विपुल लेखन झाले आहे त्यातून स्त्रीमुक्तीचे तत्त्वज्ञान आकाराला आहे. या सर्वांचे सार सांगायचे तर खाजगी मालकीच्या उद्या बरोबरच आपल्याला स्त्रीदास्याचा आरंभ आणि पुरुषसत्तेचा उदय झालेला दिसून येतो. आजही हा प्रश्न संपलेला नाही. आजही त्याची तीव्रता जाणवते आहे. जरी देशोदेशींच्या स्त्रियांना त्यांच्या संघर्षामुळे काही अधिकार मिळाले असले तरी स्त्रीदास्याचा प्रश्न प्रत्यक्ष व्यवहारात आजही कायम आहे. त्यामुळे 'हिंदू कोड बिल' हे नाटक जरी ऐतिहासिक असले तरी ते आजच्या वर्तमानकालीन प्रश्नांना भिडणारे आहे. ते आजचेच नाटक आहे.

भारतीय संदर्भात जेव्हा आपण स्त्रीदास्याचा विचार करतो तेव्हा आपणास भारतीय तत्त्वज्ञानाच्या संघर्षाचा मागोवा घेणे गरजेचे आहे. जो संघर्ष-सनातन वैदिक संस्कृती आणि अवैदिक संस्कृती या स्वरूपात ठळकपणे दिसून येतो. सनातन वैदिक हे नेहमीच पुरुषसत्तेच्या बाजूने उभे राहिले आहेत, तर अवैदिक, ज्यांनी नेहमीच स्त्रियांच्या अधिकारांची बाजू घेतली आहे, हाच धागा आपल्याच या नाटकात पाहावयास मिळतो. इथे स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणाऱ्या अवैदिक तत्त्वज्ञांना आधुनिक तत्त्वज्ञानाची जोड मिळाली. पं. नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या आधुनिक तत्त्वज्ञानाचे नवे भाष्यकार होते. ज्यामध्ये स्त्री-पुरुष समतेचा नवा विचार पुढे आणला गेला होता. या दोघांबरोबरच देशात उदयास आलेले - समाजवादी कम्युनिस्ट पक्ष स्त्री अधिकाराच्या, स्त्री-पुरुष समतेच्या बाजूने उभे होते. या पार्श्वभूमीवर आपण हिंदू कोड बिलाकडे पाहिले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये स्त्रियांच्या सहभागाची गरज निर्माण झाली. त्या बरोबरीने स्त्रियांच्या अधिकाराची चर्चाही समोर येणे स्वाभाविक होते. त्यामुळे १९३६ पासूनच 'हिंदू कोड बिला'ची चर्चा सुरू झाली होती. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर व पं. नेहरूंनी कायदामंत्री असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे 'हिंदू कोड बिला'चे काम सोपवले आणि त्यांना आश्वासन दिले की वाटेल त्या परिस्थितीत मी 'हिंदू कोड बिल' पास करून घेईल. त्यासाठी सत्ता गमावावी लागली तरी हरकत नाही. प्रकृती बरी नसतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे काम अंगावर घेतले. त्यांना माहीत होते की यातील कायदेशीर तरतुदीमुळे स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या अधिकारामुळे, अजूनही धर्मरूढींच्या प्रभावाखाली असलेला


नाटकातील एक दृश्य

हिंदू समाज मुळापासून हादरेल. खूप मोठा विरोध सनातन्यांकडून होईल, परंतु दलित मुक्तिलढ्याइतकेच महत्त्व त्यांनी स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाला दिले होते. त्यामुळे त्यांनी हे आव्हान स्वीकारले आणि हिंदू कोड बिलाची संहिता तयार केली. अपेक्षेप्रमाणे आगडोंब उसळला. धर्मवादी व्यक्तींनी एकच गदारोळ माजवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे जाळले. त्यांना ठार मारण्याच्या धमक्या दिल्या पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर डगमगले नाहीत. पं. नेहरूंनी पक्षातील विरोधकांपुढे मान तुकवली पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रश्नावर ठाम राहिले. माघार घेतली नाही. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।' या संतश्रेष्ठ तुकारामांच्या बाण्याने त्यांनी आपली संपूर्ण ताकद या हिंदू कोड बिलासाठी उभी केली. हे सर्व पैलू अगदी समर्थपणे या नाटकात उभे केले आहेत. खरेतर हे एक चर्चक नाटक आहे. महाराष्ट्राच्या नाट्यपरंपरेत चर्चक नात्याची सुरुवात गो.पु. देशपांडे यांनी केली. नंतर काही हाताच्या बोटावरील नाटके सोडली तर ही चर्चक नाटकाची परंपरा गायबच झाली आहे.

'हिंदू कोड बिल' हे चर्चक नाटक असले तरी ते केवळ गंभीर चर्चांच्या पातळीवर बेतलेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माई आंबेडकर यांच्यातील प्रगल्भ नात्याचा एक भावनिक पदर या नाटकाला आहे. कधी-कधी नाटकात मध्यबिंदू म्हणून तोच समोर येतो. त्यामुळे केवळ एक सुटी चर्चा, गंभीर चर्चा असे या नाटकाचे स्वरूप बनत नाही, नि तरी ते चर्चक नाटक म्हणता येईल कारण नाटककाराला 'हिंदू कोड बिला'च्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री अधिकाराच्या लढ्याला जे महत्त्व दिले ते पुढे आणावयाचे आहे. खरेतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित समजल्या जाणाऱ्या समाजात जन्माला आल्यामुळे त्यांच्या कार्याकडे एका विशिष्ट मर्यादेत पाहण्याची सवय आपल्या जातिग्रस्त समाजाला आहे. त्यामुळे संपूर्ण समाजासाठी, देशासाठी त्यांनी जे योगदान दिले त्याची फार कमी दखल घेतली जाते. त्यांचे अनुयायी त्यांना त्यांच्या हितसंबंधांच्या मर्यादित पाहतात आणि सवर्ण आपल्या सवर्ण मानसिकतेतून बाहेर पडत नाहीत. हिंदू कोड बिलासाठी त्यांनी दिलेला लढा व्यापक स्वरूपाचा होता. त्यासाठी सर्व भारतीय स्त्रियांनी त्यांना सलाम करायला हवा आणि आज पुन्हा स्त्रियांच्या अधिकारावर आक्रमण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्त्रियांसाठी परत चूल आणि मूल हेच वर्तुळ आखण्याची भाषा ऐकू येत आहे, अशा परिस्थितीत स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणारे हे नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल लेखक, अनुवादक, दिग्दर्शक आणि निर्माते यांचे आभार मानायला हवेत.

या नाटकातून आपणास भेटणारे बाबासाहेब खूप वेगळे आहेत. त्यांच्यातील अस्सल मानवी गुणांचे दर्शन आपणास या नाटकातून घडते. सर्व भेदांपलिकडे जाऊन उभे राहिलेले निखळ माणूस म्हणून ते आपल्यासमोर येतात. त्यांचे विशिष्ट आग्रह आहेत पण ते देशहिताला समोर ठेवणारे आहेत. एक कुटुंबवत्सल बाबासाहेब, आपल्याबरोबर काम करणाऱ्या लोकांना समानतेने वागवणारे बाबासाहेब तसेच आदर्श पुरुष हा स्त्रीचा आदर्श मित्र असतो याची जाणीव करून देणारे बाबासाहेब या नाटकात भेटतात. आपल्या विरोधकांशीही ते सहृदयतेने व्यवहार करतात. त्यांच्याबद्दल एकांगी भूमिका घेत नाहीत. चर्चेची भूमिका घेतात कारण त्यांचा व्यासंग त्यांना आत्मविश्वासाच्या अशा पातळीवर घेऊन जातो की आपण जे करतो आहोत ते सत्य तर आहेच पण आपला स्वत:चा म्हणून त्यात तिळमात्र स्वार्थ नाही. त्यांच्या महानतेने अशी उंची आधीच गाठली होती. त्यामुळे हिंदू कोड बिलामुळे ते आणखी महान ठरतील असे नव्हते. म्हणजे त्यांचा या बिलामागील हेतू सर्व स्त्रियांचे भले व्हावे त्यांच्या दास्यमुक्तीची सुरुवात ठरावी हाच

होता आणि हे सर्व या नाटकातून प्रभावीपणे पुढे आणले गेले आहे.

या नाटकाची कमतरतेची बाजू सांगायची तर अभिनयाची सांगता येईल कारण कुठलेही ऐतिहासिक पात्र उभे करताना त्या पात्राची जनमानसातील प्रतिमा महत्त्वाची ठरते. उदा. छत्रपती शिवाजी महाराज स्टेजवर येताना छत्रपती शिवाजी महाराज वाटले पाहिजेत. त्यांची जी जनमानसातील प्रतिमा आहे ती उभी राहिली पाहिजे. तीच गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लागू आहे. स्टेजवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूर्तिमंत उभे आहेत अशी भावना होणे गरजेचे आहे. त्यामुळे वैचारिक पातळीवरील प्रगल्भ आशय प्रेक्षकांच्या त्वरित भावू शकतो. कला शेवटी पुनर्प्रत्ययाचा आनंद देणारी असते. आपल्या मनातील अमूर्त प्रतिमेला आणि आशयाला ती जिवंत स्वरूप देते. ज्यामुळे एकतर आपण त्या पात्राच्या जागी आपणास पाहू शकतो अथवा त्या पात्रात विलीन होऊन जातो. ऐतिहासिक नाटकाच्या संदर्भात ही गोष्ट पाळली गेली पाहिजे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे आणि माईसाहेब आंबेडकरांचे पात्र उभे करताना ही काळजी घेतली पाहिजे. असे असले तरी दिग्दर्शक संजय खिलारी यांना दाद द्यायला हवी. प्रत्येक प्रसंग चढत्या भाजणीने मनात ठसत जातो. सहजपणे नाट्य रंगत जाते. शिवाय या नाटकाचा अभिनय करणारा संच नवखा म्हणावा असा आहे. मोठ्या नाटकाचे या कलावंतांना फार अनुभव नाहीत. तरी ते खूप ताकदीने नाटक पेलतात. खूप कष्ट घेतात. त्यामुळे प्रत्येक प्रयोगागणिक त्यात सुधारणा होत आहेत. तरी दिग्दर्शकाने अभिनयाच्या पातळीवर आणखी लक्ष देणे गरजेचे आहे कारण नाट्यमय घडामोडी नसलेले चर्चक नाटक हे अभिनयाच्या आणि आशयाच्या जोरावरच उभे राहते याचे भान ठेवले पाहिजे.

आजवर मराठी रंगभूमीला अनेक उत्तमोत्तम नाटकांनी समृद्ध केले आहे. भारतीय स्त्रियांच्या मुक्तिगाथेच्या आरंभाची कथा सांगणारे 'हिंदू कोड बिल' हे नाटक या समृद्धीत नक्कीच भर घालणारे आहे.

**– सुभाष थोरात**

भ्रमणध्वनी : ९८६९३९२१५७

॥ग्रंथाली॥




[redacted]य, गूढ [redacted] अनुभवावरून [redacted] त्यांच्या कथांमध्ये [redacted]लीकडचे जग', 'श्य... [redacted] भयाची किनार असलेली [redacted]ळवून ठेवते. त्याचवेळी 'लालीची [redacted].. कारण!(?)', 'एक रेड वाईन नातं'... [redacted]वसाधारण लोकांचा सामाजिक/राजकीय [redacted] उत्तम रीतीने मांडला आहे. 'तो आणि ती...' [redacted]क्तिमत्त्वाच्या मानसिक दोलायमानतेचे वर्णन ज्योती यांनी [redacted]द्य स्वरूपात उत्तम कथन केले आहे. **– पराग अळवणी**

[redacted]खिल
दातार

**मूल्य १३० रुपये**
**सवलतीत ८० रुपये**




डॉ. स्मिता दातार यांच्या कथांशी आपण एकरूप होऊन जातो. कारण त्यांची कथा सांगण्याची शैली जिवंत आणि संवादी आहे. लेखिकेला जाणवणारी आयुष्याबद्दलची, माणसांबद्दलची स्पंदनं विणत त्यांची कथा स्वत:ची अशी एक वीण निर्माण करत जाते. स्त्रीच्या वाट्याला येणारी दु:खं, तिच्यावर होणारे अन्याय, केवळ स्त्री म्हणून तिला मिळणारी दुय्यम वागणूक यावर बोट ठेवताना स्त्रीच्या वेदनांचे संयम, सूचक हुंकार त्या नोंदवत जातात. आपल्या जगण्यातले ताणे-बाणे, राग-द्वेष, क्रिया-प्रतिक्रिया, सूड, वैषम्य यांचे रंग-प्रतिरंग या कथांतून व्यक्त झाल्यामुळे वाचकांचं या कथांशी आपसूक नातं निर्माण होत जातं.

**– मोनिका गजेंद्रगडकर**


**'हिंदू कोड बिल' या नाटकाचे एक निमित्त! पण या नाटकामागे काय पार्श्वभूमी आहे? हजारो वर्षे ज्या समाजव्यवस्थेने स्त्रियांना त्यांचे अधिकार दिले नाहीत. त्या अधिकारासाठी डॉ. बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बिला'ची मांडणी केली. या इतिहासाची पाने उलगडणारा हा लेख**

# हिंदू कोड बिलाचा इतिहास

**रेखा ठाकूर**

एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतीराव फुले यांनी स्त्री शूद्रांवरील दुष्ट अमानुष रुढींविरुद्ध जोरदार आवाज उठवला. मनुस्मृतीने स्त्रीशूद्रांवर लादलेली ज्ञानबंदी, केशवपन, बालविधवांवर ब्राह्मण कुटुंबात होणारे अत्याचार या विरूद्ध सुधारकांनीही आवाज उठवायला सुरुवात केली.

'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती' हे मनूस्मृतीचे सूत्र होते व स्त्रियांवर अमानुष रुढींची बंधने घातल्यामुळे त्यांचे जीवन यातनामय व दुःखी बनले होते.




भारतीय स्त्रियांनी मनुस्मृतीच्या जाचक कायद्यांविरुद्ध जाऊ नये यासाठी गुलामीचे उदात्तीकरण करणारे पातिव्रत्य, योनीशुद्धीसारखे तत्त्वज्ञान शिकविले गेले. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या परावलंबी ठेवण्यात आले. दागिने व सोयी सुबत्तेची चटक लावण्यात आली आणि ह्या सर्वाचा उपयोग होत नाही तिथे बळाचा वापर करून दडपशाही व अत्याचार करण्याचे रुढी आणि कायदे होते.

स्त्रियांची ही गुलामी आणि शोषण, समाजहिताचे नाही. स्त्रीविरोधी दुष्ट रुढी-प्रथा बंद होण्यासाठी कायदे झाले पाहिजेत अशा मागण्या सत्यशोधक व सुधारक चळवळीने केल्या.

सत्यशोधक व सुधारकांच्या मागण्यांमुळे ब्रिटिशांनी हिंदू कायद्यांमध्ये सुधारणा करायला सुरुवात केली. याची सुरुवात सतीबंदीचा कायदा तसेच विधवाविवाह कायद्याने झाली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. याच दरम्यान असे सुटे-सुटे कायदे करण्याऐवजी हिंदूमध्ये प्रचलित असलेल्या रुढींच्या स्वरुपातील कौटुंबिक कायद्याचे संहितीकरण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. हीच हिंदू कोड बिलाची सुरुवात होती. भारतीय कायदे मंडळाद्वारे हिंदू कोडाचे कायद्यात रुपांतर करण्याचे प्रयत्न १९२० साली पहिल्यांदा झाले. परंतु त्यावेळी काँग्रेसची असहकार चळवळ चालू असल्यामुळे या प्रक्रियेत राजकीय पक्षांचा व लोकांचा सहभाग नव्हता. महिला चळवळही प्राथमिक अवस्थेत होती त्यामुळे त्यांचाही सहभाग नव्हता. १९३०च्या सुमारास कायदेविषयक चर्चाविश्वात हिंदू स्त्रियांच्या मालमत्ताविषयक अधिकारांची जोरदार चर्चा सुरू झाली तेव्हा महिला चळवळीने सुट्या-सुट्या कायद्यांपेक्षा सर्वंकष असे 'हिंदू कोड बिल' आणावे अशी मागणी केली. स्त्रियांच्या बाबतीतील कायद्यातील भेदभावांची चौकशी करून ते दूर करण्यासाठी आयोग नेमावा अशी मागणी करणारा ठराव १९३४ साली अखिल भारतीय महिला परिषदेने संमत केला. १९३७ साली हिंदू स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार देणारा कायदा करण्यात आला. त्यावेळी हिंदू विधवांना वारसा हक्क नव्हता. नवीन कायद्याने विधवांना वारसा हक्क व हिंदू अविभक्त कुटुंबात तिच्या मृत पतीला असलेले सर्व अधिकार देण्यात आले.

१९४१ मध्ये या कायद्यातील त्रुटी दूर करून नवीन सुधारणा सुचवण्यासाठी सरकारने एक समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश बी. एन. राव होते. या समितीने अशी शिफारस केली की सर्वंकष हिंदू कोड बिल तयार करण्यात यावे व वारसा हक्क कायदा विवाह कायदा आणि इतर सर्व बाबतीतले कायदे टप्प्याटप्प्याने केले जावे आणि हे लोक सहभागातून घडविण्यात यावे.

हिंदू कोड बिलाच्या प्राथमिक मसुद्याची चर्चा १९४३-४४ मधे कायदे मंडळात झाली. या समितीचे पुनर्गठन परत १९४४ जानेवारीत करण्यात आले व या समितीला प्रागतिक हिंदू कौटुंबिक कायदा तयार करून त्या बाबतीत एक व्यापक सहमती तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली. या समितीने १९४५ या वर्षात संपूर्ण भारतभर फिरून कायदेतज्ज्ञ, सामाजिक संस्था, मान्यवर नेते यांच्याशी संवाद केला. अनेक ठिकाणी या समितीच्या समर्थनार्थ तसेच विरोधातही निदर्शने झाली. या समितीच्या सभासदांमधे

आपापसात मतभेद झाले, परंतु बहुमत सुधारणांच्या बाजूने होते.

बी. एन. राव कमिटीने तयार केलेल्या मसुद्यात स्त्रियांना अधिक हक्क देणाऱ्या तसेच जातिव्यवस्थेवर आघात करणाऱ्या सुधारणा करून आणि ते अधिक धारदार करून कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटी ९ एप्रिल १९४८ रोजी 'हिंदू कोड बिल' बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानसमिती समोर मांडले व १९४८-१९५१ या काळात त्यावर भरपूर साधक बाधक चर्चा झाली.

हिंदू कोड बिलावर संविधान सभेतील कर्मठ व प्रतिगामी प्रतिनिधींनी प्रचंड टीकेचे मोहोळ उठविले. ''हिंदू धर्म संकटात आहे'' असा आक्रोश सभागृहात आणि बाहेर देखील करून बिलाला आव्हान दिले. या परिस्थितीत बिलावरील चर्चा पुरी न होता, बिल पास होण्यापूर्वीच अधिवेशन संपले. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल व इतर मुद्यांवर कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

तीन वर्षे ते बासनात राहिले. त्यानंतर बाबासाहेबांच्या अनुपस्थितीत पंतप्रधान नेहरूंकडून १९५३ - ५६ ते चार वर्षात चार टप्प्यात चार भाग करुन पारित करण्यात आले.

१) हिंदू विवाह कायदा १९५५

२) हिंदू वारसा कायदा १९५६

३) हिंदू मायनॉरिटी आणि पालकत्वाचा कायदा आणि दत्तकविधान व पोटगीचा कायदा१९५६

४) स्पेशल मॅरेज कायदा १९५४

हिंदू विवाह कायद्याने आंतरजातीय विवाहाला मान्यता दिली. द्विभार्या रुढीचा प्रतिबंधक कायदा केला. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार दिला. वारसा कायद्याने स्त्री वारसदारांना मालमत्तेचा संपूर्ण हक्क म्हणजे फक्त उपभोगाचा नव्हे तर मालकी हक्कही दिला. मायनॉरिटी व पालकत्वाच्या कायद्याने स्त्रीला मुलांच्या पालकत्वाचा अधिकार दिला. मुलगी दत्तक घेण्याला मान्यता दिली. परजातीच्या मुलाला दत्तक घेण्यास मान्यता दिली.

हा कायदा येण्यापूर्वी या देशातील उच्चवर्णीय स्त्रियांना नको असलेल्या लग्नबंधनातून सुटण्याचा कोणताही मार्ग वा कुटुंबात होत असलेल्या अत्याचार वा अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी कोणताही मंच उपलब्ध नव्हता. कुटुंबातील अन्याय अत्याचाराच्या व्यवहारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणालाही नव्हता. चुलीतल्या लाकडाप्रमाणे काही झाले तरी स्त्रीने मरेपर्यंत सासरीच राहिले पाहिजे असे समाज मानत होता. किंबहुना राज्यसंस्थेनेही पितृसत्तेचा अनिर्बंध अधिकार मान्य केलेला होता.

मागास जातींमधे जातपंचायतीकडे जाण्याची, काडीमोड घेण्याची सोय होती व विधवा पुनर्विवाहाचा पर्याय होता. परंतु उच्चजातीय स्त्रियांची प्रचंड कोंडी आणि घुसमट करणारी व्यवस्था होती.

हिंदू कोड बिलाने स्त्रियांना नको असलेल्या बंधनातून बाहेर पडण्याचा मार्ग दिला. परंतु बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाद्वारे भारतीय स्त्रियांना देऊ केलेल्या अधिकारांना लोकसभेत जनसंघ व काँग्रेसमधील डॉ. राजेंद्रप्रसादांसारखे उच्चवर्णीय नेते विरोध करत होते. तर संसदे बाहेर हरिहरानन्द सरस्वती उर्फ करपात्री महाराजांच्या नेतृत्वाखाली मोठे निदर्शन चालू होते. करपात्री महाराजांबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा आणि दुसऱ्या हिंदूवादी संघटना हिंदू कोड बिलाला विरोध करत होत्या. हे बिल जेव्हा संसदेत चर्चेला आणले तेव्हा हिंदूवादी संघटनांनी त्याविरुद्ध देशभर आंदोलन सुरू केले. आरएसएसने एकट्याने दिल्लीमधे ७९ विरोधी सभा आयोजित केल्या. आरएसएसने नेहरु व डॉ. आंबेडकरांचे पुतळे जाळले. तर रामराज परिषदेचे संस्थापक करपात्री महाराज म्हणत होते की, हिंदू धर्मात ढवळा ढवळ करण्याचा हक्क फक्त ब्राह्मणांनाच आहे आंबेडकरांसारख्या अस्पृश्याला नाही.

श्यामाप्रसाद मुखर्जी म्हणत होते की हिंदू कोड बिलामुळे हिंदू समाजातील पारंपारिक विवाह पद्धती आणि कुटुंबाच्या स्थैर्यालाच धक्का लागत आहे. 'हिंदू कोड बिल' हा हिंदू समाजावर टाकलेला अॅटम बॉम्ब आहे अशी 'आरएसएस'ची टीका होती.

बाबासाहेब कुटुंबामधे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क देऊ मागत होते. स्त्रियांना समान अधिकार दिल्याने कुटुंब आणि विवाहाच्या स्थैर्याला धक्का लागतो ही आरएसएस ची भूमिका म्हणजे निव्वळ कांगावा होता. स्त्रियांवर कुटुंबात होणाऱ्या अत्याचारांचे व शोषणाचे उघड समर्थन होते. बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलामुळे धक्का लागत होता तो ब्राह्मणी पितृसत्तेच्या नेतृत्वाखालील बंदिस्त जातिव्यवस्थेला. खरी चिंता कुटुंबाच्या स्थैर्याची नव्हे तर ब्राह्मण व उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाला धक्का लागेल याची होती.

**बाबासाहेबांची भूमिका**

बाबासाहेबांनी म्हटले होते की ते हिंदू कोड बिलाला भारतीय संविधानाइतकेच किंबहुना अधिकच महत्त्वाचे मानतात. संविधानाने राजकीय व आर्थिक समता दिली तरी जाती धर्म आणि लिंगाच्या आधारावरील व्यक्तिगत जीवनातील सामाजिक विषमता नष्ट झाल्याशिवाय राजकीय समतेला काही अर्थ नाही असे ते मानत होते. ते म्हणतात, ''जातीजातींमधील विषमता, स्त्री पुरुषांमधील विषमता, जी हिंदू समाजाचा गाभा आहे, तिला धक्का न लावता आर्थिक समस्यांवर कायदे करणे म्हणजे संविधानाचे विडंबन होईल. ते म्हणजे शेणावर राजवाडा बांधणे ठरेल.''

बाबासाहेबांच्या समोरचे महत्त्वाचे उद्दिष्ट हे हजारो वर्षाची सामाजिक आर्थिक शोषणाची, जन्मजात विषमतेची जी बंदिस्त व्यवस्था आहे, जिला साधा ओरखडाही निघालेला नाही त्या व्यवस्थेला खिळखिळी करण्यास चालना देणारे, सामाजिक परिवर्तनाला चालना देणारे संरचनेतील बदल घडवून आणणे. कौटुंबिक कायद्याकडे ते त्यादृष्टीने बघत होते. स्त्रीपुरुष विषमता आणि जातीविषमता या दोन वेगवेगळ्या स्वतंत्र व्यवस्था आहेत असे ते मानत नव्हते. मनुस्मृतीने सांगितलेले स्त्रियांच्या गुलामीचे कायदे कानून हे जातीवर्ण उतरंडीची, जन्मजात विषमतेची व्यवस्था टिकवण्यासाठी आहेत. जाती टिकाव्यात म्हणून आंतरजातीय

विवाहाला बंदी आहे. वरिष्ठ जातीच्या स्त्रीचा शूद्र पुरुषाशी संबंध, वर्णसंकर हा अतिशय गंभीर अपराध मानलेला आहे कारण सर्व खटाटोप जातीवर्ण व्यवस्था टिकविण्यासाठी, वरच्या जातींची प्रतिष्ठा आणि वर्चस्व टिकविण्यासाठी आहे.

जाती बाहेरच्या विवाहाला बंदी, विधवांच्या पुनर्विवाहाला बंदी हे भारतीय स्त्रियांवर बंधने टाकणारे मनुस्मृतीचे जे नियम आहेत त्याच्या द्वारे या ठिकाणची संपूर्ण आर्थिक व्यवस्था, जमिनीची व मालमत्तेची मालकी यांचे नियंत्रण केलेले आहे. मुलींना आणि स्त्रियांना व विधवांना वारसा हक्क नाकारणे, दत्तक घेण्याचा अधिकार नसणे हे सर्व नियम इथल्या मालमत्तादार वरिष्ठ जातींचे हितसंबंध साभाळण्यासाठी आहेत. उच्चवर्णीय, मक्तेदार, जमिनदार जातींकडे, त्यांच्या कुटुंबांकडे हजारो वर्षांच्या परंपरेने आलेल्या मालमत्ता, जमिनी स्वतःच्या कुटुंबांबाहेर जाऊ नये, जातींबाहेर जाऊ नयेत म्हणून घातलेले निर्बंध आहेत आणि या सर्वाला नाव मात्र धर्म आणि नीतीचे दिलेले आहे. त्यामुळेच इथल्या शेतकरी जातींपेक्षा वैश्य जातींचा बिलाला जास्त विरोध होता.

स्वतः बाबासाहेब या बिलातील तरतुदी क्रांतिकारक आहेत असे मानत नव्हते, परंतु यामुळे स्त्रियांना हजारो वर्षे मनुस्मृतीने नाकारलेले अनेक बहुमोल अधिकार दिले. आंतरजातीय लग्नाला मान्यता व घटस्फोटाचा अधिकार हे विवाह कायद्यातील खूप क्रांतिकारक बदल होते ज्यामुळे भारतीय स्त्रियांना जोडीदार निवडीचे व विवाह बंधनातून मुक्त होण्याचे निर्णय स्वातंत्र्य मिळाले.

त्यावेळी हिंदू स्त्रियांच्या समतेच्या अधिकारांना व स्वातंत्र्याला विरोध करणारे आरएसएस आज मुस्लिम स्त्रियांच्या हक्कांची गोष्ट करत आहे. आणि ज्यांच्यावर ते हिंदू विरोधी म्हणून आरोप करत होते ते बाबासाहेब आंबेडकर जहरी टीका झाली तरी हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी प्रचंड विरोध सहन करीत सनातन्यांशी एकाकी लढत होते. हा स्त्रियांच्या मूलभूत अधिकारांचा संघर्ष बाबासाहेबांनी एवढा महत्त्वाचा मानला होता की त्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला. भारतीय राजकारणातील कौटुंबिक कायद्यावरील हा संघर्ष एकीकडे सनातन्यांच्या ढोंगी भूमिकेवर आणि त्याचबरोबर बाबासाहेबांच्या तत्त्वनिष्ठा, बांधिलकी व त्यासाठी त्यांनी केलेल्या अपार मेहनतीवर आणि संघर्षावर प्रकाश टाकणारा आहे



**– रेखा ठाकूर**

भ्रमणध्वनी : ९८१९५८४५५४

obcrekha@gmail.com



||ग्रंथाली||✲||







## प्रतिभेचे चांदणे

**'मर्डर इन द कॅथेड्रल' हे टी.एस. इलियट लिखित नाटक.**
**एक अभिजात नाटक म्हणून आजही या नाटकाचा दबदबा आहे.**
**या नाटकातील संघर्ष कालातीत आहे.**

# मर्डर इन द कॅथेड्रल

**धनंजय गांगल**

**या** नाटकाचे लेखक टी एस इलियट हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महत्त्वाचे कवी, लेखक नाटककार. त्यांना १९४८ चे साहित्याचे नोबेल मिळाले. १९२० पासून कँटरबरी येथे 'कँटरबर फेस्टिवल' हा सांस्कृतिक उत्सव दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये साजरा होतो. १९३५ साली या 'कँटरबर फेस्टिवल'साठी टी. एस. इलियट यांना नाटक लिहिण्याची विनंती करण्यात आली. तेव्हा त्यांनी नाटक लिहिले ते १२व्या शतकातील इंग्लडमधील एका ऐतिहासिक घटनेवर, तेही राजाच्या सरदारांनी एका आर्चबिशपची खुद्द कँटरबरीतील कॅथेड्रल मधेच केलेल्या हत्येबाबत! त्यामुळे सगळ्यांना थोडासा धक्का आणि आश्चर्य वाटलं, पण ते नाटक सादर झालं. सगळ्यांना आवडलं आणि एक अभिजात कलाकृती म्हणून त्याचा पुढे नावलौकीक झाला.




मर्डर इन द कॅथेड्रल हे टी. एस. इलियट यांनी १९३५ साली लिहिलेले नाटक. विसाव्या शतकातील इंग्लडमधील एका ऐतिहासिक घटनेवर हे नाटक बेतलेले आहे. इंग्लंडचा राजा हेन्री-२ आणि त्याचा मित्र थॉमस बेकेट यांच्यातील संघर्षावर आधारित. धर्मसत्ता विरुद्ध राजसत्ता हा संघर्ष त्यावेळच्या इतिहासाचा स्थायीभाव. धर्मसत्तेवर आपला अंकुश असावा म्हणून एका अनपेक्षितपणे आलेल्या संधीचा वापर करून राजा आपला सहकारी बेकेट याची धर्मसत्तेवर नियुक्ती करतो, पण पुढे बेकेट हा धर्मसत्तेचे हित जपण्यावर लक्ष देतो आणि टप्याटप्याने राजाविरुद्ध संघर्षास उभा ठाकतो. बेकेटचे हे बदललेले रूप पाहून राजाचे सहकारी सरतेशेवटी बेकेटचा काटा काढतात. ह्या नाटकातील संघर्ष कालातीत आहे. त्यामुळे गेली कित्येक दशके या नाटकाचा जगभर अनेक भाषेत भाषांतरे आणि नाटक, सिनेमामाध्यमातून प्रयोग होत असतात. फार पूर्वी वाचलेले, बघितलेले हे नाटक मला - नुकताच आरबीआयचे गव्हर्नर उर्जित पटेल यांनी तडकाफडकी दिलेला राजीनामा या विषयावर लेख लिहिताना त्यातील संघर्ष साधर्म्यामुळे आठवले.

थॉमस बेकेटचा जन्म साधारण १११८ साली चीपसाईड या लंडन जवळील एका गावात, एका सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. बाराव्या शतकातील इंग्लंड म्हणजे सरंजामशाही. एकीकडे राजा-राजघराणे, दुसरीकडे जमीनदार-सरदार-उमराव, तिसरीकडे आर्चबिशप-चर्चची धर्मसत्ता यांच्यातील आपापसात आणि एकमेकांशी असलेला संघर्ष. हे कमी म्हणून की काय इंग्लंड-फ्रान्सचे गुंतागुंतीचे सतत रंग बदलणारे शत्रू-मित्राचे नाते! इंग्लंड आणि फ्रान्स भूभागांना वेगळी करणारी जवळपास तीस मैलांची खाडी-सदृश्य समुद्रधुनी आहे. पण त्यावेळी फ्रान्सच्या उत्तरेकडचा भाग अधिकृतपणे इंग्लडचा भूभाग होता. फ्रान्स-इंग्लंडमध्ये कोण राज्यावर येताय आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षा किती टोकाच्या आहेत त्यावर फ्रान्स-इंग्लंडचे संबंध हिंदकळायचे. त्यावेळच्या इंग्लंडमध्ये सर्वसामान्यांसाठी अनिश्चिततेचा, शारीरिक, मानसिक ताणाचा काळ. बेकेटच्या जन्माच्या आसपास दोन-तीन दशकं फ्रान्सशी इंग्लंडचे संबंध बऱ्यापैकी मित्रत्वाचे होते. बेकेटच्या कुटंबाचा त्याने चांगले शिक्षण घेण्यावर भर होता. फ्रान्समधील शिक्षणाचा दर्जा त्यावेळी इंग्लंडपेक्षा वरचा समजला जायचा, तेव्हा दोन देशांमधील या शांततेच्या काळात त्यांनी त्याला शिक्षणासाठी फ्रान्सला धाडले.

फ्रान्समधील शिक्षण पूर्ण करून थॉमस बेकेट जेव्हा इंग्लंडमध्ये आला तेव्हा राजपुत्र हेन्री-२ ने राजघराण्यांतर्गत सत्तासंघर्ष संपवून राजाचा मुकुट चढवला होता. आता त्याचे लक्ष उमराव-सरदार-जमीनदार यांना आपल्यामागे उभं करणं हे होतं. त्यांच्या स्थानिक हितसंबंधाना धक्का पोचू नये एवढीच सहसा त्यांची माफक अपेक्षा असायची. राजघराण्याला आव्हान देण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्यात नसायची. त्यामुळे त्यांचा पाठिंबा मिळवणे तुलनेने सोपे होते. मुख्य संघर्ष होता तो आर्चबिशप आणि चर्चबरोबर! त्याकाळात लोकांवर चर्चचा प्रचंड प्रभाव असायचा आणि मनात आणलं तर

राजसत्ता उलथवून टाकण्याची ताकद चर्चमध्ये होती. एखाद्याला अगदी राजालाही बहिष्कृत म्हणून जाहीर करणं हे चर्चच्या हातातील अहिंसक पण सर्वात प्रभावी हत्यार होतं. बहिष्कृत केलं म्हणजे देवाचा शत्रू म्हणून जाहीर केलं आणि स्वर्गात जायचे सगळे मार्ग बंद होतात अशी फार प्रभावी श्रद्धा होती. शिवाय चर्च जर राजा विरोधात जात असेल तर कुंपणावर बसलेले उमराव-सरदार-जमीनदारही आणि पर्यायाने सैन्यही पाठ सोडण्याचा धोका होता! त्यामुळे राजसत्तेला फार सांभाळून चर्चशी व्यवहार करायला लागायचे. त्यातही कँटरबरीचे आर्चबिशप आणि उत्तर फ्रान्समधील इंग्लंडच्या अधिपत्याखालील असलेल्या प्रदेशातील नॉर्मन बिशप्स अशी दोन मुख्य धार्मिक सत्तास्थानं होती.

इंग्लंडला परतल्यावर थॉमस बेकेट चरितार्थासाठी लहान-सहान नोकऱ्या केल्या आणि पुढे योगायोगाने कँटरबरीचे आर्चबिशप थिओबाल्ड यांच्याकडे प्रशिक्षणार्थी मदतनीस म्हणून रुजू झाला. तो रुढ अर्थाने धर्मोपदेशक नव्हता पण या हुद्यामुळे त्याला चर्चच्या सगळ्या चालीरितींची माहिती होऊ लागली. त्याचबरोबर त्याची उमराव-सरदार-जमीनदार, सरकारी अधिकारी यांच्याबरोबर उठबस होऊ लागली. पुढे-पुढे तर इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी ज्या वाटाघाटी होत त्यातही त्याचा महत्वपूर्ण सहभाग असू लागला. इथे त्याचा राजा हेन्री-२ बरोबर संबंध आला. बेकेट हा वयाने हेन्रीपेक्षा जवळपास एका दशकाने मोठा होता. हेन्रीने त्याच्यातील गुण ओळखले आणि कामकाजात तो आवर्जून त्याचा सल्ला घ्यायला लागला. सल्ला देताना बेकेट च्या मनात कुठलाही वैयक्तिक स्वार्थ नसतो हे हेन्रीने ताडले. वेगवेगळ्या पातळ्यांवर सतत चालणाऱ्या शह-काटशहाच्या राजकारणात बेकेटवर आपण विश्वास ठेवू शकतो हे हेन्रीच्या लक्षात आले आणि हळूहळू त्यांच्यात विश्वासाचे आणि मित्रत्वाचे नाते निर्माण झाले. हा माणूस आपल्या जवळ हवा या विचारातून हेन्रीने बेकेटची नेमणूक टप्प्याटप्प्याने दरबारात वेगवेगळ्या हुद्यावर करत शेवटी चॅन्सलर म्हणून केली. चॅन्सलर हे दरबारात राजानंतर दुसऱ्या क्रमांकाचे पद होते! त्याची ही वेगाने झालेली पदोन्नत्ती काहीजणांना खुपलीही होती, पण सर्वसाधारणपणे बेकेटचे संबंध बहुतेकांशी चांगले होते.

हेन्रीच्या आजोबांकडून हेन्रीकडे सत्ता यायच्या - राजघराण्यांतर्गत संघर्षाच्या धकाधकीच्या काळात अनेक लहानसहान संस्था (इन्स्टिट्यूशन्स), सत्तेसंबंधी अनेक लहान-सहान निर्णय घेण्याचे अधिकार हे राजघराण्यांकडून चर्चकडे आले होते. हेन्रीला ते खुपत होते. आपली सर्वांकुश सत्ता स्थापण्यासाठी हेन्रीला ते अधिकार परत राजघराण्याकडे-त्याच्याकडे आणणे गरजेचे होते. बेकेटचे व्यवहारचातुर्य, मुत्सद्देगिरी आणि त्याचे चर्चशी असलेले पूर्वीचे संबंध यांचा उपयोग करत हेन्री कामाला लागला. बेकेटही चर्च, उमराव-सरदार-जमीनदार, सरकारी अधिकारी किंवा फ्रांसशी वाटाघाटी यात मनापासून सामील होई. पूर्ण जीव ओतून काम करे. तसेच त्या पदामुळे मिळणाऱ्या ऐषोआरामाचाही आनंद उपभोगे, नव्हे त्याची त्याला आता सवयच झाली होती. जी पुढे त्याला मोडावी लागणार होती. कुठलाही वैयक्तिक स्वार्थ न बाळगता आपल्या धन्याशी/संस्थेशी/कामाशी पूर्ण प्रामाणिकता हा हेन्रीला भावणारा त्याचा सर्वोच्च गुण होता. पण त्यावेळी हेन्रीला कुठे माहीत होते की हाच बेकेटचा गुण पुढे आपल्याला आडवा येईल आणि दोघांमधल्या वितुष्टास कारणीभूत होईल!

चर्चकडून काही अधिकार राजघराण्याकडे परत घेण्याबाबत वाटाघाटी चालू असल्या तरी त्याला हेन्रीच्या अपेक्षेप्रमाणे यश येत नव्हते. आपल्या अधिकारांबद्दल आर्चबिशप थिओबाल्ड ठाम होते आणि अचानक एक विचित्र घटना घडली. अनपेक्षितपणे आर्चबिशप थिओबाल्ड यांचे अल्पशा आजाराने निधन झालं! त्यांच्यानंतर त्यांची जागा घेईल अशा ताकदीचा चर्चमध्ये कोणी नव्हता. ना आर्चबिशपांनी आपल्या कुठल्या अनुयायांचे नाव आधी नमूद केले होते. थोडी गोंधळाचीच परिस्थिती होती. दैवयोगाने अचानक आलेल्या या सुवर्ण संधीचा फायदा घ्यायचा असे हेन्रीने ठरवले. त्याने चॅन्सलर बेकेटची नेमणूक हंगामी आर्चबिशप म्हणून केली. बेकेट अधिकृतपणे धर्मगुरू नसला तरी पूर्वी त्याने आर्चबिशप थिओबाल्ड यांच्या हाताखाली सहाय्यक म्हणून काम केले होते आणि त्याला चर्चच्या सगळ्या चालीरितींची पूर्ण माहिती होती. त्याचे संबंधही बहुतेकांशी सर्वसाधारणपणे सौहार्दाचे होते. त्यामुळे अशा गोंधळाच्या परिस्थितीत या नेमणुकीला विशेष विरोध झाला नाही. म्हणजे एकाच वेळेला बेकेट चॅन्सलर आणि आर्चबिशपही!!! हेन्रीची ही सर्वात धूर्त खेळी होती. आता त्याच्या विश्वासू बेकेटच्या मार्फत तो सर्वकाही साध्य करू शकणार होता. चर्चकडून बहुतेक अधिकार आपल्याकडे घेण्याची हीच ती सुवर्णसंधी होती. पण....!

बेकेट आर्चबिशप झाल्यावर हळूहळू चर्चच्या कार्याला वाहून घ्यायला लागतो. प्रथम तो दोन विरुद्ध सत्ताकेंद्र एका व्यक्तीच्या ताब्यात नकोत अशी भूमिका घेऊन चॅन्सलर पदाचा राजीनामा देतो. इथे हेन्रीच्या मनात पाल चुकचुकते. पण यामुळे बेकेटवरचा आर्चबिशप म्हणून लोकांचा, चर्चचा विश्वास वाढेल आणि पुढे आपल्या हेतूस त्याचा फायदाच होईल असेही त्याला वाटते. अर्थात हळूहळू हेन्रीच्या लक्षात येतं की आपली सर्वात धूर्त चाल ही प्रत्यक्षात सर्वात मोठी चूक ठरतेय. बेकेट प्रत्येक टप्प्यावर चर्चची बाजू उचलून धरतो आणि हेन्रीच्या मागण्यांना विरोध करतो. त्याचवेळी तो आपण हेन्रीचेच निष्ठावंत आहोत आणि त्याने घेतलेल्या भूमिकेतच हेन्रीचे सरतेशेवटी भले आहे हेही हेन्रीला पटवून देऊ लागतो. बेकेट खरोखरच चर्चमय झाला होता? का त्यालाही हेन्रीसारखीच सर्वंकष सत्ता ताब्यात असावी आणि त्यासाठी हेन्रीला दुबळं करणं जरुरी वाटतं होतं? इतिहास आणि हे नाटक या बाबतीत संदिग्ध आहे. या शह-काटशहात एका टप्प्यावर आपला मित्र, आता मित्र राहिला नाही तर एक-प्रकारे तो आता शत्रू झाला आहे हे हेन्रीच्या लक्षात येते. हताश होऊन तो चर्च आणि पर्यायाने बेकेटवर बळाचा/सैन्याचा वापर करण्याची धमकी देतो. आता तात्पुरती माघार घेत, चर्चमधील सहकाऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणे

बेकेट गुप्तपणे फ्रान्सकडे रवाना होतो. तिथे बेकेट पोप अलेक्झांडर आणि राजा लुईस यांचा पाठिंबा मिळवतो आणि त्यांच्यामार्फत हेन्रीवर दबाव चालू ठेवतो. हे प्रकरण फार वाढल्यास आणि बाकी चर्चेसही आपल्याविरुद्ध गेल्यास काही खैर नाही हे लक्षात येऊन हेन्रीही सावधपणे पावले उचलतो. वाटाघाटीस तयार होतो. शिवाय त्याला त्याच्या पुत्राची राजपुत्र म्हणून नेमणूक करण्यात त्यावेळच्या प्रथेप्रमाणे आर्चबिशप बेकेटच्या आशीर्वादाची गरज असतेच! वाटाघाटीतील कलमे ठरतात. परत इंग्लंडला आल्यास बेकेटच्या सुरक्षिततेची हमी हेन्री घेतो, पण इंग्लंडमध्ये शिरत असतानाच आपली हत्या होईल ही जाणीव बेकेटला असते. तो अज्ञातपणे आपल्या चर्चमध्ये परत येतो. तेथे त्याचे प्रचंड स्वागत होते. हेन्रीवर दबाव कायम ठेवण्यासाठी अचानक तो हेन्रीच्या काही सहकाऱ्यांना आर्चबिशपच्या अधिकाराने बहिष्कृत घोषित करतो! आता आपल्या राजपुत्राचा राज्याभिषेक तर दूरच पण आपल्यालाच बेकेट बहिष्कृत करेल की काय या भीतीने हेन्री आपल्या जवळच्या सरदारांची तातडीची बैठक घेतो. या बैठकीतील ते त्याचे प्रसिद्ध वाक्य आहे Who will rid me of this turbulent priest?!- या प्रक्षुब्ध धर्मगुरूंपासून मला कोण वाचवेल? त्यातले चार सरदार त्याचा काय तो अर्थ समजतात आणि सैनिकांसह चर्च गाठतात. तेथे ते बेकेटला धमकावतात, पण बेकेट आपल्या निश्चयापासून ढळत नाही. वादावादी होते आणि रागाच्या भरात त्या कॅथेड्रल म्हणजे चर्चमध्येच ते बेकेटची हत्या करतात!

या धक्कादायक घटनेतून सावरल्यावर लगेचच चर्चच्या वतीने बेकेटला संत पद घोषित होते. त्याची हत्या झाली ती जागा पवित्र मानून तेथे भेट देण्यासाठी कित्येक दिवस लोकांच्या रांगा लागतात. इकडे लोकक्षोभापासून सुटका करून घेण्यासाठी ते चारही सरदार देश सोडून पळून जातात. हेन्रीही या कृत्यातून आपली सुटका करून घेण्यासाठी त्या चारही जणांची सरदारकी रद्द करून त्यांना देहदंडाची शिक्षा जाहीर करतो. तेही कमी म्हणून की काय प्रायश्चित्त म्हणून त्याकाळी धर्मात प्रचलित असलेल्या स्वतःवर आसूड ओढू देण्याच्या शिक्षेला सामोरा जातो.

ह्या नाटकातील संघर्ष कालातीत आहे. त्यामुळे गेले कित्येक दशके या नाटकाच्या जगभर अनेक भाषेत नाट्य आणि सिनेमा माध्यमातून प्रयोग होत असतात. फ्रेंच नाटककार ज्याँ अनुई याने १९५९ साली यावरच आधारित बेकेट हे नाटक लिहिले. इलियटचे 'मर्डर इन द कॅथेड्रल' हे त्या काळाला (१९३५) अनुसरून थोडे मेलोड्रॅमॅटिक पद्धतीने लिहिले आहे. त्यात धर्मशास्त्र, ईश्वर यासंबंधीच्या विचारांना पात्रांच्या संवादात सतत स्थान आहे. नाटकात पार्श्वभूमीवर कधी थेट तर कधी पार्श्वगायनातून नन्सचा कोरस सतत ऐकायला येतो. ज्याँ अनुईचे बेकेट हे थेट विषयाला हात घालणारे सेमी-रिॲलिस्टिक पद्धतीने लिहिलेले आहे. ते त्यातील राजकारणाच्या गाभ्याभोवती फिरते. त्याचे ब्रॉडवेवर अनेक प्रयोग झाले. सुरुवातीच्या प्रयोगात लॉरेन्स ओलिव्हिए आणि ॲंथोनी क्वीन यांनी काम केले होते. १९७३ साली प्रा. वसंत कानेटकर यांनी बेकेटचा 'बेईमान' ह्या नावाने मराठी अनुवाद केला. या नाटकाचे निर्माते स्वतः प्रभाकर पणशीकर होते. नाटकाचे दिग्दर्शक होते, पुरुषोत्तम दारव्हेकर. 'बेईमान'मधली प्रभाकर पणशीकर आणि सतीश दुभाषी या दोन दिग्गज अभिनेत्यांच्या जुगलबंदीची आठवण आजही अनेकजण काढतात. हे नाटक मराठी रंगभूमीवरील गाजले आणि याचे जवळपास चारशे प्रयोग झाले. बदलत्या काळाप्रमाणे राज-सत्ता विरुद्ध धर्मसत्ता या संघर्षाची जागा उद्योगपती विरुद्ध कामगार या पार्श्वभूमीने घेतली. याच पार्श्वभूमीवर त्याच सुमारास गुलजार, संपूर्ण सिंग, ऋषिकेश मुखर्जी लिखित आणि ऋषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक-हराम' हिंदी सिनेमा आला होता. त्यात त्यावेळी आपली कारकीर्द सुरू केलेला अमिताभ आणि सुपरस्टार राजेश खन्ना यांनी अनुक्रमे उद्योगपती आणि कामगार नेत्याचे काम केले होते. वेगळ्या अर्थानेही हा संघर्ष बघण्यात येतो. 'आनंद' नंतर अमिताभ आणि राजेशचा हा दुसरा चित्रपट. ह्या चित्रपटापासून 'राजेश युग' संपून 'अमिताभ युग' चालू झाल्याचे समजण्यात येते. त्यावेळी प्रा. वसंत कानेटकरानी आपली कथा चोरल्याचा ह्या चित्रपटावर आरोप केला होता. असो.

**– धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

## एक प्रतिक्रिया

धनंजयजी गांगल यांस

'शब्द रुची' मासिकामधील 'निमित्त' सदराखाली आपले लेखन 'मी टू' वाचले, अगोदरचे लेख वाचताना मला समजेनासे झाले, कारण मी मराठी सातवीचा विद्यार्थी. ऐंशी वर्षांचा आहे. मला मुंबईला साठ वर्षांपूर्वी ज्यांनी घडविले ते माझे मावसबंधू आदरणीय अशोक जैन, अरुण साधू, दिनकर गांगल, श्रीराम लागू, पुष्पा भावे, अनंत भावे हे माझे गुरूबंधू झाले. यांनी मला-दगडाला घडविले म्हणून मी आपणासोबत बोलत आहे. मागील आठवड्यात दिनकरजी गांगल व अनुराधा गांगल यांची वीस वर्षानंतर भेट झाली. त्या भेटीमध्ये मी धनंजय गांगलांचे लेख फार हाय लेव्हलचे आहेत. मला समजत नाही असे सांगितले. तेव्हा आपण लिहिलेला डिसेंबर अंकातला (२०१८) लेख वाचला. लेखाच्या शेवटी रामायण, महाभारतामधील जे उदाहरण आपण दिले त्यामधून आपल्या लेखाचा अर्थ मनाला भावला. माझे मनोगतच आपण व्यक्त केले, त्याबद्दल धन्यवाद.

**– मदनभाऊ मळगट, सोनई**

# एका वाचकाची जडणघडण

## ज्ञानेश्वर शेंडे

**मा**झ्या जगण्याच्या वाटेवर मला आधार देणारे ग्रंथ जागोजागी भेटतात. महाविद्यालयीन कालावधीत आर्थिक परिस्थिती वेळोवेळी खिंडीत गाठून सत्त्वपरीक्षा पाहणारी. लेखनाची-संपादनाची कामं मिळवायची-अभ्यासही जोमानं-कमाईसुद्धा नेमानं असं चालायचं. नव्या उत्साहानं कामाला लागायचं, डोळ्यात स्वप्नांचे पक्षी फडफडत. विलक्षण अस्वस्थतेचा तो काळ.

पुढे धुळ्याहून थेट नाशिक गाठलं. एच.पी.टी. कॉलेजचे ग्रंथालय म्हणजे ज्ञानतीर्थ! अभिरुची असणाऱ्या आणि मुख्य म्हणजे व्यासंग असणाऱ्या अभ्यासू प्राध्यापकांचा सुंदर सहवास लाभला. कलावंत असलेल्या, तसेच वक्तृत्व-वादविवाद स्पर्धेत सातत्याने सहभागी होणाऱ्या भरपूर पारितोषिके पटकाविणाऱ्या मित्र-मैत्रिणींचा गोतावळा जमून आला.चर्चासत्रं, परिसंवाद एच.पी.टी.ला सतत होत असतं.आमचं मराठी वाङ्मय मंडळ फारच सक्रिय होतं. संदर्भग्रंथ कसे हाताळावे, नियतकालिकांचे-दर्जेदार दिवाळी विशेषांकांचे वाचन का आवश्यक असते हे समजावून सांगणारे गुरूजन लाभले. आश्चर्य म्हणजे कॉलेजचे ग्रंथालय आमच्यासाठी फार मोठा स्रोत असूनही प्राध्यापकांनी त्यांच्या घरातील ग्रंथसंपदाही उपलब्ध करून दिली. अनेक चांगली पुस्तकं आपण आपल्या घरात विकत घेऊन वाचली पाहिजेत असा सुसंस्कृतपणा असणारे गुरूजन आयुष्यात आले. नाशिक नगरीत सातत्याने वाङ्मयीन कार्यक्रम-उपक्रम चालायचे, ग्रंथप्रदर्शने व्हायची. व्याख्यानमाला होत्याच.

तात्यासाहेबांचे, कवी कुसुमाग्रजांचे आशीर्वाद लाभले. तात्यासाहेबांच्या घरातच संदर्भ ग्रंथालय होते. दररोज तीन-चार तास तिथेच असायचो. अधून-मधून त्यांची होणारी भेट त्यांच्याशी होणारा सुसंवाद, त्यांच्याकडे येणाऱ्या विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांशी चर्चा...! असे संचित आयुष्यभर पुरून उरते.

महाविद्यालयात अध्यापनाचा अनुभवही घेतला. 'अनुष्टुभ,' 'युगांतर', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' सारखी उत्तमोत्तम नियतकालिके नियमितपणे वाचत होतोच. 'कविता-रती'सारख्या नामांकित नियतकालिकात काम करण्याची संधी मिळाली. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांच्या ग्रंथसंपदेसोबत इतरही पुस्तके घेऊन महाराष्ट्रभर फिरलो. ग्रंथविक्रीही करता येते, हा अनुभव व्यावहारिकदृष्ट्या बरेच काही शिकवणारा. बरे-वाईट अनुभव आले; ते येतातच. चालत-बोलतं प्रशिक्षण असतात हे अनुभव! आयुष्याच्या एका नव्या वळणावर पुन्हा शिक्षकीपेशा आला. जळगावच्या विवेकानंद प्रतिष्ठानमधील वातावरण विद्यार्थ्यांसह, शिक्षकांनाही घडविणारे.

विवेकानंद प्रतिष्ठान संस्थेत डॉ. मु.ब. शहा सरांसोबत तयार केलेल्या 'मातृकविता प्रेरणा' संदर्भग्रंथाचे प्रकाशन झाले. 'आनंदयात्री पु.ल. देशपांडे' या विषयावर २५-३० भाषणे झाली होती, त्या भाषणाची छोटीशी पुस्तिका प्रकाशित झाली. शिक्षणविषयक काही पुस्तिका संपादित केल्या. 'आनंददायी शिक्षण' या विषयावर प्रशिक्षणवर्ग घेता आले.

आयुष्य नित्यक्रमाने पुढे-पुढे सरकत होते परंतु लौकिक अर्थाने स्थिरावत नव्हते. सामाजिक कामाचा संस्कार होता मात्र, केवळ सामाजिक दृष्टी असून चालत नाही, 'आधी प्रपंच करावा नेटका''हेही महत्त्वाचे होते, परिवारावर अचानक कोसळलेल्या आरोग्यविषयक समस्यांनी खोलवर प्रहार केले. भयानक आर्थिक ताण-तणावातून जात असताना 'सर्वात्मका शिवसुंदरा', ही प्रार्थना कृतिशीलपणे साकार करणाऱ्या देवमाणसाची भेट झाली. जैन उद्योग समूहाचे संस्थापक पद्मश्री डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन यांचा म्हणजे मोठ्या भाऊंचा सहवास लाभला. परिवर्तनशील असणाऱ्या वाटचालीचा हा प्रारंभ होता.'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश', या गीतातील एकेका शब्दांची प्रचिती म्हणजे भाऊंचे अभ्यासू, जिज्ञासू, आदर्श कार्यसंस्कृतीची रचना करणारे व्यक्तिमत्त्व. चालते-बोलते विद्यापीठच जणू. मोठ्या भाऊंच्या साहित्यसंपदेशी नातं जुळलं. हे बंध-अनुबंध औपचारिक नव्हतेच, नोकरीचा केवळ एक भाग नव्हते. मोठ्या भाऊंच्या विश्वासातील एक माणूस म्हणून मला स्थान प्राप्त झालं.सलग आठ-साडेआठ वर्षांचा प्रदीर्घ सहवास. प्रेरणादायी, उत्साहवर्धक आणि अनेकदा अतिशय संवेदनशील अशा गांभीर्याने भरलेला.

भाऊ उत्तम वाचक-उत्तम श्रोता-उत्तम विश्लेषक, साहित्यिक प्रतिभाही तेजस्वी. भाऊंनी सहज साधलेला संवादही माणसाला खिळवून टाकणारा.आपलेपणाचं हृद्य नाते जोडणारा एकेक शब्द. भाऊंचं मराठी, हिंदी, इंग्लिश या भाषांवरील प्रभुत्व थक्क करणारं. पत्रलेखन असो वा भाषणासाठी मुद्दे, प्रत्येक बाब शिस्तबद्ध, आखीव-रेखीव, काटेकोर. सकारात्मक विचारसरणी, समर्पकता हे वैशिष्ट्य. विशेषतः मराठीबाबत सांगायचं तर कोणता शब्द वाक्यात कोणत्या जागी त्या-त्या अर्थछटेसह अनुरूप आहे, मनातील भाव अचूकपणे व्यक्त करणारा आहे याबाबत भाऊंची जागरुकता, विलक्षण. उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचन सातत्याने सुरू असायचे. विविध प्रकारचे संदर्भग्रंथ, शब्दकोश, नियतकालिके पाहणे-अभ्यासणे ही त्यांच्या दैनंदिन जगण्यातील एक सुंदर सवयच होती. हे सर्व जवळून पाहण्याची-अनेकदा त्यांच्यासोबत लेखनक्षेत्रातील काही कामे करण्याची संधी त्यांनी मला दिली. माझ्या जडणघडणीसाठी



ही कामे महत्त्वपूर्ण ठरली.

विविध क्षेत्रातील प्रयोगशाली-तत्त्वज्ञानी-जाणती व्यक्तिमत्त्वे मोठ्या भाऊंची भेट घेत, कार्यकर्तृत्वाच्या अवलोकनातून भाऊंपुढे आदराने नतमस्तक होत. आजही होतात. त्यांनी आंतरराष्ट्रीय ख्याती भाऊंनी प्राप्त केली आहे. त्यांच्या मातोश्रींनी, गौराईंनी दिलेल्या सात हजार रुपयातून त्यांनी सात हजार करोड पर्यंतची (वार्षिक) उलाढाल केली.जैन उद्योगसमूहाचा व्याप आणि विस्तार जगभर असून १२० देशांशी संबंधित आहे. दीडशेच्या वर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कार भाऊंनी-संस्थेने प्राप्त केले. नोबेल पुरस्काराच्या दर्जाचा 'कॉफर्ड रीड मेमोरिअल पुरस्कार' प्राप्त करणारे भाऊ आशिया खंडातील दुसरे, भारतातील एकमेव! भारत सरकारच्या 'पद्मश्री' सन्मानासह चार विद्यापीठांनी 'डॉक्टरेट' देऊन त्यांच्या कर्तबगारीचा आदरपूर्वक गौरव केला होता.

जे लेखन माझ्याकडून झालं त्या प्रत्येक शब्दाला - वाक्याला त्यामागील अर्थपूर्णतेला भाऊंचा परिसस्पर्श लाभला आहे. वाचकांसाठी भाऊंनी लिहिलेली आणि भाऊंच्या कार्यकर्तृत्वावर आधारित २०-२५ पुस्तके उपलब्ध आहेत... आणखी काही पुस्तके क्रमशः प्रकाशित होणार आहेत. भाऊंच्या आत्मकथनपर हृद्गताला प्रचंड लोकप्रियता लाभली. 'ती आणि मी' या पुस्तकाचे भावानुवाद विविध भाषांत प्रकाशित झाले आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे यांची प्रस्तावना या आत्मकथनपर हृद्गताला लाभली आहे.

सुखी-संपन्न जीवनाचा गुरूमंत्र म्हणून या पुस्तकाकडे पाहिले जाते. भावना आणि विचारांचे संतुलन, योग्य वेळी, योग्य निर्णय घेण्याची क्षमता अशा अनेक अंगाने प्रस्तुत हृद्गतावर परिसंवाद झाले.'ती आणि मी : संस्कृती संवर्धन,''जगणे सुंदर करणारे पुस्तक' अशा शीर्षकान्वये चारशेच्यावर भाषणं-निवेदनं महाराष्ट्रभर मला करता आली. 'वाचनगाडा''(टाटा मॅजिक खास ग्रंथप्रचार-प्रचार-वितरणासाठी तयार केलेली व्हॅन) घेऊन महाराष्ट्रातील २२-२३ जिल्ह्यात अगदी दूरवरच्या आतल्या साडेतीनशेच्यावर खेडेगावात, लहान-मोठ्या शहरात प्रवास झाला. संपर्क-संवादाचे नेटवर्क तयार झाले. सहा वर्षात ७५,००० च्यावर पुस्तके 'वाचनगाडा' वितरीत करू शकला. वाचकांचा भरभरून प्रतिसाद लाभला. लेखकाची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी अनेक सुहृद परिवारासह जैन हाऊसवर आले. काहींनी फोनवरून संवाद साधला.'स्पेस'चाही अर्थ उलगडून दाखविणाऱ्या 'ती आणि मी' या पुस्तकाला आजही वाचकांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे.'ती आणि मी : प्रतिसाद' पुस्तकात या अनुभवांचे-अभिप्रायांचे प्रतिबिंब वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

आजही लेखन-वाचन-चिंतन-मनन करताना, संदर्भ शोधताना भाऊ आपल्या आसपास आहेत, हे जाणवते. शब्द वाक्ये जपून-चार वेळा तपासून मांडावी लागतात. भाऊंचा हा नैतिक धाक, नितांत आदर आजही आहेच. त्यांचे अस्तित्व संजीवक आहे.

१२ डिसेंबर २०१८ रोजी मोठ्या भाऊंच्या ८१व्या जन्म दिनानिमित्त मला जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. जळगावचे चेअरमन अशोकजी जैन यांच्या शुभहस्ते चावी प्रदान करून अल्टो कार सप्रेम भेट देण्यात आली. होतकरू लेखकाला सन्मानित करणारा हा क्षण माझ्यासाठी अनमोल... शब्दांच्या पलीकडचा! आपल्या धडपड्या लेकराला मिळणारे प्रोत्साहन पाहून आई-वडिलांचे मन भरून येणे स्वाभाविकच. पत्नी आणि मुलींनाही ही वार्ता आनंदाचा ठेवा देणारी!

वाचनगाडा' असो वा 'अल्टो कार' साहित्यसंपदेची उत्तमोत्तम सेवा माझ्या हातून घडो ही माझी सद्भावना आहे. जगातील सर्वात सुंदर चेहरा कोणता?' पुलंनी या प्रश्नाला दिलेले उत्तर खरोखरच खूपच सुंदर आहे, पुलं म्हणाले, 'कृतज्ञता असणारा चेहरा!''ही सुंदरता माझ्या मनाला कायम लाभो!

**- ज्ञानेश्वर शेंडे**
भ्रमणध्वनी : ९४२२७७०४६३
dnyaneshwarshende26@gmail.com

ठाणे वाचकदिन

# बालवाचकदिन : अभिवाचन स्पर्धा

'मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे' आणि 'ग्रंथाली वाचक चळवळ' यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवाचन स्पर्धेचे आयोजन ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयात दि. २२ डिसेंबर २०१८ रोजी, सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत करण्यात आले होते.

'ग्रंथाली वाचक चळवळ' ही प्रकाशन विश्वात अग्रेसर असलेली संस्था महाराष्ट्रात वाचक चळवळ उभारावी म्हणून सातत्याने प्रयत्न करीत आहे. ग्रंथप्रदर्शन, बालझुंबड, ग्रंथदिंडी असे विविध उपक्रम महाराष्ट्रातील गावोगावी आयोजित करून वाचक संस्कृती वृद्धिंगत करण्याचे काम करीत आहे. दरवर्षी २५ डिसेंबर रोजी वाचकदिन साजरा करण्याचा उपक्रम तर गेली ४४ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. याचाच एक भाग म्हणजे बालवाचक दिन, ठाण्यात साजरा करण्याचे योजण्यात आले. मराठी ग्रंथसंग्रहालयाने हा उपक्रम करण्यास पुढाकार घेतला. त्यानुसार दोन्ही संस्थांच्या वतीने हा कार्यक्रम पार पडला.

ठाण्यातील वीस शाळांची निवड करण्यात आली. या प्रत्येक शाळेला पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. या पुस्तकांवर विद्यार्थ्यांनी अभिवाचन करावे, अशी ही संकल्पना होती. प्रत्येक शाळेत सहभागी झालेल्या इयत्ता सातवी ते दहावीतील विद्यार्थ्यांची प्राथमिक स्पर्धा शालेय स्तरांवर घेण्यात आली. प्रत्येक शाळेत प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक निवडण्यात आले. त्यांना रुपये तीनशे, दोनशे व शंभर अशी रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. अशी प्राथमिक फेरी वीस शालेय स्तरांवर घेण्यात आली.

प्रत्येक शाळेतून निवडलेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांची अंतिम फेरी मराठी ग्रंथसंग्रहालयात २२ डिसेंबर २०१८ रोजी घेण्यात आली. या साठ विद्यार्थ्यांची अभिवाचन स्पर्धा खूप चुरशीची झाली. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन उत्तेजनार्थ तसेच विशेष तीन पुरस्कार विजेते निवडण्यात आले.

सुप्रसिद्ध नाटककार वामन तावडे आणि अभिनेता दिग्दर्शक दुर्गेश आकरेकर यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

ही स्पर्धा यशस्वी व्हावी म्हणून 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली, धनश्री धारप यांनी आयोजनात सर्वतोपरी सहकार्य केले. मराठी ग्रंथसंग्रहालयातील विश्वस्त, व्यवस्थापक मंडळ आणि कार्यकारी मंडळ यांचे मोलाचे





सहकार्य लाभले. यात विद्याधर वालावलकर (अध्यक्ष), विद्याधर ठाणेकर (कार्याध्यक्ष), चांगदेव काळे (कार्यवाह), संजय चुंबळे (कार्यवाह), महादेव गायकवाड (कार्यवाह), अनिल ठाणेकर (कार्यवाह), सीमा दामले, साधना जोशी, आशा जोशी, वृषाली राजे, संजीव फडके, दुर्गेश आकरेकर, बापट, कृष्णा कोळी यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच ग्रंथसंग्रहालयाच्या सेवकांचेही सहकार्य मोलाचे होते.

अंतिम फेरीचे उद्घाटन सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त ग्रंथाली, डॉ. लतिका भानुशाली, मराठी ग्रंथसंग्रहालयाचे कार्याध्यक्ष विद्याधर ठाणेकर यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी वाचनसंस्कृती वाढीसाठी 'ग्रंथाली'ने काय काय उपक्रम केले याविषयी सुदेश हिंगलासपूरकर यांनी माहिती दिली. विद्याधर ठाणेकर (कार्याध्यक्ष) यांनी मोठी ग्रंथसंग्रहालय वाचक चळवळ व ग्रंथालय चळवळ पुढे नेण्यासाठी जे उपक्रम राबवीत आहे त्याविषयी माहिती दिली. या स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकांना मराठी ग्रंथसंग्रहालयाचे मोफत सन्माननीय सभासदत्व देण्यात येईल, असे जाहीर केले. ठाण्यातील बालवाचक घडविण्याच्या उपक्रमात 'ग्रंथाली'च्या वतीने ज्यांनी अनेक वर्षे प्रयत्न केले ते अविनाश बर्वे, सौ. बर्वे आणि श्रीधर गांगल यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. बालकवाचक स्पर्धा निकाल - प्रथम क्रमांक झुंजारराव कृपा किशोर, द्वितीय क्रमांक सोहा प्रभात जोशी, तृतीय क्रमांक प्रियांका सुयश लिमये, उत्तेजनार्थ सौम्या समीर मराठे, उत्तेजनार्थ पूनम दत्त कांबळे, लक्षवेधी श्लोक कदम, दिप्ती किरण मालुसरे, अथर्व यशवंत मालवीय. परीक्षक - वामन शंकर तावडे, दुर्गेश मोहन आकेरकर.

अंतिम स्पर्धेत विजयी झालेल्या विजेत्यांना रु. १०००/-, ७५०/-, ५००/- असे प्रथम, द्वितीय, तृतीय रोख पुरस्कार प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ विजेत्यांना रु. ३००/- रोख आणि विशेष पुरस्कार रु. २००/- असे रोख रकमेचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. शिवाय प्रत्येकाला प्रमाणपत्र आणि पुस्तक भेट देण्यात आले.

**- चांगदेव काळे**

॥ग्रंथाली॥ चौरस वाचकदिन
कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## २४ डिसेंबर २०१८

**वा**चन ही माणसाला ज्ञानाकडे घेऊन जाणारी गोष्ट. लिखित जगाचा सगळा डोलारा हा मुळी समाजात असलेल्या वाचन कौशल्यावरच आधारित आहे. वाचणारे वाचक आहेत या विश्वासावरच साहित्य निर्मितीचे सांस्कृतिक शिवधनुष्य प्रकाशन संस्था पेलत असतात. ग्रंथाली ही मुळातच वाचक चळवळ! म्हणूनच वाचक घडवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे मानून गेली ४४ वर्षे दरवर्षी २५ डिसेंबर रोजी नियमितपणे कोणताही खंड न पडता 'वाचकदिनाचा' सोहळा हा साहित्यिक उत्सव म्हणून ग्रंथाली साजरी करते .

यावर्षी देखील २४ आणि २५ डिसेंबर २०१८ रोजी दादर येथे कीर्ती महाविद्यालाच्या पटांगणावर हा साहित्यिक उत्सव वाचकांच्या प्रचंड उपस्थितीत संपन्न झाला. यंदा वाचकदिनाचे औचित्य साधून ग्रंथालीने साहित्यावर आधारित तीन स्पर्धांचे आयोजन केले होते. पहिली स्पर्धा होती, मुक्काम पोस्ट आई (संदीप काळे), पंखाविना भरारी (शरयू घाडी), आमची आई (किशोर कुलकर्णी) या 'ग्रंथाली'च्या तीन पुस्तकांवर आधारित 'आई' या विषयावर स्वरचित लेख आणि कविता स्पर्धेचा भाग म्हणून मागवले होते. यातील निवडक लेख आणि कवितांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन २४ डिसेंबर रोजी करण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून चांगदेव काळे आणि डॉ. लतिका भानुशाली यांनी जबाबदारी पार पडली. यातील सर्वोत्तम लेखाचे विजेते आहेत अजित सावंत, संजीवनी मोकाशी, अनिल दाभाडे, तर उत्तेजनार्थ पारितोषिक रेखा नाबर यांना देण्यात आले. सर्वोत्तम कवितेचे विजेते आहेत डॉ. संजीवकुमार सोनावणे, रुपाली खैरनार, प्रदीप कासुर्डे, तर उत्तेजनार्थ पारितोषिक शिवाजी गावडे यांनी प्राप्त केले .

दुसरी स्पर्धा ही राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धा होती. या स्पर्धेची प्राथमिक फेरी नाशिक, पुणे, मुंबई, नागपूर आणि ठाणे, अंबरनाथ या पाच केंद्रांवर घेण्यात आली. यातील विजेत्यांची अंतिम फेरी ही २५ डिसेंबर २०१८ ला सकाळी कीर्ती महाविद्यालाच्या पटांगणावर पार पडली .नाशिक केंद्राचे आयोजक, पुस्तक पेठ, नाशिक यांच्या वतीने निखिल दाते आणि मुक्ता दाते यांनी जबाबदारी पार पाडली. मुंबई केंद्राची जबाबदारी चंद्रकांत मेहेंदळे आणि मृण्मयी भजक, श्रीनिवास नार्वेकर यांनी पार पाडली. ठाणे, अंबरनाथ केंद्राची जबाबदारी योगिनी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ आणि सुनील चौधरी तसेच 'अर्थात क' या संस्थेच्या वतीने राजेश नाडकर, राजेश जगताप आणि किरण येले यांनी सांभाळली तर पुणे केंद्राची जबाबदारी पुस्तक पेठ यांच्या वतीने संजय जोशी आणि माधव वैशंपायन यांनी सांभाळली, कोल्हापूर केंद्राची जबाबदारी 'अक्षर दालन' यांच्या वतीने सुधांशू नाईक, रवींद्रनाथ जोशी आणि राहुल कुळकर्णी यांनी पार पाडली .

वरील स्पर्धांसाठी प्रा. नीला उपाध्ये, प्रा. शैला हर्डीकर, हिमांशू स्मार्त, सोनाली नवांगुळ, स्वानंद बेदरकर, प्रमोद लिमये, मेधा अलकरी, राजीव जोशी, दत्ता सावंत यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

या स्पर्धेतील विजेते आहेत १. आत्मभान, कोल्हापूर –धाकटे आकाश २. अश्विनी गोडसे, रोहित सुर्वे – बाजाराची वाट, स्नेहल जंगम, साठ्ये महाविद्यालय – भागलेला चांदोबा.

याशिवाय 'ग्रंथाली आणि ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केवळ ठाण्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी वेगळी बालअभिवाचन स्पर्धाही आयोजित करण्यात आली. त्याची जबाबदारी चांगदेव काळे, विद्याधर वालावलकर, विद्याधर ठाणेकर, सांभाळली तर परीक्षक म्हणून दुर्गेश आकेरकर, वामन तावडे यांनी काम पहिले. एकूण २१ शाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी आपला सहभाग नोंदवला. यातील विजेते पुढीलप्रमाणे. झुंजारराव कृपा किशोर, जोशी सोह प्रभात, लिमये प्रियांका सुयश, मराठे सौम्या समीर, कांबळे पूनम दत्त, कदम श्लोक मालुसरे दीप्ती किरण, मालवीय अथर्व यशवंत.

यानंतरची तिसरी आव्हानात्मक स्पर्धा होती 'मला आवडलेलं दलित आत्मकथन'. या विषयावर निबंध आणि त्यातील मुद्याचे सादरीकरण असे स्पर्धेचे स्वरूप होते. 'बलुतं' या मराठी साहित्यात क्रांतिकारी ठरलेल्या आत्मकथनाला चाळीस वर्षे पूर्ण झाली. एकूणच मराठी साहित्याच्या दिशा आणि दशा या आत्मकथनाने बदलून टाकल्या. या निमित्ताने दलित साहित्यातील आत्मकथनांचा मागोवा घ्यावा यासाठी या स्पर्धेचे विद्यार्थी गट आणि शिक्षक गट अशा दोन स्तरांवर आयोजन करण्यात आले होते. क.जे. सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय आणि 'ग्रंथाली' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धे साठी भगवान इंगळे, आशा इंगळे आणि शिरीन कुलकर्णी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. यातील शिक्षक गटाचे विजेते होते मीरा कुलकर्णी, मृदुला वाघमारे तर विद्यार्थी गटाचे विजेते होते विकास सौंदरमळ, दिव्या सरमळकर आणि कोमल दवणे.

या तिन्ही स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण सोहळा २५ डिसेंबरच्या संध्याकाळी संपन्न झाला.

२४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या '#मी टू' या

४४ ग्रंथाली चौरस वाचकदिन
कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## अभिवाचन, लेख, निबंध, कविता या स्पर्धांमधील विजेत्यांचा पुरस्कारवितरण सोहळा




चर्चासत्रात, या चळवळीचा समाजावर नेमका कोणता बारावाईट परिणाम होऊ शकतो याच्यावर चर्चा करण्यासाठी आमंत्रित वक्ते होते ॲड जाई वैद्य, पत्रकार संजीव लाटकर, ॲडगुरु भरत दाभोळकर, लेखिका वंदना खरे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे आणि ग्रंथसखा श्याम जोशी. विविध विषयातील तज्ज्ञ वक्ते एकत्र आल्याने चर्चेमध्ये अनेक पैलूंचा उहापोह झाला.



'न्यूज व्हल्यू' म्हणून या चळवळींकडे न बघता संस्थात्मक पातळीवर याचा विचार होणे गरजेचे आहे असे मत संजीव लाटकर यांनी मांडले तर जाई वैद्य यांनी या मागची कायदेशीर बाजू मांडताना ही सामाजिक माध्यमातून सुरू झालेली चळवळ असल्याने या संदर्भात कोणताही कायदा नाही त्यामुळे संबंधित व्यक्तीवर कारवाई करता येत नाही अशी कायदेशीर बाजू स्पष्ट केली. मात्र पुरुषही मानहानीचा दावा करू शकतात. 'यू आर नॉट अलोन' ही टॅगलाईन असल्याने लोक काय म्हणतील ही भीती दूर करण्यासाठी ही चळवळ आहे, कोर्टात जाणे किंवा न जाणे हे पूर्णपणे ऐच्छिक आहे असेही मत त्यांनी स्पष्ट केले. या चळवळीचा दुरुपयोग होऊ शकतो का या प्रश्नाचा उहापोह करताना लाटकर यांनी अमेरिकेतील डेटा सदर करून याचे प्रमाण २ ते १०% असून सत्य केसेसचे प्रमाण मात्र ९०% असल्याचे एका पाहणीत स्पष्ट झाले असल्याचे सांगितले.




वंदना खरे आपले मत मांडताना असे म्हणाल्या की 'गुड वुमन' आणि 'बॅड वुमन' असे दोनच पर्याय समाजाने बाईसाठी उपलब्ध करून दिल्याने, 'गुड वुमन' ही आदर्श असल्याने सहसा अत्याचार झाला तरी गप्प बसण्याकडेच स्त्रियांचा सामजिक कल असतो हे पुरुष प्रधान सत्तेला पोषकच ठरते. त्यामुळे 'मी टू'ची चळवळ ही बाईला न्याय्य हक्क मिळवून देणारी चळवळ आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.



भरत दाभोळकर यांनी विरोधी मत मांडत सांगितले की आरोप झालेल्या व्यक्ती या सुप्रसिद्ध असल्याने याचा बोभाटा जास्त झाला. जर सामान्य माणसांवर हे आरोप लादले असते तर इतकी चर्चा समाजात झाली नसती. पुढे ते असेही म्हणाले की हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध नटाबरोबर एक दिवस, एक तास, एक रात्र व्यतीत करायला मिळावा म्हणून अक्षरशः गयावया करणाऱ्या अनेक चांगल्या घरातल्या मुलीही मी पहिल्या आहेत. नकार मिळालेल्या या मुली #मी टूच्या माधमातून याचा बदला घेण्यासाठी या चळवळीचा दुरुपयोग करू शकतात अशीही भीती आहेच. 'पिंक' या सिनेमाचे उदाहरण देत ते म्हणाले की आपल्याकडील आणि पाश्चात्त्य देशातील लोकांची मानसिकता ही भिन्न आहे. या सिनेमातील मुली सगळ्याच गोष्टींना होकार देत मग एकदम शेवटी शरीसंबंधाला नकार देताना दाखवल्या आहेत, पण इथल्या पुरुषप्रधान मानसिकतेला हे समजून घेण्याची कुवत नाही हे स्त्रियांनी समजून घेणे गरजेचे आहे असे परखड मत त्यांनी मांडले.



आपले मत व्यक्त करताना मानसोपचार तज्ज्ञ राजेंद्र बर्वे यांनी असे मत मांडले की माझ्याकडे येणाऱ्या केसेसमध्ये घरगुती लैंगिक अत्याचाराच्या घटना या सर्वाधिक आहेत. ज्या कुटुंब व्यवस्थेचा आपल्याला अभिमान आहे त्याच कुटुंबात या घटना घडतात ही खेदजनक गोष्ट आहे.



ग्रंथसखा श्याम जोशी यांनी आपले विचार मांडताना, हा सनातन काळापासून चालत आलेला प्रश्न आहे असे मत मांडत समाजात लैंगिक साक्षरता असणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले

या चर्चासत्रात वाचकांनीही आपला सहभाग नोंदवला. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन संजीव लाटकर यांनी केले. ●



॥ग्रंथाली॥ चौरस वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

## २५ डिसेंबर २०१८

'ग्रंथाली'च्या ४४ व्या दोन दिवसीय वाचकदिनाचा दुसरा दिवस २५ डिसेंबर रोजी कीर्ती महाविद्यालयाच्या पटांगणावर संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात संजय कृष्णाजी पाटील लिखित पाच पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाने झाली. एकाच लेखकाची तीन पुस्तके आणि दोन कवितासंग्रह एकाचवेळी प्रकाशित होण्याचा अभूतपूर्व प्रसंग यानिमित्ताने 'ग्रंथाली'च्या व्यासपीठावर घडून आला. या प्रकाशनसमारंभासाठी एकूण सहा वक्ते आमंत्रित होते. पहिले वक्ते होते 'अंकुश' आणि 'तेजाब' यांसारख्या चित्रपटातून व्यावसायिक चित्रपट आणि कलात्मक चित्रपट ही दरी मिटवून टाकणारे सुप्रसिद्ध दिग्दर्शक एन. चंद्रा. दुसरे वक्ते होते 'व्ही. शांताराम जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित दिग्दर्शक राजदत्त, ज्यांचे 'मधुचंद्र' आणि 'शापित'सारखे राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपट आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत. तिसरे वक्ते होते, हिंदी, मराठी, मल्याळम, तमीळ चित्रपटांमधून आपल्या अभिनय कौशल्याचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवणारे अभिनेते सयाजी शिंदे तर चौथे वक्ते होते 'रंगायन' आणि 'अविष्कार'चे संपादक, ९४ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण काकडे. यांजबरोबर अभिनेत्री मुक्ता बर्वे आणि कवी-संपादक अरुण शेवते हेही वक्ते म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना एन.चंद्रा यांनी 'दशक्रिया' या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळण्याआधीची एक आठवण उद्‌धृत केली. चित्रपट कॅटेगरी या विभागात 'अॅडाप्टेड' असे लिहिण्याऐवजी चुकून 'ओरिजनल' असे लिहिले गेले होते. वास्तविक हा चित्रपट बाबा भांड यांच्या कादंबरीवर आधारित असल्याने 'अॅडाप्टेड' लिहिणे गरजेचे होते. या एका तांत्रिक चुकीमुळे सर्व गोष्टी जुळून आल्या असल्या तरी ज्युरी चित्रपटाला पुरस्कार देण्यास तयार नव्हते. एन. चंद्रा पुढे म्हणाले की, कोणाच्या तरी तांत्रिक चुकीचा फटका कलावंताला का बसावा? मी पोटतिडिकेतून उभ्या केलेल्या प्रश्नामुळे शेवटी ज्युरींचा विरोध मावळला आणि चित्रपटास योग्य तो न्याय मिळाला.

आपले मनोगत व्यक्त करताना राजदत्त यांनी ''संजय हा केवळ लेखक नाही तर चित्रकथेच्या आधारे सिनेमाच्या माध्यमातून समाजमन ढवळण्याचे, जागृत करण्याचे काम तो करतो'' असे मत व्यक्त केले.

संजय पाटील यांचा गौरव करताना अरुण काकडे म्हणाले की पु.ल. अकादमीच्या एका कार्यक्रमात 'अकादमी नेमके काय करते?' असा प्रश्न व्यासपीठावर उपस्थित केला होता. त्यावेळी अधिकारी असणारे संजय पाटील यांनी ती गोष्ट मनावर घेतली आणि त्यानंतर लगेचच 'एकांकिका महोत्सव' आयोजित केला.

आपले मनोगत व्यक्त करताना अरुण शेवते म्हणाले की ''एकाच लेखकाची पाच पुस्तके एकाच वेळी प्रकाशित होण्यासाठी लेखकाचे भाग्य आणि संपादकाचे-प्रकाशन संस्थांचे धाडस या दोन्ही गोष्टी जुळून याव्या लागतात.'' आज वाचकदिनी या गोष्टी जुळवून आणल्याबद्दल त्यांनी 'ग्रंथाली'चे विशेष कौतुक केले.

मुक्ता बर्वे आपले मनोगत व्यक्त करताना असे म्हणाल्या की, संजय पाटील यांचे साहित्य असे सहज वाचून बाजूला सारता येत नाही. ते वाचकाला बधिर करते. याप्रसंगी मुक्ता बर्वे यांनी 'विषय विचाराधीन आहेत पण संदर्भ उपलब्ध नाहीत' आणि 'आता काय करायचं या सामाजिक बांधिलकीचे' या दोन कवितांचे अभिवाचन केले. सयाजी शिंदे यांनी संजय पाटील यांच्या एका लेखाचे अभिवाचन करीत मैत्रीचे बंध उलगडले.

या प्रकाशन समारंभात लेखक म्हणून व्यक्त होताना संजय कृष्णाजी पाटील अत्यंत भावुक झाले होते. जुन्या आठवणींना उजाळा देताना ते १९८८ साली 'ग्रंथाली'ने आयोजित केलेल्या 'ग्रंथमोहोळ' या उपक्रमाविषयी ते भरभरून बोलले. त्यावेळी कार्यकर्ता म्हणून पुस्तके डोक्यावरून वाहणे, बसच्या टपावर ठेवणे किंवा उतरविणे या सगळ्या जबाबदाऱ्या अत्यंत आनंदाने पार पाडल्या. त्यावेळी उचललेला सांस्कृतिक आणि साहित्यिक भार



आज सत्कारणी लागल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी 'गोफणगुंडा' या स्वरचित कवितेचे वाचन करून ते म्हणाले की अनेक प्रतिभावंत लेखकमंडळींचा सहवास उभरत्या वयात मिळाल्यामुळे माझ्यातील कवी, लेखक घडत गेला. आता जरी प्रशासकीय अधिकारी असलो तरी मूळ पिंड मात्र कवी आणि लेखकाचाच आहे असे त्यांनी विनम्रपणे नमूद केले.या संपूर्ण प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. लतिका भानुशाली आणि अस्मिता पांडे यांनी केले.

या वाचकदिनी एक विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. निमित्त होते ज्येष्ठ समीक्षक आणि सर्जनशील लेखक डॉ. म.सु. पाटील यांच्या 'सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध' या मराठी समीक्षा ग्रंथास मिळालेला अत्यंत प्रतिष्ठेचा असा साहित्य अकादमी पुरस्कार! नंबर मार्कर, विक्रीकर विभागातील कारकून, अधिव्याख्याता, साहाय्यक प्राध्यापक, प्राध्यापक ते प्राचार्य असा उत्तरोत्तर ज्यांच्या कारकिर्दीचा आलेख बहरत गेला, त्या म.सु. पाटील यांना आयुष्याच्या संध्याकाळी हा पुरस्कार जाहीर झाला, तो खरं तर या आधीच मिळायला हवा होता ही खंत यानिमित्ताने सूत्रसंचालक डॉ. लतिका भानुशाली यांनी निवेदनात व्यक्त केली. याप्रसंगी निलेश जाधव यांनी साकारलेले म.सु. पाटील यांचे चित्र त्यांना भेट म्हणून अर्पण करण्यात आले. 'ग्रंथाली'चे आधारस्तंभ आणि 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चे संस्थापक दिनकर गांगल यांच्या हस्ते पाटील सरांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी दिनकर गांगल यांनी १९८२ साली आयोजित केलेल्या 'ग्रंथप्रसार' या उपक्रमाच्या आठवणी जागृत केल्या. ही ग्रंथयात्रा नाशिक मार्गे मनमाडला गेली. आधी कसलीही ओळख नसताना केवळ विनंती केल्यावर या यात्रेचं मनोभावे स्वागत आणि आदरातिथ्य म.सु. पाटील यांनी केले. या आठवणी त्यांनी जागवल्या. पुढे ते असेही म्हणाले की, ''दलित कवितांचे वेगळे सौंदर्यशास्त्र नको'' हा ठाम विचार त्यांनी मांडला. समकालीन कवींवर आवर्जून लिहिलं.

म.सु. पाटील यांनी या वयात मिळालेला हा पुरस्कार अनपेक्षित असल्याचे सांगितले आणि आपल्या भाषणात म्हणाले की, ''या वयात हा पुरस्कार मिळवलेला मी एकटाच असेन. मी वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची समीक्षा केली पण काव्य हा माझा विशेष आवडता प्रांत राहिला. इंदिरा संत, मर्ढेकर, दिलीप चित्रे, सदानंद रेगे अशा अनेक कवींच्या कवितांवर मी समीक्षात्मक लेख लिहिले.'' स्वत:च्या समीक्षा लेखनाचा त्यांनी थोडक्यात आढावा घेत कवितेतील भावनिकता कुठेतरी आटत चालली आहे, अशी खंत त्यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

या सत्कार समारंभानंतर संजय कृष्णाजी पाटील लिखित 'भोंडला' ही एकांकिका सादर करण्यात आली. आंधळ्या मुलीचे एकाकी जीवन, तिच्या एकेक मैत्रिणींची होणारी लग्नं, त्यांच्या खेळांतील भोंडल्याची गाणी आणि शेवटी अंगावर येणारा शोकांत शेवट, अशी ही एकांकिका रसिकांची विशेष दाद मिळवून गेली.

वाचकदिनाच्या नंतर कार्यक्रमात रविराज गंधे यांचे 'माध्यम रंग', डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचे 'परिमळामाजि कस्तुरी', 'सुधीर व नंदिनी थत्ते यांचे 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१८', डॉ. दीपक पवार यांचा 'दूरस्थाचा पसारा', भारती बिर्जे-डिग्गीकर यांचे 'नक्षत्रलिपी', नीलिमा भावे यांचे 'मराठी स्त्रीची बदलती अस्मिता', डॉ. अनंत लाभसेटवार यांचे 'ट्रंप : एक वादळी जीवनपट', रमेश वाघमारे यांचे 'हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी' ही पुस्तके प्रकाशित झाली. या पुस्तकांचे प्रकाशन म.सु. पाटील आणि दिनकर गांगल यांच्या हस्ते झाले. या प्रकाशनसोहळ्याचे निवेदन मृण्मयी भजक यांनी केले.

वाचकदिनाची सांगता 'चौरस-शब्दसुरांची मैफल' या कार्यक्रमानं झाली. स्नेहल भाटकर, सुधीर फडके, ग.दि. माडगूळकर आणि पु.ल. देशपांडे यांच्या शंभराव्या जन्मवर्षानिमित्त त्यांच्या अभिजात कलागुणांचं स्मरण करत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी ही मैफल चांगली रंगली. वेळेअभावी त्यांचं विविधरूपी दर्शन घडवता आलं नाही, तरी त्यांच्या सादर झालेल्या शब्द-सुरांनी श्रोत्यांना आनंद दिला. धनंजय म्हसकर आणि ऋचा सोमण-पाध्ये यांनी या चौघांची गाणी उत्कृष्ट गायली. त्यातही स्नेहल भाटकर यांची, आता फारशी ऐकायला न मिळणारी, 'वारियाने कुंडल हाले', 'मानसी राजहंस पोहतो' अशी अप्रतिम गीते कार्यक्रमात सादर झाली. त्यांना अमित पाध्ये, प्रसाद पाध्ये आणि झंकार कानडे यांची उत्तम साथसंगत लाभली. या कार्य्रक्रमाची संहिता अरुण जोशी यांनी लिहिली होती तर सुमधुर निवेदन अस्मिता पांडे यांनी केले. गाणी-ध्वनिचित्रफिती आणि निवेदन यातून या चार दिग्गजांनी दिलेली शिदोरी उलगडण्याची, तिचा पुनरानंद घेण्याची संकल्पना रसिकांना भावली.

●



# वाचकदिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे निकाल

**के.जे. सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विद्याविहार मराठी विभाग आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने 'बलुतं'च्या चाळिशीनिमित्त 'मला आवडलेले दलित आत्मकथन' अंतिम फेरीचा निकाल**
विद्यार्थी गट - १. विकास सौंदरमल-मुंबई विद्यापीठ, २. दिव्या सरमळकर-खालसा महाविद्यालय, ३. कोमल दवणे-मुंबई विद्यापीठ; शिक्षक गट - १. मृदुला वाघमारे-आचार्य मराठे महाविद्यालय, २. मीरा कुलकर्णी-क. जे. सोमैया महाविद्यालय; परीक्षक - १. प्रा. भगवान इंगळे, २. प्रा. आशा इंगळे, ३. प्रा. शिरीन कुलकर्णी

**'मुक्काम पोस्ट आई', 'पंखाविना भराभरी', 'आमची आई' या पुस्तकांच्या निमित्ताने 'आई' या विषयावरील कविता/लेख - अंतिम फेरीचा निकाल**
**कविता -** प्रथम क्रमांक - डॉ. संजीवकुमार सोनावणे, द्वितीय क्रमांक - रूपाली खैरनार, तृतीय क्रमांक - प्रदीप कासुर्डे, उत्तेजनार्थ - शिवाजी गावडे, लेख - प्रथम क्रमांक - अजित सावंत, द्वितीय क्रमांक - संजीवनी मोकाशी, तृतीय क्रमांक - अनिल दाभाडे, उत्तेजनार्थ - रेखा नाबर; परीक्षक - डॉ. लतिका भानुशाली, चांगदेव काळे, संदीप काळे

**पुस्तकपेठच्या सहकार्याने नाशिक विभाग अभिवाचन स्पर्धा - अंतिम फेरीचा निकाल**
प्रथम क्रमांक - संजय निकुंभ, स्वप्ना लिंबेकर, आकाश शर्मा, यशश्री उगवे; दुसरा क्रमांक - निशिगंधा घाणेकर, गायत्री पवार; तृतीय क्रमांक - शरद पुराणिक व सहकारी; परीक्षक - स्वानंद बेदरकर

**पुस्तकपेठच्या सहकार्याने पुणे विभाग अभिवाचन स्पर्धा - अंतिम फेरीचा निकाल**
प्रथम क्रमांक - विराज सवाई, द्वितीय क्रमांक - दत्तात्रेय जोशी, तृतीय क्रमांक मिलिंद भागवत, उत्तेजनार्थ - राकेश मेहता, रेवती संत; परीक्षक - वंदना बोकील-कुलकर्णी, संजय भास्कर जोशी


**'अर्थात क' या संस्थेच्या सहकार्याने अभिवाचन स्पर्धा, ठाणे (आयोजक - किरण येले, राजेश नाडकर, सुनील चौधरी)**
प्रथम क्रमांक - खुला गट सुधाकर वसईकर, स्वाती नातू, मानसी जोशी, सुषमा भट; द्वितीय क्रमांक - माधुरी घारपुरे, योगेश खांडेकर, देवेंद्र शिंदे, सुशील शिरोडकर, प्रज्ञा म्हस्के; शालेय गट : प्रथम क्रमांक - निशा नारखेडे, मृणाल भालेराव, पल्लवी पवार; द्वितीय क्रमांक - चैताली कुलकर्णी, भूमी देशमुख, वैष्णवी चौधरी. परीक्षक - नीला उपाध्ये, प्रा. शैलजा हर्डीकर.

**अक्षरदालनच्या सहकार्याने कोल्हापूर विभाग अभिवाचन स्पर्धा अंतिम फेरीचा निकाल**
प्रथम क्रमांक - सतीश तांदळे, कृष्णा भूतकर, अक्षय पोळके; दुसरा क्रमांक - टी. आर. गुरव, श्री. चव्हाण; तृतीय क्रमांक - नुपुर कवठेकर, चैतन्य कुलकर्णी; उत्तेजनार्थ - रोहित पोतनीस, समीर पंडितराव व सहकारी, भाग्यदा नाईक, पुष्यदा नाई, राही जोशी, अखिलेश्वरी भागवत; परीक्षक - हिमांशू स्मार्त, सोनाली नवांगुळ

**अभिवाचन स्पर्धा प्राथमिक फेरी (१३ डिसेंबर २०१८)**
मुंबई केंद्र निकाल गट १ प्रथम क्रमांक - प्रज्ञा गानला, नील हिंगे; दुसरा क्रमांक - अश्विनी गोडसे, रोहित सुर्वे; उत्तेजनार्थ - अलका श्रावणे, लीना पुराणिक, परीक्षक - दत्ता सावंत, प्रज्ञा भाटवडेकर, प्रमोद लिमये, राजश्री पोतदार
गट २ - प्रथम क्रमांक - वृंदा दाभोळकर, सविता दळवी, सुनीता फडके; दुसरा क्रमांक - स्नेहल जंगम, प्रज्ञा सावंत, जान्हवी दरेकर, कराली म्हात्रे; उत्तेजनार्थ - संध्या जोशी, उमा इनामदार, अंजली परांजपे, स्नेहा राणे, अल्पना कशाळकर, अलका तारी, गुरुप्रसाद शिरोडकर, शुभम शिंदे

**अभिवाचन स्पर्धा सर्व केंद्रांची मिळून अंतिम फेरी (२५ डिसेंबर २०१८) कीर्ती महाविद्यालय**
प्रथम क्रमांक - आत्मभान, कोल्हापूर; द्वितीय क्रमांक - अश्विनी गोडसे, रोहित सुर्वे; तृतीय क्रमांक - स्नेहल जंगम, प्रज्ञा सावंत, कराली म्हात्रे, जान्हवी दरेकर
परीक्षक - चंद्रकांत मेहेंदळे, मेधा आलकरी, राजीव जोशी, प्रमोद लिमये

# संजय कृष्णाजी पाटील लिखित पाच पुस्तके




मूल्य ३०० रुपये

## आभाळ झेलण्याचे दिवस

ललित लेख, समीक्षा, लघु तसेच दीर्घ कथा अशा एकाच वेळी तीन वाङ्मयप्रकारांना कवेत घेऊन पाहणारा संग्रह. विविधस्पर्शी अनुभव तसेच नागर-अनागर संवेदनांची अभिव्यक्ती साकारणारे चतुरस्त्र लेखन.




मूल्य १८० रुपये

## दशक्रियेची चित्रकथा (साकेत प्रकाशन)

साहित्यकृतींवर चार सातत्यपूर्ण चित्रपट लिहिणाऱ्या, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पटकथाकारांच्या पटकथा तसेच लेखनाचा अभ्यास करणाऱ्या जिज्ञासूंना अभ्यासासाठी उपयुक्त ठरेल अशा 'कादंबरी ते चित्रपट' या प्रवासाची वाटचाल दृगोच्चर करणारी साहित्यकृती.

## शून्य प्रहर (एकांकिकासंग्रह)

आत्ताच्या स्पर्धेत देखण्या एकांकिका होतात किंवा व्हिज्युअल्सचा मारा असतो. बऱ्याच एकांकिका ह्या एपिसोडीक एकांकिका असतात. अशा वेळी वाचनीय व आशयघन असलेल्या एकांकिका पाहायला मिळणं दुर्मिळच. या साऱ्या आजच्या एकांकिकांना छेद देत पूर्णपणे वाचिक अभिनयाचा कस लागेल अशा व दिग्दर्शकाला आव्हान देणाऱ्या एकांकिकांचा संग्रह.




मूल्य २०० रुपये




मूल्य १२५ रुपये


## हरवलेल्या कवितांची वही (कवितासंग्रह)

भाषेवरील हुकूमत आणि तल्लख हजरजबाब देणारी बुद्धिमत्ता, बेगुमान अविर्भाव, सडेतोडपणा, नागवल्या जाणाऱ्यांबद्दलची कणव आणि लुबाडणाऱ्यांबद्दलचा संताप, शासकीय निगरगट्टपणा या विषयीची कडवट चीड टोकदारपणे व्यक्त करीत समकालीन वास्तव मांडणारा रसरशीत कवितासंग्रह.

## लेझीम खेळणारी पोरं (कवितासंग्रह-दुसरी आवृत्ती)

मानवीमनाचे एकाकीपण-अगतिकता, मृत्यूचे तांडव-बेपर्वाई, प्रचंड वैभव-शरीरविक्रय, अपत्य-संसारप्रेम आणि विदारक क्रौर्य या सगळ्याला साद घालून वास्तव, बीभत्स आणि सर्व रसात्मकतेला शब्दबद्ध करणारी, महाराष्ट्राच्या पीळदार मातीची आणि भारताच्या धर्मनिरपेक्ष रीतीची, आधुनिकच नव्हे तर अत्याधुनिक अशी अनोखी कविता.


**पाच पुस्तकांचा संच सवलतीत ५०० रुपये टपालखर्च ६० रुपये**




मूल्य १५० रुपये

## मराठी अभ्यासकेंद्र, नूतन विद्यामंदिर, सहयोगी शाळा आणि सहयोगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील गोरेगावच्या महाराष्ट्र विद्यालयात डिसेंबर महिन्यात मराठीप्रेमी पालकसंमेलन आयोजित करण्यात आले. 'ग्रंथाली'देखील या संमेलनात सहयोगी संस्था म्सहभागी झाली होती. या संमेलनाचे हे दुसरे वर्ष आहे.

''**मी** आणि माझा मुलगा मराठी शाळेत शिकलो असलो तरी आमचं काहीएक अडलं नाही. मराठी सक्तीच्या कायद्याला शिवसेनेसह माझा पूर्ण पाठिंबा असेल'' असे वक्तव्य महाराष्ट्राचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी केले. ते 'मराठी अभ्यास केंद्र' आणि महाराष्ट्र विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठीप्रेमी पालक महासंमेलनात बोलत होते. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री सुभाष देसाई, अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख आणि अभिनेत्री चिन्मयी सुमीत हे या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



या तिघाही मान्यवरांनी आपल्या भाषणामध्ये महाराष्ट्रात मुलांनी मराठी शाळेत जाणेच नैसर्गिक असल्याचे म्हटले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'मराठी शाळा बंद झाल्या तर समाजातील वंचित वर्ग शिक्षणाला मुकेल', असे प्रतिपादन केले तर 'राजकीय पक्षांसाठी मराठी भाषा आणि मराठी शाळा हा राजकारणाचा मुद्दा असून आता आपण पालकांनीच मराठी शाळेच्या विकासासाठी, त्यातील शिक्षण कसे आनंददायी होईल यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे', असे मत अभिनेत्री आणि मराठी शाळांची सदिच्छादूत चिन्मयी सुमीत यांनी मांडले.

आजच्या घडीला मराठी शाळा टिकवायच्या असतील तर आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या पालक हा घटक अत्यंत महत्त्वाचा असून त्यांच्या सबलीकरणासाठीच मराठी अभ्यास केंद्राने पालकांचे संमेलन आयोजित केले असल्याचे मराठी केंद्राचे कार्यवाह आनंद भंडारे यांनी मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते तुषार पवार यांनी भारतातील विविध राज्यांना भेटी देऊन तेथील भाषा वापराचा चिकित्सक आढावा घेतलेले भाषा परिक्रमा आणि डॉ. प्रकाश परब आणि साधना गोरे संपादित केलेले 'मराठी शिक्षणाच्या नव्या वाटा' या दोन पुस्तकांचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. 'सजग व सुजाण पालकत्वासाठी' हे घोषवाक्य असणाऱ्या या दोन दिवसीय संमेलनात महाराष्ट्र व बेळगाव येथील अनेक प्रयोगशील शाळा, मराठी शाळा आणि मराठी भाषेसाठी कार्य करणाऱ्या संस्था, तसेच बालसाहित्य प्रकाशित करणारी प्रकाशने यांच्या दालनांचे प्रदर्शन संमेलनात भरवण्यात आले होते. सकाळी आयोजित केलेल्या जागर फेरीत महाराष्ट्र विद्यालय, अ. भि. गोरेगावकर शाळा, नंदादीप विद्यालय, पार्ले टिळक शाळा, मालवणी मालाड या शाळांतील ५०० शिक्षक-विद्यार्थी-पालक यांचा समावेश होता. या संमेलनात




शिक्षक आणि  पालकांसाठी निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा  योजित करण्यात आली होती. शिक्षकांसाठी 'मी केलेले शैक्षणिक प्रयोग' हा विषय ठेवण्यात आला होता तर पालकांसाठी 'अशी असावी माझ्या पाल्याची मराठी शाळा' हा विषय हेता. कौशल इनामदार आणि अस्मिता पांडे यांच्या 'लाभले आम्हास भाग्य' या मराठी गीतांनी रसिकांची संध्याकाळ सुरिली केली.




मराठीप्रेमी पालक महासंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. 'मातृभाषेतील शिक्षण आणि यशवंतांशी संवाद' या सत्रात अधिवक्ता मीनल सुनील शृंगारपुरे, मानसोपचारतज्ज्ञ प्रेरणा महाजन, अभियंता ओंकार गिरकर यांनी सहभाग घेतला होता. आकाशवाणीवरील निवेदक रश्मी वारंग यांनी त्यांच्याशी संवाद साधला. मराठी शाळेत शिकल्यामुळे पुढील महाविद्यालयीन शिक्षणात काही अडचणी आल्या का? त्या अडचणी खरंच भाषेच्या होत्या की नव्या पारिभाषिक संकल्पना समजून घेण्यातल्या होत्या, त्यावर कशी मात केली याची या तरुण यशवंतांनी मोकळेपणाने उत्तरे दिली.

'मातृभाषेतील शिक्षण आणि आई म्हणून माझी भूमिका' या सत्रात मुक्ता दाभोळकर, सई तांबे, चंदा बिराजदार यांचा समावेश होती. या सत्राच्या अध्यक्ष अभिनेत्री संपदा जोगळेकर होत्या. पत्रकार नामदेव अंजना यांनी त्यांच्याशी संवाद साधला. आपण मुलांसाठी मराठी माध्यमच का निवडलं, या विषयी भूमिका मांडताना ''मुलांना शिकताना मजा आली पाहिजे आणि ती मजा इतक्या लहान वयात परक्या भाषेतून शिकताना येणार नाही हे माहीत असल्यानं मराठी शाळेचीच निवड केली'' असं सई तांबे म्हणाल्या. तर मुक्ता दाभोळकर यांनी, ''मुलांच्या आनंदाबरोबरच त्यांना समाजभान येण्यासाठीही मुलांना मराठी शाळेत घातल्याचं म्हटलं. तसेच सार्वजनिक व्यवस्थांचा लाभ उच्च - मध्यमवर्गीय




घेईल तेव्हाच त्या व्यवस्थांचा दर्जा सुधारेल म्हणून समाजातल्या अभिजन वर्गाने आपल्या मुलांना मराठी शाळेत घातलं पाहिजे असंही त्या म्हणाल्या.

चंदा बिराजदार यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या इंग्रजी शाळेतून मराठी शाळेत असा माध्यम बदल केलेल्या मुलांचा आणि पालकांचा अनुभव सांगितला.

सत्राच्या अध्यक्ष संपदा जोगळेकर यांनी, ''लोकांच्या दबावाला बळी पडून मुलाच्या शाळेचे माध्यम ठरवू नये. मुलांच्या शाळा पालकांसाठी प्रतिष्ठेचा विषय असू नये, मुलांचा आनंद त्यापेक्षा महत्त्वाचा आहे असे मत मांडले.

'मराठी शाळांपुढील आव्हाने आणि नावीन्यपूर्ण उपाय' या सत्रात कराड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेचे मुख्याध्यापक अर्जुन कोळी, बेळगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेचे केंद्रप्रमुख गोविंद पाटील, नांदेड येथील आश्रम शाळेतील शिवाजी आंबुलगेकर यांचा सहभाग होता. सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ रमेश पानसे होते तर संवादक पत्रकार रसिका मुळ्ये होत्या. अर्जुन कोळी यांनी लोकसहभाग मिळवून शाळेत अनेक सुधारणा घडवून आणल्याचे आणि आज त्यांच्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालकांच्या पहाटेपासून रांगा लागत असल्याचे सांगितले. शिवाजी आंबुलगेकर यांच्या शाळेत चार वेगवेगळ्या बोली बोलणारे विद्यार्थी आहेत. मराठी ही त्यांच्यासाठी फॉरेन लँग्वेज आहे. अशा मुलांसाठी त्यांनी त्यांच्या भाषेत पाठ्यपुस्तकातील कविता आणि धडे अनुवादित केले असल्याचे म्हटले. गोविंद पाटील यांनी त्यांच्या तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी काही शिक्षकांसोबत महाराष्ट्रातल्या प्रयोगशील शाळांचा दौरा केल्याने प्रेरणा मिळाली असल्याचे म्हटले. हा दौरा मराठी अभ्यासकेंद्राने आखला होता. आज त्यांच्या अनेक शाळांत ते प्रयोग यशस्वी होत असल्याचे सांगितले.

'मराठी शाळांसाठी आम्ही काय करणार आहोत?' या सत्रात शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत, भाजपाचे आमदार अतुल भातखळकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार विद्या चव्हाण, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अनिल शिदोरे आणि आर.एम. भट शाळेचे विद्यार्थी संघाचे सदस्य स्वप्नील पिंगुळकर या वक्त्यांचा समावेश होता. पत्रकार नीतिन चव्हाण यांनी त्यांच्याशी संवाद साधला. महापालिकेतल्या शाळांसाठी विद्यार्थ्यांना देत असलेल्या सोयीसुविधांविषयी अरविंद सावंत यांनी सांगितले. तसेच काही पालिकेच्या शाळांमध्ये इंग्रजी ही पहिली भाषा कशी? या श्रोत्यांमधून आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण याची दखल घेऊ असे म्हटले. अतुल भातखळकर यांनी त्यांचे सरकार मराठी शाळा आंतरराष्ट्रीय मंडळाशी संलग्न करणार असल्याचे सांगितले. विद्या चव्हाण  यांनी या सरकारच्या काळात मराठी शाळा मोठ्या प्रमाणावर बंद होत असल्याचे आणि शिक्षण हा या सरकारचा प्राधान्याचा विषय नसल्याचे म्हटले. अनिल शिदोरे यांनी या सरकारने मातृभाषेतील शिक्षणाबाबत जी तडजोडवादी भूमिका घेतली



आहे, ती आम्हाला मान्य नसल्याचे म्हटले. स्वप्नील पिंगुळकर यांनी शाळांचे माजी विद्यार्थी शाळेच्या सक्षमीकरणासाठी आर्थिक हातभार लावू शकतात हे आपल्या शाळेचे उदाहरण देऊन सांगितले.

समारोपाच्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे परिवहन मंत्री दिवाकर रावते व उद्योजक मंदार भारदे उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते होते. विधिमंडळात आपण वेळोवेळी मराठीच्या प्रश्नावर आवाज उठवत असल्याचे सांगितले. तसेच साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष भाषणात मराठीच्या नावाने गळे काढतात, मात्र आजवर एकाही अध्यक्षांनी मराठी शाळांसाठी काम केले नाही. मंदार भारदे यांनी परदेशात लोक त्यांच्या मातृभाषेबाबत अत्यंत स्वाभिमानी असल्याचे सांगितले. तसा स्वाभिमान आपल्याकडे नसल्याचा खेदही त्यांनी व्यक्त केला. युवराज मोहिते यांनी महापालिकेच्या शाळांमध्ये मुलांना जे टॅब वाटण्यात आले, त्यांपाकी एकही टॅब आज चालू नसल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच 'भाषा परिक्रमा' हे केंद्राने प्रकाशित केलेले तुषार पवार लिखित हे पुस्तक भारतीय भाषांच्या संदर्भातले अत्यंत मूलभूत पुस्तक असून ते सर्व भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाले पाहिजे आणि आपणही त्यासाठी प्रयत्नशील राहू असे म्हटले. मराठी अभ्यास केंद्राचे कार्यवाह आणि या संमेलनाचे समन्वयक आनंद भंडारे यांनी असे संमेलन आम्हाला मुंबईपुरते मर्यादित ठेवायचे नसून ते महाराष्ट्रव्यापी करायचे असल्याचे सांगितले.

याच सत्रात पालक महासंघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली तसेच कृतिआराखडा जाहीर करण्यात आला. ते पुढीलप्रमाणे :

१. मुंबईतील मराठी शाळांची सद्यस्थिती दर्शवणारी श्वेतपत्रिका केंद्रातर्फे प्रकाशित केली जाईल.

२. हा पालक महासंघ प्रयोगशील शाळांतील अध्ययन – अध्यापन पद्धतीचे आदानप्रदान करणारे व्यासपीठ होण्यासाठी प्रयत्नशील राहील.

३.विविध प्रयोगशील अध्ययन – अध्यापन पद्धतींचे दस्तावेजीकरण करण्यासाठी असे प्रयोग पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात येतील.

४.मराठी शाळांमधील पालकांना सजग आणि सुजाण करण्यासाठी पालक प्रबोधन कार्यशाळा घेण्यात येतील.

५.मराठीप्रेमी पालक महासंमेलन मुंबईपुरते मर्यादित न ठेवता ते राज्यव्यापी करण्यासाठी संघ प्रयत्नशील राहील.

६. मराठी अभ्यास केंद्राच्या अथक प्रयत्नाने महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात म्हणजे २०१० मध्ये स्थापन झालेल्या भाषा विभागांतर्गत मराठी शाळांचा उपविभाग स्थापन करण्यासाठी व त्याच्या सक्षमीकरणासाठी पाठपुरावा करणे.

७. मराठी शाळांच्या वेतनेतर अनुदानात वाढ व्हावी म्हणून शासनाकडे पाठपुरावा करणे.

८. दुर्गम भागांतील मराठी शाळांसाठी असलेला बृहत् आराखडा तडकाफडकी रद्द झाल्यामुळे अनेक शाळा भरडल्या गेल्या. याकरता मराठी अभ्यास केंद्र न्यायालयीन लढा देते आहे. ही लढाई तड लागेपर्यंत सुरू राहील.


९. सर्व मंडळाच्या शालेय शिक्षणात मराठी भाषा अनिवार्य करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे.

१०. मराठी शाळांच्या सक्षमीकरणासाठी सीएसआर फंड, समाजातील दानशूर व्यक्ती यांच्यामार्फत प्रयत्न करणे.

**– साधना गोरे**

भाषा परिक्रमा – मराठी अभ्यासकेंद्राचा कार्यकर्ता तुषार पवार याने दिवंगत शशिकलाताई काकोडकरांनी दिलेल्या पाठ्यवृत्तीच्या आधारे भारतातील विविध राज्यांचा दौरा करून तेथील भाषिक वास्तव जाणून घेतले. त्या आधारे साकार झालेले 'भाषा परिक्रमा'




पहिल्या मराठीप्रेमी पालक महासंमेलनावर आधारित
**मराठी शिक्षणाच्या नव्या वाटा**
संपादन – डॉ. प्रकाश परब
साधना गोरे

आम्हाला 'माणूस' व्हायचंय...
मराठीतून शिकायचंय!

[redacted]





## नक्षत्रलिपी – भारती बिर्जे-डिग्गीकर

मूळ संस्कृत, उर्दू, अवधी, इंग्रजी तसेच इंग्रजीत भाषांतरित झालेल्या अन्य भाषांतील कवितांचा भारती बिर्जे-डिग्गीकर यांनी केलेल्या पद्याविष्कार म्हणजे ही 'नक्षत्रलिपी'. एकूण ती मूळ कविता, तिचा आशय व भाव तसेच त्या कवि-कवयित्रीच्या भावावस्था यांच्याशी सहकंप पावण्याच्या तीव्र असोशीतून हे पद्याविष्कार साकार झाले आहेत. रूपांतराच्या वाटेने विश्वकवितांची अनेकरंगी भावश्रीमंती मराठी रसिक व कवितेला समृद्ध करणारी आहे.

**– चंद्रशेखर सानेकर**


**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**




## मराठी स्त्रीची बदलती अस्मिता – नीलिमा भावे

महाराष्ट्राच्या इतिहासातले तीन सलग पण वेगवेगळे कालखंड; या कालखंडांना आकार देणाऱ्या तीन वेगवेगळ्या राजसत्ता; आणि या प्रत्येक राज्यसत्तेच्या वेगवेगळ्या सामाजिक धोरणांमुळे त्या-त्या कालखंडात समाजात विशेषत: स्त्रियांच्या परिसिथतीत घडून आलेले बदल यांचा एक धावता आढावा घेण्याचा प्रयत्न या छोटेखानी अभ्यासात केलेला आहे.

**मूल्य १२५ रुपये  सवलतीत ७५ रुपये**




## हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी – रमेश वाघमारे

आजपर्यंत त्या सुवर्णयुगातील मानकरी पं. भीमसेन जोशी, उस्ताद विलायत खान, पं. रविशंकर, गंगुबाई हनगळ, उस्ताद झाकीर हुसेन, पं. शिवकुमार शर्मा, पं. हरिप्रसाद चौरसिया, उस्ताद बिस्मिल्ला खान, पं. विश्वमोहन भट, अमजद अली खान वगैरे अनेक नामवंत कलाकारांचे आतिथ्य करण्याचे भाग्य रमेशजींना लाभले आहे. त्या दरम्यान त्यांना ह्या कलाकारांकडून त्यांचे जीवन व त्यांचे संगीत ह्याविषयी माहिती मिळविण्याची संधी मिळाली आहे. रमेश ह्यांनी ह्या कलाकारांबद्दल लिहून ह्या महान कलाकारांनी श्रोत्यांना दिलेल्या आनंदाची कृतज्ञतेने परतफेड केली आहे.

**– पंडित जसराज**

**मूल्य ३५० रुपये  सवलतीत २५० रुपये**




## ट्रंप : एक वादळी जीवनपट – डॉ. अनंत पां. लाभसेटवार

ट्रंप करिष्माधारक, वाटाघाटीपटू, कृतिप्रधान, नेतृत्ववान व अमेरिकेला अग्रणी ठेवणारे आहेत. त्याबरोबरच एक भंपकबाज बोलणारे श्रीमंतीची अतिशयोक्त अभिव्यक्ती प्रिय असलेले व देशाचं राजकीय ध्रुवीकरण करणारे म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या विरोधी पैलूंमुळे अमेरिकेला संघर्ष वाढला. या चढउतारांमुळे त्यांचा जीवनपट वादळी व चित्तथरारक झाला आहे.


**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**




## माध्यमरंग – रविराज गंधे

आज प्रसारमाध्यमं आणि समाजमाध्यमं ही सर्वसामान्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. प्रत्येक माणूस हा देखील माध्यमकर्मी झाला आहे. गरज आहे ती माध्यमकर्मींमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्याची! माध्यमविषयक जाणिवा प्रगल्भ करणारं आणि तंत्र-कौशल्याचं माहिती देणारं आगळं-वेगळं पुस्तक माध्यमरंग!


**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**




## परिमळामाजि कस्तुरी – डॉ. सिसिलिया कार्व्हालो

या पुस्तकात विविध भाषांतील साहित्य, चित्रपट यामधील संदर्भ, यामुळे सकारात्मकता, सांस्कृतिक एकात्मता आणि माणसाचे 'माणूसपण' अधोरेखित करणे सुलभ झाले. हे संदर्भ लेखिकेला कस्तुरीसारखेच वाटतात. जीवनाचं तत्त्वज्ञान, सार त्यात सामावलेलं असतं... कस्तुरीच्या अवगुंठनात ते मांडता आलं.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**




## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१८ – सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते

नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा तेवीस वर्षे चाललेला जगातला एकमेव उपक्रम.

**मूल्य ८० रुपये सवलतीत ५० रुपये**




## दूरस्थाचा पसारा – डॉ. दीपक पवार

डॉ. दीपक पवार यांचा हा पहिला कवितासंग्रह आहे. १९९२ सालापासून अलीकडेपर्यंत लिहिलेल्या कविता या संग्रहात आहेत. त्यातल्या काही व्यक्तिगत वाटाव्यात अशा आहे तर काही सामाजिक-राजकीय आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. अभंग आणि एखाद-दुसरी कविता वगळली तर बहुतांश कविता मुक्तछंदातल्या आहेत.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**

## समकालीन मराठी कविता आता हिंदीत!




'मराठी कविता का समकाल' हा प्रकाश भातम्ब्रेकर यांनी संपादित केलेल्या मराठी अनुवादित कवितांचा संग्रह प्रकाशित होणे ही मराठी साहित्याच्या दृष्टीने अत्यंत आशादायी घटना म्हटली पाहिजे कारण हिंदीतील साहित्य अनुवादामार्फत मराठीत येत राहते पण तुलनेने मराठी साहित्याच्या हिंदी भाषेतील अनुवादाचे प्रमाण कमी आहे.

हा संग्रह भातम्ब्रेकर यांनी विषयसूत्रानुसार किंवा कालखंडानुसार संपादित केलेला नाही पण गेल्या दोन दशकांतील मराठी कवितेवर तो लक्ष केंद्रित करतो. तणावग्रस्त आयुष्याच्या गुंतागुंतीवरील भाष्य या कवितांमधून मुखर होते. हिंसा, दंगे, सत्तास्पर्धा, भ्रष्टाचार, शोषण असे वर्तमान वास्तवाचे विविध पैलू या कवितांमधून साकारतात.

सामाजिक विषमता व शोषणाच्या अमानुष व्यवस्थेचा मुखवटा ओढून काढणारे अनेक कवी ऐंशीनंतरच्या काळात मराठीत लिहीत राहिले. दलित, आदिवासी कवितेने माणुसकीचे मोल अधोरेखित केले. अशा विविध कवितांची निवड भातम्ब्रेकरांनी अनुवादासाठी केली आहे. नामदेव कोळी, संदीप जगदाळे, फेलिक्स डिसूजा, सारिका उबाळे, वीरा राठोड, रवी कोरडे, बालाजी सुतार, विनायक येवले इत्यादी गेल्या सात-आठ वर्षांत मराठीत पुढे आलेल्या कवींची कविता, हे या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. रूपबंध आणि भाषा या दोन्ही दृष्टींनी मराठी कवितेचा समकालीन प्रवास या संग्रहातून दृग्गोचर होतो.


या संग्रहातली पहिलीच कविता नामदेव ढसाळ यांची 'आई' ही आहे. ही कविता इथे केवळ व्यक्तिगत राहात नाही तर ती समष्टीची होते आणि वंचित-उपेक्षित प्रत्येक आईला सहभागी करून घेते. या संग्रहातील शेवटची कवितादेखील आईविषयक असून सत्यपालसिंग आधारसिंग राजपूत यांनी ती लिहिली आहे, हे पुस्तकाचे एक वेगळे वैशिष्ट्य ठरते.

शेतकऱ्यांवर आलेल्या आत्महत्येच्या परिस्थितीला जबाबदार समाजव्यवस्थेने आज प्रश्नचिन्हे उभी केली आहेत. दुष्काळासारख्या समस्यांनी गावातलं जीवन उध्वस्त केले आहे. या संग्रहातील उत्तम कोळगावकर, सुखदेव ढाणके, श्रीकांत देशमुख, प्रकाश किनगावकर इत्यादी कवींच्या कवितांमधून शेतकऱ्यांची वेदना विलक्षण संवेदनशीलतेने व्यक्त झाली आहे. ६२ कवींच्या ६८ कवितांचे अनुवाद असलेला हा संग्रह मराठी कवितेचा विशेषत: ऐंशीनंतरचा पट उभा करतो. एकूणच भारतीय समाज संक्रमणकाळातून जात असताना या काळातील मराठी कवितेचा स्वर एकत्रितपणे व्यक्त होणे आणि अनुवादातून तो सर्वदूर पोहोचणे ही निश्चितच महत्त्वाची गोष्ट आहे. याकरता प्रकाश भातम्ब्रेकर यांनी घेतलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत.

*(रणजीत साहा आणि रणधीर शिंदे यांच्या प्रस्तावनांच्या आधारे)*

**('मराठी कविता का समकाल' हे प्रकाश भातम्ब्रेकर यांनी अनुवादित आणि संपादित केलेले पुस्तक वितरणासाठी 'ग्रंथाली'कडे उपलब्ध आहे.)**

ग्रंथाली




# अनुजा

**सतीश देसाई**

**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

प्रस्तुत कादंबरीच्या कथानायिकेने स्त्रियांची क्षमता आणि महत्त्वाकांक्षा जबरदस्तीने मर्यादित ठेवणे अयोग्यच समजले जाते अशा अन्यायाविरुद्ध बंड केले आहे आणि जुन्या परंपरेकडे दुर्लक्ष करून आपले आयुष्य सांभाळले आहे.

# पोलादी दिव्यांग




**संपादन सुलभा वर्दे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

दिव्यांगांच्या चाकाची खुर्चीपेक्षा त्यांच्या कर्तृत्वाची जाण समाजापुढे आणणारी संस्था म्हणजे पॅराप्लेजिक फाउंडेशन! अशा पोलादी दिव्यांगांना घडविणाऱ्या संस्था भारत देशात ठिकठिकाणी उभ्या राहिल्या तर समाज खऱ्या अर्थाने समृद्ध होण्यास मदत होईल हे निश्चित!

॥ग्रंथाली॥ **चौरस** वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

**क्षणचित्रे**



संजय कृष्णाजी पाटील लिखित

# ‘भोंडला’

या एकांकिकेचा प्रयोग

**दिग्दर्शन : अभिजित जयवंत झुंजारराव**

**निर्मिती : अभिनय, कल्याण**





## ‘मी टू’ : उत्तर की प्रश्न (चर्चासत्र)



प्रल्हाद जाधव



संजीव लाटकर




सहभागी वक्ते : वंदना खरे, ॲडगुरू भरत दाभोळकर, ॲड. जाई वैद्य, संजीव लाटकर, डॉ. राजेंद्र बर्वे आणि श्याम जोशी



NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
Better Rate...Higher Returns
FIXED DEPOSIT
1 Year - upto 2 Years
QIRP
REGULAR
7.50%
SENIOR CITIZEN
7.75%
FDR/MIP/RD
8% FOR ALL
w.e.f.22.05.2018
Our Savings Account is much more than just savings
Super Savings
Average Monthly Balance of `25,000
Personal Accident Cover up to `1 Lac for 1 year
25% Waiver in Processing Fees on all Retail Loans
Demat - Free AMC for One Year
Normal Savings Account
Minimum Balance:
`500 (without cheque book)
`1000 (with cheque book)
Super Esteem Savings
Average Monthly Balance of `50,000
Personal Accident Cover up to `2 Lac for 2 Years
50% Waiver in Processing Fees on all Retail Loans
Demat - Free AMC for Two Years
Super Exclusive Savings
Average Monthly Balance of `1 Lac
Personal Accident Cover up to `3 Lac for 3 Years
No Processing Fees on all Retail Loans
Demat - Free AMC for Three Years
24/7 Call us: 022 2860 2000
Email: customercare@nkgsb-bank.com
www.nkgsb-bank.com

४४ ॥ग्रंथाली॥ ॥ सोमवार, २४ डिसेंबर २०१८

# चौरस वाचकदिन

कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने

४४ ॥ग्रंथाली॥ ॥ मंगळवार, २५ डिसेंबर २०१८

**पुस्तक प्रकाशन, अभिवाचन, परिसंवाद, एकांकिका, शब्दसुरांची चौरस मैफल यांनी परिपूर्ण दोन दिवसांचा वाचक मेळावा**

युनियन बँक · NKGSB Bank · बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra · सारस्वत बँक · NEW INDIA ASSURANCE · झी मराठी






## शब्दसुरांची मैफल

संकल्पना-संहिता : **अरुण जोशी**

संहिता-सहलेखन-निवेदन : **अस्मिता पांडे**

स्नेहल भाटकर, बाबूजी, गदिमा आणि पुल
यांनी दिलेल्या शब्द-सुरांच्या शिदोरीची मैफल.

गायक-साथसंगत

**धनंजय म्हसकर, ऋचा सोमण-पाध्ये, अमित पाध्ये, प्रसाद पाध्ये, झंकार कानडे**















**क्षणचित्रे**


निरंतर उत्कृष्ट सेवेचे 100वे वर्ष...
करोडों लोकांचा विश्वास...
28 देशांमध्ये उपस्थिती
100 YEARS
A JOURNEY OF TRUST
2400 पेक्षा जास्त कार्यालयांचे जागतिक नेटवर्क
230 पेक्षा अधिक सामान्य विमा उत्पादने
NEW INDIA ASSURANCE
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
नोंदणीकृत आणि मुख्य कार्यालय : न्यू इण्डिया एश्योरन्स बिल्डिंग, 87, एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई-400001, भारत
IRDAI REGN. No. 190
CIN : L66000MH1919GOI000526
ADVT NO. : NIA/CCD/18-19/078
टोल फ्री: 1800-209-1415
www.newindia.co.in

# 'पुस्तकचोर'

**डॉ. विनता कुलकर्णी यांनी अनुवादित केलेल्या 'पुस्तकचोर' या पुस्तकाचे प्रकाशन पुणे आणि मुंबई अशा दोन्ही ठिकाणी पार पडला. या दोन्ही कार्यक्रमाचे वृत्तांत**

अनुवादांचे मूल्यमापन कसे करावे, हा समीक्षकांना नेहमीच प्रश्न पडतो. एकेकाळी उपेक्षित असलेल्या अनुवादांना १९९० नंतर चांगले दिवस आले. डॉ. विनता कुलकर्णी यांनी 'बुक थीफ'चा अनुवाद उत्तम पेललेला आहे. त्या अमेरिकेत राहतात; मूळ लेखक ऑस्ट्रेलियाचा आणि कथानक जर्मनीतले. असा हा त्रिखंडात्मक समन्वय कादंबरीला चांगला न्याय देतो. लेखिकेने असेच सरस अनुवाद करत राहावे, असे उद्‌गार प्रख्यात अनुवादक उमा कुलकर्णी यांनी 'पुस्तकचोर' या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी काढले. पुणे येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

सुरुवातीला सूत्र-संचालक अक्षय वाटवे यांनी विनता कुलकर्णी यांच्याशी पुस्तकाच्या संदर्भात संवाद साधला. त्यांचे वास्तव्य शिकागो येथे असते. शिक्षण आणि अध्यापन कार्य त्यांनी पुण्यातूनच केलेले आहे. 'बुक थीफ' हे मूळ सहाशे पानी पुस्तक पाचशे आठवडे 'बेस्टसेलर' यादीत होते. जगभरातील ३० भाषांमध्ये त्याचे अनुवाद झाले असून एक कोटी प्रती खपलेल्या आहेत. लीझन नावाच्या महिला पुस्तकचोराची कथा त्यात रंगवलेली आहे. तो दुसऱ्या महायुद्धाचा काळ आहे. हिटलर हा ज्यूंबरोबरच कम्युनिस्टांचा द्वेष्टा होता. जर्मन जनताही त्यावेळी कशी भरडली जाते, हे पुस्तकात प्रभावीपणे मांडले आहे. तीन कादंबऱ्यांचा ऐवज त्यात भरलेला आहे. मृत्यू हा कथेचा निवेदक असून तो तटस्थपणे सगळ्या जगाकडे बघतो. या कथेवर इंग्रजी आणि जर्मन चित्रपट निघालेले आहेत.

बदलापूरच्या 'ग्रंथसखा' वाचनालयाचे श्याम जोशी यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, अनुवाद ही सत्त्वपरीक्षा असते. त्यात शब्दांचा फेर आणि संघर्ष असतो. लेखिकेने हा अनुवाद अत्यंत संयमितपणे केलेला आहे.

'ग्रंथाली'चे संचालक सुदेश हिंगलासपूरकर यांनी संस्थेच्या ४४ वर्षांच्या वाचक चळवळीचा आढावा घेतला. आजवर 'ग्रंथाली'ने ९०० पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. 'ग्रंथाली' चौदा वर्षे अमेरिकेत नित्यनेमाने ग्रंथप्रदर्शन भरवते.

प्रा. मिलिंद जोशी आपल्या भाषणात म्हणाले, ''ग्रंथाली ही एक वैचारिक चळवळ आहे. कथानक कोणत्याही देशातील असो, मानवी भावना या वैश्विक असतात. एक प्रयोगशील पुस्तक म्हणून 'पुस्तकचोर' लक्षात राहील. सामान्य माणसाची ससेहोलपट, दु:ख, दारिद्र्य, निसर्गाची अवकृपा याचे वास्तवदर्शन त्यातून होते. अनुवाद ही एक जोखीम असते.

सुखदु:खाची लय त्यात साधता आली पाहिजे. अनुवाद हा महत्त्वाचा आहे. मृत्यू जीवनात एकदाच येतो, परंतु 'भय इथले कधीच संपत नाही,' हीच शोकांतिका आहे. लेखिकेने नववर्षाची एक छान देणगी आपल्याला दिलेली आहे.''



**विनता कुलकर्णी अनुवादित 'पुस्तकचोर' या पुस्तक प्रकाशनसमयी मृण्मयी भजक, संजीवनी खेर, प्रकाश भातम्ब्रेकर, लेखिका विनता कुलकर्णी, सुहासिनी कीर्तीकर आणि सुदेश हिंगलासपूरकर**

'ग्रंथाली' प्रकाशित या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी मुंबई मराठी साहित्य संघात संपन्न झाला. ज्येष्ठ अनुवादक प्रकाश भातम्ब्रेकर यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले.

याप्रसंगी सूत्रसंचालक डॉ. मृण्मयी भजक यांनी विनिता कुलकर्णी यांची मुलाखत घेतली. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना विनिता कुलकर्णी म्हणाल्या, न्यूयॉर्क टाईम्सच्या एका बातमीने मी या पुस्तकाकडे वळले. ती बातमी म्हणजे गेली दहा वर्षे हे पुस्तक 'बेस्ट सेलर'च्या यादीत असून आत्तापर्यंत त्याच्या

एक कोटी प्रती संपल्या आहेत. जगातील तीस भाषांमध्ये त्याचा अनुवाद झाला असून अनेक पुरस्कारांनी हे पुस्तक सन्मानित आहे. या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नसल्याने किंडलवर या पुस्तकाचे वाचन करून त्यांनी या पुस्तकाचा अनुवाद केला आहे. स्वतः विनिता कुलकर्णी 'बृहन्महाराष्ट्र वृत्त, अमेरिका' याच्या संपादक/संपादिका आहेत.

संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांचा संपन्न वारसा वडिलांकडून लाभलेल्या विनिता कुलकर्णी यांनी दीड वर्षांत या पुस्तकाचा अनुवाद संपन्न केला आहे. अनेक जर्मन शब्द या पुस्तकात आल्याने तीही भाषा जाणून घेणे त्यांच्यासाठी क्रमप्राप्त ठरले.

पत्रकार, लेखिका, लघुपटकार श्रीमती संजीविनी खेर या समारंभातील आमंत्रित वक्त्या म्हणून आपले विचार मांडताना म्हणाल्या की आपण दागिनेचोर, संपत्तीचोर याविषयी वाचतो पण पुस्तकचोर हा शब्द पहिल्यांदाच ऐकला. या पुस्तकात तीन कथानके असून दोन-तीन कादंबऱ्यांचा ऐवज यात आहे. हे एका लीझल नावाच्या जर्मन मुलीचे कथानक असून ती कम्युनिस्ट आहे. वडील भूमिगत आहेत. लहानपणीच रेल्वे प्रवासात भावाचा मृत्यू तिने पहिल्याने तिला मृत्यूचे जवळून दर्शन झाले आहे. भावांच्या मृतदेह अनोळख्या गावात पुरताना तिथे थडग्याजवळ तिला एक पुस्तक मिळते ज्यात खणण्यासंबंधित माहिती असते. पुस्तके माणसाला जगण्याचे बळ देतात. तेच बळ लीझलला मिळते.

या पुस्तकात लीझलबरोबर रुडी, रोझा हान्स हुबरमन, एल्सा, हस्मान माक्स व इतर पात्रे आहेत. हे पुस्तक दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर असून शाळकरी मुलांचे जीवन, त्यांच्या विश्वातील खोड्या, चोऱ्या, लबाड्या, आशा-निराशा तसेच फटकळ आणि शिवराळ कष्टकरी गरीब जर्मन लोकांच्या दैनंदिन आयुष्यातील विवंचना, हुकुमशहाच्या विरोधात गेल्यास होणारी फरफट, युद्धजन्य परिस्थितीत सामान्य माणसांचे होणारे हाल याचे हृद्य वर्णन येते. सर्वच जर्मन ज्यूंच्या विरोधात नव्हते याचा साक्षात्कार या पुस्तकात होतो, अनेक जर्मनांनी अशा भयानक वातावरणात ज्यू लोकांना मदत करत माणुसकीचे दर्शन घडवले.

माणुसकी आणि संस्कृती कळण्यासाठी अशा पुस्तकांची नितांत आवश्यकता आहे. या कादंबरीतील मुलगी आयुष्यातील पहिले पुस्तक वाचते तेच मुळी थडगे खोदण्याची कला असण्याबद्दलचे पुस्तक. पुढे एका घरात राहत असताना एका खोलीत भिंतीपर्यंत गेलेली पुस्तके असतात. तिथे तळघरात लपलेल्या ज्यू माणसाला ती त्यातील काही पुस्तके वाचून दाखवते. त्यामुळे त्याची जगण्याची उमेद वाढते. या कादंबरीत अनेक रहस्य दडलेली असून मृत्यू इथे जीवनाचे प्रतीक म्हणून येते.

या समारंभातील दुसऱ्या वक्त्या श्रीमती सुहासिनी कीर्तिकर या पुस्तकाविषयी बोलताना म्हणाल्या की हे पुस्तक म्हणजे मृत्यूचे आत्मकथन आहे. मृत्यू बोलतो ही कल्पनाच मुळी विलक्षण आहे. त्याचे काम जरी यमराजाचे असले तरी त्याच्या मनात वात्सल्यभाव आहे. तो सर्वसाक्षी आहे. युद्धजन्य परिस्थितीत त्याला प्रचंड काम करावे लागते. हे पुस्तक म्हणजे एक महाभारत आहे. अनेक पत्रांचा गुंता त्यात आहे. जोडीला अनेक कथानके आहेत त्यामुळे या पुस्तकाचा गाभा समजून घेण्यासाठी पुन्हा पुन्हा वाचणे आवश्यक ठरते. एकदा वाचायला सुरवात केली की मात्र शेवट वाचेपर्यंत ते खाली ठेवता येत नाही हेच या कादंबरीचे यश आहे.

स्वतःचे जीवन जगणे कठीण असणाऱ्या जर्मन कुटुंबाने एका ज्यू रंगारी माणसाला आसरा दिलाय. नैसर्गिक विधीही तळघरातील डब्यात करायला लागणाऱ्या या माणसाचा मृत्यू झाला तर काय हा प्रश्न त्यांच्यापुढे आ वासून उभा आहे. मृत्यूच्या दृष्टीने जन्म आणि मृत्यू ही जुळी भावंड आहेत असे मत यावेळी सुहासिनी कीर्तिकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश भातम्ब्रेकर यांनी पुस्तकावर अधिक भाष्य न करता पुस्तकाचे सार एका वाक्यात सांगितले. ते म्हणजे 'माणसाने कधीही पराभूत व्हायचे नसते तर आशेने जगायचे असते.' या प्रसंगी रवींद्रनाथ टागोरांच्या एका पुस्तकातील लहान मुलाच्या कथेचा दाखला त्यांनी दिला. पुढे ते असेही म्हणाले की हे पुस्तक महाकाव्य नसून महाभारत आहे. तो एक संजीवन मंत्र आहे. असे विश्वव्यापी पुस्तक मराठीत आणल्याबद्दल त्यांनी लेखिकेचे कौतुक केले.

**– प्रभाकर भिडे**

---


# 'अनुजा'

'ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ ब्रिटिश एम्पायर' (ओबीई) या अत्यंत प्रतिष्ठेच्या किताबाने प्रत्यक्ष ब्रिटनच्या राणीच्या हस्ते बहुमान प्राप्त करणारे इंग्लंडस्थित, स्ट्रक्चरल सिव्हिल इंजिनीयर सतीश देसाई लिखित 'अनुजा' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा मराठी विज्ञान परिषदेच्या प्रांगणात, चुनाभट्टी येथे ४ डिसेंबर २०१८ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अनंत पांडुरंग देशपांडे यांनी केले. मराठी विज्ञान परिषद गेली तीन वर्षे सुवर्णमहोत्सवी व्याख्यानमाला साजरी करते. याच कार्यक्रमांतर्गत 'अनुजा' या कांदबरीचे प्रकाशन करण्यात आले.

'शेतीविज्ञान आणि स्थापत्त्यशास्त्र याचा दुहेरी संगम सतीश देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वात झाला आहे' असे गौरवोद्‌गार अ.पां. देशपांडे यांनी यावेळी व्यक्त केले.

आपले मनोगत व्यक्त करताना देसाई म्हणाले, ''मी गेली पंचेचाळीस वर्षे सिव्हिल इंजिनीयर म्हणून इंग्लंडला राहतो. मी १९६२ साली इंग्लंडला गेलो. माझे मराठी हे त्या आधीचे कानावर पडलेले मराठी आहे. त्यामुळे कदाचित इंग्रजी भाषेचा प्रभाव माझ्या मराठीवर असू शकतो. परंतु या कादंबरीचा गाभा मात्र अस्सल मराठीच आहे.



'अनुजा' पुस्तक प्रकाशनसमयी रजनी देसाई, डॉ. लतिका भानुशाली, लेखक सतीश देसाई, अनंत देशपांडे, श्रीराम सिधये आणि सुहासिनी कीर्तीकर

विज्ञान परिषदेने हा कार्यक्रम आयोजित केला आणि ग्रंथालीने माझे पुस्तक प्रकाशित केले हा मी माझा बहुमान समजतो. मला गुजराती, मराठी अशा अनेक प्रादेशिक भाषा येतात. इंग्लंडमध्ये मी ज्यांच्याकडे पेईंगगेस्ट म्हणून राहत होतो. तिथे विवाह होऊन भारतातून आलेल्या मुली मी बघत होतो. भारतात जशी सहज कामाला माणसे मिळतात तशी इथे कोणतीही मदत मिळत नाही. सर्वच कामं अंगावर पडल्याने चिडचिड्या होणाऱ्या या नवविवाहित तरुणी पाहून नक्कीच मला माझ्या लहानपणी पाहिलेलया कर्तव्यनिष्ठ, कामसू, खंबीर स्त्रिया आठवत असत. या सर्व आठवणी जागृत झाल्यानेच त्या कादंबरी रूपात चित्रित कराव्या असा मानस तयार झाला आणि आज ही माझी पहिली मराठी कादंबरी भारतात, महाराष्ट्रात प्रकाशित होत आहे याचा मला विशेष आनंद आहे.

'ग्रंथाली'च्या वतीने डॉ. लतिका भानुशाली यांनी प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या की एकूण बारा विभागात विभागलेली ही कादंबरी पात्रांच्या मोठ्या समूहाला हात घालण्याची मराठी कादंबरीची परंपरा कसोशीने पाळते. नवीन जाणिवा, नवे संदर्भ अधिक आशयघन करते. केंद्रस्थानी स्त्री असली तरी शेवटाकडे जेव्हा ही कादंबरी पोहचते तेव्हा ती सामाजिकतेकडे परावर्तित होते हेच या कादंबरीचे यश आहे. विविध पात्र, मुंबईमधील त्यावेळचा मध्यमवर्गीय समाज, कार्यालयातील कर्मचारी वर्ग, ब्रिटिश अधिकारी सायमन, मेहबूब यांसारखी परधर्मीय माणसे अशा गोतावळ्यांमध्ये रमणारी ही स्त्री 'अनुजा' परंपरेच्या जोखडातून बाहेर पडते आणि स्वत:ची नवीन जीवनप्रणाली अंगिकारते. अशी कथानकाची बांधणी कुठेतरी जुन्या काळातील म्हणजे हरिभाऊ आपटे अशी यांच्या काळातील कादंबरीची आठवण करून देते.

कादंबरीचे प्रकाशन कर्करोग संस्थेच्या ज्येष्ठ शास्त्रज्ञ रजनीताई देसाई यांच्या हस्ते झाले. विज्ञानविषयक पुस्तके लिहिणारे, विविध वृत्तपत्रांत स्तंभलेखन करणारे विज्ञान पत्रकार श्रीराम सिधये आपले विचार मांडताना म्हणाले की ही एका बंडखोर स्त्रीची कथा आहे. १९४० ते १९८० या काळातील माणसांच्या मनोवृत्तीचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे. पात्रांच्या माध्यमांतून अनुजाचे जीवन उलगडत जाते. जणू एखादी बंद तिजोरी शोधण्यासाठी दारामागून दारे उघडून आपण आत जातो मग छान खजिना हाती लागतो त्याप्रमाणे लेखक अनुजाच्या जीवनातील व्यक्तिमत्त्वे हळुवार उलगडून दाखवतो. त्यातून सहजपणे अनुजाचे अंतरंग उलगडत जाते. ते पुढे असेही म्हणाले की ही कादंबरी म्हणजे अनेक पाकळ्यांचे मोहक फूल आहे. स्वत: व्यवसायाने बांधकाम इंजिनियर त्यामुळे कादंबरीची बांधणीही आकर्षक आहे असे उद्गार त्यांनी काढले. कादंबरी ज्या काळात घडतो तो काळ भारताच्या इतिहासातील उलथापालथीचा काळ आहे. परंतु याचे फारसे पडसाद कादंबरीत व्यक्त होत नाहीत अशी खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच बऱ्याच ठिकाणी मराठीवर इंग्रजीचा प्रभाव आहे असेही स्पष्ट मत त्यांनी मांडले. परंतु लैंगिकतेची वर्णन मात्र अत्यंत संयमाने हाताळली आहेत. त्यासाठी शब्दसूचकतेचा वापर खुबीने केला आहे असेही मत त्यांनी मांडले.

या कार्यक्रमातील दुसऱ्या वक्त्या होत्या सुहासिनी कीर्तीकर. मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागप्रमुखाच्या कार्यकारिणी सदस्य, मराठीच्या प्राध्यापिका, संपादिका, समीक्षक अशी विविध ओळख असणाऱ्या सुहासिनी कीर्तीकर यांनी कांदबरीविषयी आपली मते मांडताना असे मत व्यक्त केले की हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीतील स्त्रियांची आठवण ही कादंबरी करून देते. कादंबरीतील भाषा ही पूर्णपणे 'स्त्री'ची भाषा आहे त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. 'अनुजा' या नायिकेचे बालपणातील मुग्ध प्रेम पुढे लग्न, नवऱ्याकडून अपेक्षाभंग, परपुरुषाकडून गर्भधारणा, तिच्या संततीला कुटुंबाकडून मान्यता. शेवटी नवऱ्याच्या दुर्बलपणा त्याच्या व्यक्तिमत्त्वातील फोलपणा जाणवून ती वेगळी होते. स्वत:चा आत्मसन्मान जपते आणि दुसरे लग्न करून मोकळी होते. हा रंजक प्रवास एखाद्या गोष्टीसारखा चित्ररूपाने रसिकांसमोर उभा केला.

यावेळी सतीश देसाई यांचे बालपणीचेमित्र आणि नायर हॉस्पिटलचे माजी शल्यविशारद डॉ. जुवेकर यांनी त्यांच्या दोघांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी 'शहरी शेती' या दिलीप हेर्लेकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. 'ग्रंथाली'चे कार्यकर्ते दत्ता सावंत या प्रसंगी आवर्जून उपस्थित होते.

# ‘कथा विविधा’




**ज्योती अळवणी लिखित ‘कथा विविधा’ या पुस्तक प्रकाशनसमयी विनीत गोरे, सतीश राजवाडे, डॉ. लतिका भानुशाली, स्वप्नील जोशी, मुक्ता बर्वे, माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख, लेखिका ज्योती अळवणी, आमदार पराग अळवणी, शिवानी अळवणी आणि सानिया अळवणी**

‘कथा विविधा’ या ज्योती अळवणी लिखित कथासंग्रहाचे प्रकाशन, ९ डिसेंबर २०१८ रोजी, पार्ले येथे महाराष्ट्र सेवा संघाच्या पटांगणात पार पाडले. दृक्‌श्राव्य माध्यमातून या संग्रहातील विविध कथांची मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांनी करून दिलेली ओळख हे कार्यक्रमाचे वेगळेपण अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात ज्योती अळवणी यांच्या मातोश्रींच्या आशीर्वादाने झाली. ‘‘मातेचा आशीर्वाद हेच खरे ईशस्तवन होय त्यामुळे ईशस्तवनाची गरज नाही’’ असे भावपूर्ण उद्‌गार कार्यक्रमाच्या सूत्रसंचालिका समिरा गुजर-जोशी यांनी काढले.

‘ग्रंथाली’ प्रकाशनाच्या वतीने कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. लतिका भानुशाली यांनी केले. कथेच्या इतिहासाची सांगोपांग चर्चा मांडत ज्योती अळवणी यांच्या कथेची त्यांनी साहित्यिक आणि मानसशास्त्रीय चिकित्सा करत या कथासंग्रहातील वेगवेगळे बंध उलगडून दाखवले. त्याचबरोबर ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची माहिती रसिकांना दिली.

सुप्रसिद्ध दिग्दर्शक सतीश राजवाडे यांनी राजकारणी आणि कलावंत-लेखक यांच्यातील भेद उलगडून दाखवला. राजकारणी हे कोरडे असतात तर कलावंत-लेखक यांच्याकडे भावनेचा ओलावा असतो. ज्योती अळवणी यांच्या व्यक्तिमत्त्वात या दोन्ही भावनांचा सुरेख संगम झाला आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

यानंतर चिन्मयी सुमित यांनी ‘रेड वाईन’ या कथेचे अभिवाचन सादर केले.

या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीच्या खासदार पूनम महाजन या उपस्थित होत्या. रसिकांना संबोधित करताना ‘‘राजकारणी लोकं कोरडी असतात हे सतीश राजवाडे यांचे वचन खरे असले तरी ते पूर्ण सत्य नाही. शेवटी आम्हीही माणसेच आहोत. आम्हालाही भावना असतात पण राजकारणाच्या बजबजाटात कोरडेपण अंगात भिनत जाते’’ अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आपणही साहित्य वाचतो हे सांगत त्यांनी ‘कथा विविधा’ या कथेतील अनेक कथांचे पदर उलगडून दाखवले. आपले पिताश्री प्रमोद महाजन यांची भावपूर्ण आठवण काढत त्यांनी माझी आई ही उत्तम कविता लिहायची पण हे सर्व लोकांपर्यंत आणता आले नाही असा सल व्यक्त केला.

या कथासंग्रहातील ‘तो आणि ती’ ही कथा कोणा एका प्रियकर आणि प्रेयसीची नाही तर ती कृष्ण आणि त्याच्या आयुष्यात आलेल्या समस्त स्त्री वर्गाची कथा आहे. नात्याच्या अनुषंगाने जाणाऱ्या या कथेतील एक संवाद अभिनयाच्या आधारे चिन्मय मांडलेकर यांनी साक्षात जिवंत केला आणि टाळ्यांच्या कडकडाटात रसिकांची भरघोस दाद तो मिळवून गेला.

‘लाली’ ही या कथासंग्रहातील वेगळ्या अंगाने जाणारी कथा. कुंटणखान्याची पार्श्वभूमी असलेल्या या कथेचा काही अंश लघुचित्रपटाच्या माध्यमातून सादर करण्यात आला. या चित्रपटाचे निर्माते मंदार आपटे आणि अर्चना गोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांनी संस्कृत वचनं उद्‌धृत करत लेखिकेचे कौतुक केले आणि तिच्या पुढील कारकिर्दीला शुभाशीर्वाद दिले. ज्योती अळवणी यांचे पती आमदार पराग अळवणी यांनी ज्या सर्वांचा या लेखनप्रवासात पाठिंबा मिळाला त्या सर्वांचे जाहीर आभार मानत ज्योती अळवणी हिच्यातील लेखिका अधिक बहरेल यासाठी सर्वच कुटुंब तिच्यामागे खंबीरपणे उभे राहील ही खात्री दिली.

या प्रसंगी ‘लाली’ या लघुपटात भूमिका साकारणारे प्रदीप वेलणकर आणि अभिनेत्री अश्विनी वेलणकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सुप्रसिद्ध कलावंत मुक्ता बर्वे आणि स्वप्नील जोशी यांची

उपस्थिती हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते.

मुक्ता बर्वे यांनी या 'कथासंग्रहाला' शुभेच्छा देताना ''या कथेत चित्रपटाच्या शक्यता दिसत असल्याने, त्यापैकी एखाद्या चित्रपटात मला अभिनेत्री म्हणून भूमिका साकारायला निश्चित आवडेल'' असे मत व्यक्त केले तर स्वप्नील जोशी यांनी राजकारणी आणि डॉक्टर यांची तुलना करत दोघांकडेही नकारात्मक ऊर्जा सतत येते पण त्या ऊर्जेचे ते सकारात्मक ऊर्जेत रूपांतर करतात असा नवा विचार मांडला. पार्ले येथे असलेले संपन्न साहित्यिक, सांस्कृतिक, राजकीय वातावरण इथल्या माणसांची परिपूर्ण जडणघडण करते.'' त्याच मुशीत ज्योतीताई तयार झाल्यात हे नमूद करताना ''मी पार्लेकर नाही यांची खंत आहे'' असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी माजी उपायुक्त बरगाळकर, माजी महापौर अरुण देव, साहाय्यक आयुक्त पराग मसूरकर, निवृत्त न्यायाधीश बागेश्री परीख, निवृत्त न्यायाधीश सुनंदा जोशी, नगरसेवक मुरजीभाई, भालचंद्र शिरसाट, दीपक दळवी, अनिल मकवानी, अभिजित सावंत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## वीरपत्नींच्या तेजस्वी कथा : शिवाची शक्ती



**शिल्पा खेर लिखित 'शिवाची शक्ती' पुस्तक प्रकाशनसमयी जितेंद्र खेर, सुदेश हिंगलासपूरकर, शशिकांत पित्रे, प्रतिभा रानडे, अजित पारसनीस, लेखिका शिल्पा खेर आणि धनश्री धारप. स्त्री शक्ती सहभाग – सुहासिनी तासकर, मीरा पित्रे, उर्मिला गावंड, शर्वरी बापट, पद्मा राजे, उमा गोसावी, सुनिता वंजारी, गीता थापा, वीणा धोडपकर, शीला राऊत आणि शीला जयवंत**

सेनादलाच्या शौर्यांच्या अनेक कहाण्या आपण ऐकतो. त्यांची बहादुरी, जाज्वल्य देशप्रेम याचा सगळ्यांना अभिमान वाटतो. परंतु या सैन्याच्या मागे ठामपणे एक सैन्य उभे असते. ज्याप्रमाणे शिवाच्या मागे त्याची शक्ती असते.

सैनिकांनी निर्धास्तपणे देशाचे संरक्षण करावे म्हणून त्यांचे घर सांभाळणाऱ्या वीर पत्नींबाबत मात्र आपल्याला माहिती नसते. स्वतः मागे राहून आपल्या पतीला त्याच्या कार्यात मोलाची मदत करणाऱ्या या वीरपत्नींवर प्रकाशझोत टाकण्याचे महत्त्वाचे काम शिल्पा खेर या तरुण लेखिकेने या पुस्तकातून केले आहे. सैन्यातील अधिकारी, जवान यांच्या पत्नीचे जीवन कसे असते. तिला बऱ्याचदा लग्नाआधी या जीवनाविषयी काही माहिती नसताना ती या जीवनाशी कसे जुळवून घेते. त्यामध्ये कुठल्या अडचणींचा सामना तिला करावा लागतो. मनोधैर्य, विस्तृत दृष्टिकोन, फौजींची विचारसरणी या सर्वांशी तिचा कसा परिचय होत जातो व कशाप्रकारे या जीवनाचा ती एक अविभाज्य भाग होऊन जाते याचे सविस्तर वर्णन या पुस्तकात वाचायला मिळते. यात एकूण तेरा वीरपत्नींच्या मुलाखती आहेत. यामधून या स्त्रियांचे आपल्या शहर, गावांमधील जीवन, रेजिमेंटमधील, सीमेवरील जीवन, सैन्यामध्ये स्त्रियांना मिळणारा मान व आदर, सैनिकी जीवनाशी जुळवून घेतानाचे त्यांचे कौशल्य. पतीची शक्ती बनून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची प्रवृत्ती या सर्वाची माहिती वाचकांना मिळते.

पुस्तकाचे स्वरूप संभाषणाचे असून लेखिका व वीरपत्नी यांच्यातील गप्पांच्या स्वरूपात ते समोर येते. पुस्तकाची भाषा सोपी आणि ओघवती आहे. हे संभाषण सैन्यातील अधिकाऱ्यांच्या पत्नीशी असल्याने ओघातच इंग्रजी शब्दांचा वापर मधून-मधून येतो, तो नैसर्गिक वाटतो.


आपल्या नवऱ्याच्या कार्यात त्याची साथ देणं म्हणजे स्त्रीचं स्थान दुय्यम झालं, असा अर्थ होत नाही तर, तिची आधार देण्याची शक्ती यातून समोर येते. तसेच सैन्यातील नोकरी ही एका व्यक्तीची नसून ती दोघांची असते. हे या पुस्तकातून आपल्याला समजतं. ज्या तरुण मुली सेनादलातील तरुणांशी लग्न करू इच्छितात त्यांना या वीरपत्नींच्या मुलाखतीमधून खूप मार्गदर्शन मिळेल. सैनिकी जीवनात कशाप्रकारच्या अडचणी येऊ शकतात. कशाप्रकारची आपली विचारसरणी तेथील जीवनात सामावून घेताना असायला हवी. याविषयी रास्त मार्गदर्शन या वीरपत्नी करतात. जे खरोखरच उपयोगी आहे.

समाजाला माहिती देऊन मार्गदर्शन करण्याबरोबर मनोरंजन करण्याचे कामही हे पुस्तक करते. या पुस्तकामुळे सेनादलाचे एक आगळेवेगळे विश्व मैत्रिपूर्ण स्वरूपात आपल्यासमोर येते. त्यांना

आदर देणं, सन्मान करणं याबरोबरच समाजाने त्यांची विचारसरणी समजून घेणं व त्याप्रमाणे स्वतः जबाबदारीने, शिस्तीने वागण्याचा प्रयत्न करणं आवश्यक आहे. हा विचार या पुस्तकातील संवादातून समोर येतो. एक स्तुत्य प्रयत्न म्हणून या पुस्तकाकडे पाहता येईल.

या पुस्तकाला लेफ्टनंट जनरल (डॉ.) दत्तात्रय शेकटकर यांची वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. माजी पोलिस महासंचालक अजित पारसनीस याप्रसंगी म्हणाले की, एक ज्येष्ठ पोलिस अधिकारी म्हणून मी हे सांगू इच्छितो की युनिफॉर्ममधील प्रत्येक व्यक्तीने निष्ठेने, प्रामाणिकपणे काम करणं हे देशाच्या सर्वार्थाने प्रगतीसाठी फार आवश्यक आहे. आणि यासाठी त्यांच्या कुटुंबाची व समाजाचीही मनापासून साथ त्यांच्या कार्यात त्यांना मिळायला हवी, तर त्यांचा हुरूप अजून वाढेल.

## 'आमची आई'



**जळगाव येथील श्रद्धाधाम येथे आमची आई पुस्तक प्रकाशन करताना कविवर्य ना.धों. महानोर, अशोक जैन, कुलगुरू डॉ. पी.पी. पाटील, किशोर कुळकर्णी, सुदेश हिंगलासपूरकर, विजयराज बोधनकर, भालचंद्र पाटील, आनंद गुप्ते, आर. ओ. तात्या पाटील, सदानंद धडू भावसार व ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर**

विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या जळगाव जिल्ह्यातील मान्यवरांनी आपल्या आईने दिलेल्या संस्कारांची शिदोरी म्हणजे 'आमची आई' हे पुस्तक. हे पुस्तक पुढच्या पिढीला खरोखर प्रेरणादायी ठरेल असा विश्वास माध्यम क्षेत्रातील ज्येष्ठ आनंद गुप्त यांनी व्यक्त केला. जैन हिल्स येथील श्रद्धाधाम येथे भवरलालजी जैन यांच्या ८१ व्या औचित्याने जैन इरिगेशनचे सहकारी किशोर कुळकर्णी यांनी लिहिलेल्या 'आमची आई' पुस्तक प्रकाशनाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते. मान्यवरांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी व्यासपीठावर कविवर्य ना.धों. महानोर, कुलगुरू डॉ. पी.पी. पाटील, आर ओ तात्या पाटील, अशोक जैन, ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, उपस्थित होते.

पुस्तकामधील मान्यवरांनी आपल्या आई विषयी व्यक्त केलेले मनोगत प्रत्येकाला प्रेरणा देणारे आहे. आईने संस्कारित केलेल्या मूल्यांचा वारसा पुस्तकात दिसतो आहे. '' 'आई' या विषयावर अनेक साहित्य उपलब्ध आहे. मात्र खानदेशातील साहित्यिक, राजकीय, उद्योजक, सामाजिक कार्यकर्त्यांच्या आईंविषयी किशोर कुळकर्णी लिखित 'आमची आई' हे पुस्तक म्हणजे जगातील प्रत्येक आईंच्या मूल्यांचा वारसाच म्हणावा लागेल,'' असे ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर म्हणाले. ज्येष्ठ चित्रकार विजयराज बोधनकर यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठाच्या निर्मितीबाबत उपस्थितांना सांगितले.

माजी आमदार आर. ओ. तात्या पाटील यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास नंदकुमार बेंडाळे, माजी प्राचार्य अनिल राव,शरद डोंगरे, श्रीराम पाटील, सदानंद धडू भावसार, चारुदत्त गोखले, एस.पी. कुळकर्णी, सतीश कुळकर्णी, भारती कुळकर्णी सकाळचे संपादक राहुल रनाळकर यांच्यासह साहित्यप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल जोशी यांनी केले. डॉ. पी.जी. पिंगळे यांनी पुस्तक प्रकाशनाबाबत कविता सादर केली.

## 'सुंदर माझी शाळा'

''बालसाहित्य हे जबाबदारीचे काम आहे. मुलांची केमिस्ट्री कळते, तेव्हा उत्तम बालकविता लिहिली जाते. गणेश घुले असे केमिस्ट्री कळलेले कवी आहेत'', अशा शब्दांत कवी दासू वैद्य यांनी 'सुंदर माझी शाळा' पुस्तकाबद्दल भाष्य केले.

'ग्रंथाली' वाचक चळवळ, अभ्युदय फाउंडेशनतर्फे कवी गणेश घुले यांच्या 'सुंदर माझी शाळा' या बालकवितासंग्रहाचे रविवार, १६ डिसेंबर २०१८ रोजी गोविंदभाई श्रॉफ सभागृहात प्रकाशन झाले. मंचावर विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, शाहीर सुरेश वैराळकर, रा. रं. बोराडे, पद्मभूषण देशपांडे, सुदेश हिंगलासपूरकर, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, नीलेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

'जगावर राज्य करण्याची ताकद शिक्षणात आहे, परंतु मुलांना नीतिमत्ता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यात शिक्षणव्यवस्था कमी पडत आहे, या दृष्टीने कवी गणेश घुले यांचे 'सुंदर माझी शाळा' हा



कवी गणेश घुले



शाहीर सुरेशकुमार वैराळे



कवी दासू वैद्य



आयुक्त पुरुषोत्तम भापकर



**ग्रंथाली वाचक चळवळ, अभ्युदय फाउंडेशनतर्फे कवी गणेश घुले यांच्या 'सुंदर माझी शाळा' या बालकवितासंग्रहाचे प्रकाशन विभागीय आयुक्त मा. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी (डावीकडून) विजय कान्हेकर, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, कवी गणेश घुले, रा.रं. बोराडे, कवी दासू वैद्य, ज्येष्ठ शाहीर सुरेशकुमार वैराळकर, पद्मभूषण देशपांडे, सुहास तेंडुलकर, नीलेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.**



''बालसाहित्य हे जबाबदारीचे काम आहे. मुलांची केमिस्ट्री कळते, तेव्हा उत्तम बालकविता लिहिली जाते. गणेश घुले असे केमिस्ट्री कळलेले कवी आहेत'', अशा शब्दांत कवी दासू वैद्य यांनी 'सुंदर माझी शाळा' पुस्तकाबद्दल भाष्य केले.

'ग्रंथाली' वाचक चळवळ, अभ्युदय फाउंडेशनतर्फे कवी गणेश घुले यांच्या 'सुंदर माझी शाळा' या बालकवितासंग्रहाचे रविवार, १६ डिसेंबर २०१८ रोजी गोविंदभाई श्रॉफ सभागृहात प्रकाशन झाले. मंचावर विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, शाहीर सुरेश वैराळकर, रा. रं. बोराडे, पद्मभूषण देशपांडे, सुदेश हिंगलासपूरकर, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, नीलेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

'जगावर राज्य करण्याची ताकद शिक्षणात आहे, परंतु मुलांना

## पवारांनी दाखविल्या सर्वसामान्यांना प्रकाशाच्या वाटा

''कष्टमय जीवनातून चंद्रकला पवार यशस्वी झाल्या आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील मुला-मुलींना प्रकाशाच्या वाटा दाखविण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न कौतुकास्पद असून, त्या माझ्यापेक्षा ज्येष्ठ असल्याने शुभेच्छा देण्याऐवजी त्यांची भावी वाटचाल सुखी आणि निरामय जावो,'' असे प्रतिपादन आमदार राजाभाऊ वाजे यांनी केले.

पाटोळे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका चंद्रकला भास्कर पवार यांच्या सेवापूर्तीनिमित्त 'उजळल्या वाटा' सहचरित्र व 'प्रवाह' काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी अपर विक्रीकर आयुक्त किसन डगळे, शिवसेनेचे युवा नेते उदय सांगळे, नगराध्यक्ष किरण डगळे, राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष राजाराम मुरकुटे, मविप्रचे संचालक भाऊसाहेब खातळे, डॉ. राजेंद्र गोऱ्हे, सोनांबेच्या सरपंच पुष्पा पवार, भाजपा नेते डॉ. प्रशांत पाटील, अर्जुन बोऱ्हाडे, केरू कुंभार, पाटोळेचे सरपंच मेघराज आव्हाड, डॉ. रमेश पाटील, बाजार समितीचे माजी सभापती नामदेव शिंदे आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते 'उजळल्या वाटा' सहचरित्राचे व 'प्रवाह' या काव्यसंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. सेवापूर्तीनिमित्त भास्कर पवार व चंद्रकला पवार यांचा सत्कार करण्यात आला. माजी आमदार माणिकराव कोकाटे, पेशवे पतसंस्थेचे चेअरमन नारायण वाजे, व्हाईस चेअरमन अरुण वारुंगसे, मेघराज आव्हाड, डॉ. पाटील आदींनी पवार कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. किरण



**चंद्रकला पवार यांच्या 'उजळल्या वाटा' सहचरित्र व भास्कर पवार यांच्या 'प्रवाह' काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना आमदार राजाभाऊ वाजे, उदय सांगळे, किसन डगळे, राजाराम मुरकटे, डॉ. राजेंद्र गोऱ्हे आदी.**



भावसार यांनी प्रवाह काव्यसंग्रहाबद्दल तर दीपक भालेराव यांनी 'उजळल्या वाटा' या सहचरित्राबद्दल माहिती दिली. पिंपळगाव डुकारा येथील माजी विद्यार्थी ज्योती रहाणे, गौरव भगत, जान्हवी सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

राजेंद्र भावसार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदा पवार यांनी आभार मानले. प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य कार्याध्यक्ष अंबादास चाजे, देवनदी पतसंस्थेचे चेअरमन केरू पवार, डॉ. रवी पवार, ॲड. शरद चतुर, विष्णुपंत वाजे, सोपान पवार, बाजीराव बोडके, प्रा. रामदास वारुंगसे, रामनाथ डावरे, अनिल पवार, जनार्दन पवार, मच्छिंद्र डगळे, एम.डी. पवार, बेबी पवार, विश्वास गायकवाड यांच्यासह सामाजिक-शैक्षणिक-राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## 'पोलादी दिव्यांग'




**सुलभा वर्दे लिखित 'पोलादी दिव्यांग' पुस्तक प्रकाशनसमयी सुलभा आरोसकर, सुहासिनी चित्रे, संपदा वागळे, उज्ज्वल पाठारे, राजेंद्र पुरोहित, सुलभा वर्दे, डॉ. जयश्री मोंडकर, दिनकर गांगल आणि सुदेश हिंगलासपूरकर**

पॅराप्लेजिक फाउंडेशन, सायन ही संस्था २०१८-१९ वर्षात (स्थापना सन १९६८) सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहे. श्रीमती सुलभाताई वर्दे ह्या पॅराप्लेजिक फाउंडेशन या संस्थेच्या संस्थापिका, विश्वस्त आणि आजीवन अध्यक्षा आहेत. त्यांनी गेली ५० वर्षे इतर आजी-माजी सहकाऱ्यांच्या मदतीने या संस्थेमार्फत पॅराप्लेजिकांचे व इतर दिव्यांगांचे मानसिक, शारीरिक, आर्थिक आणि कौटुंबिक पुनर्वसन केलं आहे आणि करीत आहेत. पॅराप्लेजिक फाउंडेशनच्या शिरपेचातील मानाचा तुरा म्हणजे आपल्या कठीण प्रसंगाला निर्भीडपणे सामोरे जाऊन आपला जीवनानंद शोधत ज्यांनी आपलं आणि इतरांचे आयुष्य फुलवले आहे, जे आज आत्मसन्मानाने

स्वावलंबी जीवन व्यतीत करीत आहेत अशा काही प्रातिनिधिक दिव्यंगांच्या जीवनकथा 'पोलादी दिव्यांग' या पुस्तकात सुलभा आरोसकर, उज्ज्वल पाठारे, सुहासिनी चित्रे, संपदा वागळे या चार लेखिकांनी शब्दबद्ध केल्या आहेत. पुस्तकाचे संपादन श्रीमती सुलभाताई वर्दे यांनी केलेलं आहे. या पुस्तकाची प्रस्तावना दिनकर गांगलांनी केल्यामुळे पुस्तक श्रीमंत झाले आहे. 'ग्रंथाली'च्या या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार, १५ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी ११ वाजता लोकमान्य टिळक म्युनिसिपल जनरल हॉस्पिटलच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. याचे अध्यक्षपद सन्माननीय राजेंद्र पुरोहित, प्रदेशाध्यक्ष-दिव्यांग विकास आघाडी महाराष्ट्र राज्य यांनी भूषविले. विशेष पाहुण्या डॉ. जयश्री मोंडकर, अधिष्ठाता, लोकमान्य टिळक जनरल हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज ह्या उपस्थित होत्या. दिनकर गांगल विश्वस्त आणि माजी संपादक ग्रंथाली आणि सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त-संपादक ग्रंथाली यांनी ह्या सोहळ्यास उपस्थित राहून शोभा आणली. ह्या पुस्तकातील प्रत्येक कथा या प्रेरणादायी आहेत. त्यांच्या कथा वाचताना आपण नकळतपणे कथेशी समरस होतो. प्रत्येकजण या कथांतून स्फूर्ती घेऊन आपलं जीवन समृद्ध करतील. समाजात उत्तम आदर्श निर्माण करतील हे निश्चितच. या कथा वाचल्यावर म्हणावेसे वाटते. 'पोलादी दिव्यांग' पुस्तकातील कथांचे नायक-नायिका प्रकाशन सोहळ्यास आनंदाने आले होते. त्यांना भेटवस्तू आणि कृतज्ञतापत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## 'मन्तव्य'



**मेधा भावे लिखित 'मन्तव्य' कवितासंग्रह प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, विजयाताई खैर, लेखिका मेधा भावे, डॉ. रविन थत्ते, डॉ. विजया वाड आणि अरुण म्हात्रे**

दिनांक ८ डिसेंबर २०१८ रोजी ठाण्यात सहयोग मंदिर येथे एका कवितासंग्रहाचे अभिनव प्रकाशन झाले. काव्य, संगीत व तत्वज्ञान अशा त्रिमित अनुभवाला ठाण्यातील रसिकांनी मन:पूर्वक दाद दिली. ऋता भावे यांच्या सुरेल जय शारदे या सरस्वती वंदनेने सुरुवात करून डॉ मेधा भावे यांनी आपल्या निवडक कविता शैलीदारपणे सादर केल्या. ज्ञानिया ही ज्ञानेश्वरांवरची कविता दाद मिळवत मोगरा फुलला या अनुजा वर्तकांच्या गाण्यामधे जणू फुलली. कविता आणि साजेसे मराठी भावगीत अशी मैफल रंगली. एकल, प्रेमिका, आवर सावर , माहेरची जुई या कविता व बाजूला मेधाने काढलेल्या रेखाचित्रे व फुलवलेल्या फुलांची प्रकाशचित्रे यांचा दृश्यपट ही कल्पना श्रोत्यांना भावली. सैराट ही भावे दांपत्याने सादर केलेली नाट्यमय कविता हशा नि टाळ्या मिळवून गेली. श्री प्रणव हरदासांचं संगीत व अनुजा वर्तक यांनी गायलेलं ' गंधले धुंदले श्वास नादावले ' हे मेधाने लिहिलेले गीत चित्रफितीच्या स्वरूपात सादर केले गेले. यालाही प्रेक्षकांनी उत्कृष्ट प्रतिसाद व दाद दिली. मुख्य समारंभात पुस्तक प्रकाशनानंतर बोलताना श्री अरूण म्हात्रे यांनी कविता लिहिण्यासाठी एक प्रकारचा ब्रिलियन्स लागतो असं सांगत मेधा भावे यांनी आणखी असेच लिहावे व कवितावाचनाचे कार्यक्रम व्यवसायातून वेळ काढून करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कविता हा आविष्कार असून कुठल्या परिस्थितीतून तिचा जन्म झाला, कुठला उत्कट क्षण तिच्या निर्मितीला कारणीभूत ठरला याचा वेध घेणं महत्त्वाचे. विविध कवितांनी विनटलेलं हे भाषण श्रोत्यांना खुलवून गेलं. डॉ विजया वाड यांनी मेधाचं जीवन व तिनं केलेले काव्य यातला सहज संबंध उकलला. श्रीमती विजयाताई खैर यांना पुस्तक अर्पण केल्यावर त्यांनीही मेधाने मांडलेल्या नव्या कल्पना उचलल्या जाव्या असं सांगून उदाहरण म्हणून माझ्या लाडक्या लेका ही कविता वाचली. अध्यक्ष मा. डॉ. रविन थत्ते यांनी ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञान व त्या साठी ज्ञानेश्वरांनी योजलेल्या काव्यमय तरीही विज्ञानाधिष्ठित स्पष्टीकरणांचा उहापोह केला. मेधाने खास विनंती करून सुचवलेल्या वेगळ्या विषयावरील या अध्यक्षीय

भाषणाने सर्व मंत्रमुग्ध झाले.

सर्व मान्यवर तसेच विशेष उपस्थित ग्रंथालीचे श्री सुदेश हिंगलासपूरकर , रेखाचित्रकार इशा व संगीतकार प्रणव हरदास यांचा सत्कार करण्यातआला.

डॉ मंदार परांजपे यांच्या कोटीयुक्त सूत्रसंचलनामुळे कार्यक्रम रंगतदार झाला.

श्रोत्यामधे लेखक, डॉक्टर, कलाकार, वकील , पत्रकार. याम धून अनेक मान्यवर उपस्थित होते. ग्रंथालीच्या सुदेश हिंगलासपूरकर व धनश्री यांनी खूपच सहाय केले. त्यांच्याच शब्दात - देखणा व संस्मरणीय असा सोहळा झाला.

## 'कॅनव्हास'



**डॉ. स्मिता दातार लिखित 'कॅनव्हास' या पुस्तकप्रकाशनसमयी मोनिका गजेंद्रगडकर, लेखिका डॉ. स्मिता दातार, इब्राहिम अफगाण, उद्योगमंत्री सुभाष देसाई, माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख आणि अनिता दाते**

डॉ. स्मिता निखिल दातार लिखित दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा २८ डिसेंबरला गोरेगावत संपन्न झाला. त्यांचा 'कॅनव्हास' हा कथासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. रोजच्या जगण्यातले रंग, अनुभव, ताणे बाणे या कथासंग्रहात प्रतिबिंबीत झाले आहेत. तसेच त्यांची 'चौकोनाचा पाचवा कोन' ही कादंबरी संधिकाल प्रकाशनने प्रकाशित केली आहे. एका जिद्दी स्त्रीला एका आदर्श कुटुंबाचा चौकोन खुणावतो, तो मिळवण्यासाठी ती आटापिटा करते. तिच्या आयुष्यात काय अनपेक्षित वादळे येतात, आदर्श, सुखी कुटुंब म्हणजे काय हे तिला उलगडत का? याची रंजक कहाणी म्हणजे 'चौकोनाचा पाचवा कोन'.

प्रकाशन प्रसंगी उद्योगमंत्री सुभाष देसाई अध्यक्षस्थानी होते. माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख, साहित्यिका मोनिका गजेंद्रगडकर, ज्येष्ठ पत्रकार व लेखक इब्राहीम अफगाण, सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

ही पुस्तके एमेझोन आणि बुकगंगा तसेच अनेक पुस्तकांच्या दुकानात उपलब्ध होणार आहेत. (ग्रंथाली ०२२२४२१६०५० आणि संधिकाल ९६१९८७८३०८)

लेखिकेने याआधी ललित लेखन, लघु चित्रपटांचे पटकथा लेखन केलेले आहे. लवकरच त्यांची अन्य पुस्तके प्रकाशित होत आहेत.

## 'अरण्यलिपी'

कृष्णा-कोयनेच्या संगमामुळे सुजलाम सुफलाम असलेल्या कराड येथील स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती सभागृहात (टाउन हॉल) दिनांक २३ नोव्हेंबर, २०१८ रोजी २ रे अखिल भारतीय व ३२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात वन्यजीच लेखक प्र. सु. हिरुरकर यांच्या 'ग्रंथाली' प्रकाशन, मुंबई यांनी काढलेल्या 'अरण्यलिपी' या पुस्तकाचे थाटात विमोचन झाले. उद्घाटक ना. शेखर चरेगावकर यांनी या पुस्तकाचे विमोचन केले. याप्रसंगी व्यासपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर रिठे, माजी सदस्य, वन्यजीव मंडळ, भारत सरकार, प्रधान मुख्यवनसंरक्षक सुनिल लिमये, बीएनएचएसचे डॉ. राजु कसंबे, डॉ. जयंत वडतकर, अरण्यलिपी पुस्तकाचे लेखक प्र.सु. हिरुरकर आदी उपस्थित होते.

गेल्या तीस-पस्तीस वर्षापासून सरकारी नोकरी व कुटूंब सांभाळून अरण्य भटकंतीचा छंद जोपासलेले प्र.सु.हिरुरकर यांचे जंगल भटकंतीवर व निरीक्षणावर आधारित लेख राज्यातील प्रमुख वृत्तपत्रात वेळोवेळी प्रकाशित होत असतात. वन व वन्यजीवनाच्या निरीक्षणावरील अरण्यलिपी हे त्यांचे आठवे पुस्तक असून यापूर्वी त्यांचे अरण्यओढ, पक्षीमेळा, भुलनवेल, बांधवगडचा शिकारी, रानवेड, पडाव : रानावनातील ब्रिटिशकालीन विश्रामगृहे आणि याच पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर असलेले legacy of british Rest houses in forests ही पुस्तके प्रकाशित झाले आहेत. तसेच मेळघाट




व्याघ्र प्रकल्प, टिटवी आणि पोपटांचं गाव यावर त्यांनी व्हिडीओ लघुपटही निर्माण केले आहेत.

रानवाचन करतांना जंगलातील रानवाटांवर, पाणवठ्यांवर आणि झाडांझुडूपांवर वन्यजीवांच्या असलेल्या अस्तित्वखुणा यावर आधारित एक अरण्यलिपी या पुस्तकातून वाचायला मिळणार आहे. या अरण्यलिपीच्या माध्यमातून अरण्याचे अंतरंग आपणा समोर येणार आहे. 'अरण्यलिपी' हे पुस्तक जंगल भ्रमण करणाऱ्या निरीक्षकांना, अभ्यासकांना आणि निसर्गप्रेमींना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.


॥ग्रंथाली॥

# अभिनंदन




**डॉ. प्रकाश लोथे**
यांच्या **धर्मधुरीण**
या ग्रंथास
**महाराष्ट्र राज्य पुरस्कार, २०१८**



**श्री. अर्जुन व्हटकर**
यांच्या **मुक्या जंगलाची गर्जना**
या पुस्तकास
**महाराष्ट्र राज्य पुरस्कार, २०१८**


**गुणवंत अकरा क्रिकेटपटूंचा विश्लेषणात्मक जीवनपट..**

मेहता पब्लिशिंग हाऊस

**राजदीप सरदेसाई**

**डेमोक्रसीज इलेव्हन**

**भारतीय क्रिकेटची महान गाथा**




स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळात भारतीय क्रिकेट हा खेळ तत्कालीन संस्थानिक, अभिजन, श्रीमंत अशा विशिष्ट वर्गाची मक्तेदारी असायचा. 'शाही रंजन' असेच क्रिकेटचे स्वरूप होते. संस्थाने खालसा झाल्यानंतर कालौघात बदलत्या राजकीय परिस्थितीशी समांतर क्रिकेटची व्याप्ती इतरेजनात वाढत गेली. राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक स्थित्यंतर होत असताना भारतीय क्रिकेटमध्ये विकासात्मक परिवर्तन होत गेले. त्या काळापासून ते आजच्या 'नं-१ पोझिशन'पर्यंत यायला काही दशकांचा कालावधी उलटावा लागला. याच काही दशकांच्या कालावधीत अनेक गुणी खेळाडूंनी क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव कोरले.

'प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडिया'चे नामवंत पत्रकार आणि माजी कसोटीपटू दिलीप सरदेसाई यांचे चिरंजीव राजदीप सरदेसाई यांनी आजवरच्या क्रिकेटपटूंमधील आदर्श ११ जणांची निवड केली (खरेतर बहुतांश वाचकांच्या मनातले हेच आदर्श क्रिकेटर आहेत) आणि प्रत्येक खेळाडूची कारकीर्द वाचकांपुढे मांडली आहे 'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकातून. या ११ कीर्तिमान खेळाडूंची चरित्रकहाणी राजदीप यांनी शब्दबद्ध केली आहे. प्रस्तुत पुस्तकात त्यांची कारकीर्द आकडेवारीसह येतेच, पण त्यांचे मैदानावरील आणि मैदानाबाहेरील आयुष्याचे उद्धृत केलेले संदर्भ संक्षिप्त तरीही परिपूर्ण वाटतात. त्या त्या खेळाडूच्या खेळातील व खेळाबाहेरील गुणदोषांचे सटीक आणि सटीप विश्लेषण राजदीप करतात. या खेळाडूंच्या आयुष्यातील क्रिकेटचा 'उपोद्घात' (अर्थात प्रारंभ) आणि 'सिंहावलोकन' (अर्थात निवृत्ती) असा सर्वसमावेशक तपशील वाचकांना अवगत होतो.

हे पुस्तक दिलीप सरदेसाईंपासून मन्सूर अली खान पतौडी, बिशनसिग बेदी, सुनील गावसकर, कपिल देव, मोहंमद अझरुद्दीन,सचिन तेंडुलकर, सौरव गांगुली, राहूल द्रविड, महेंद्रसिंग धोनी ते विराट कोहलीपर्यंतच्या क्रिकेटपटूंच्या आयुष्याची गाथा मांडते. १९९९ साली विश्वचषक स्पर्धा सुरू असताना तेंडुलकरचे वडील गेले. तो इंग्लंडहून परत आला, वडिलांचे अंत्यसंस्कार केले आणि पुन्हा लंडनला परतला. थेट मैदानात उतरला आणि त्या सामन्यात त्यानं एक जादुई शतक ठोकलं. हीच कथा विराट कोहलीची. दिल्लीसाठी तो रणजी सामना खेळत होता. जेमतेम अठरा वर्षांचा मुलगा. त्या संध्याकाळी नाबाद घरी परतला आणि त्या रात्रीच काळानं घात केला. त्याचे वडील गेले. सकाळी हा मुलगा मैदानात गेला, खेळला. ९० धावा करून बाद झाला आणि तिथून थेट स्मशानात पोहोचला आणि वडिलांच्या चितेला अग्नी दिला. या कहाण्या भारतीय क्रिकेटचा जुनून सांगतात. क्रिकेटवर जीव ओवाळून टाकणारं बेभान प्रेम सांगतात. याच क्रिकेटनं लाखो भारतीयांना प्रेरणा दिली, जगण्याच्या लढाया लढण्याचं बळ दिलं. मुख्य म्हणजे स्वप्न पाहण्याची हिंमत दिली. हे पुस्तक म्हणजे त्या जिगरबाज मस्तमौला स्वप्नांची, अस्सल गुणवत्तेची एक विलक्षण गाथा आहे.

राजदीप स्वत: क्रिकेट खेळले आहेत. आनुवंशिक वारसा म्हणून क्रिकेट त्यांच्या रक्तातच आहे. म्हणूनच त्यांचे क्रिकेटविषयीचे विश्लेषण अनुभवाच्या मुशीतून आलेले आहे.

एखाद्या खेळाडूविषयी लिहिताना क्रिकेटमधले धुरीण, बुजुर्ग आणि समकालीन क्रिकेटपटूच्या मतमतांतराची पुस्तकात असलेली पखरण हा तर खास 'राजदीप टच' म्हणावा लागेल.

एखाद्या खेळाडूचे फक्त गुणवर्णन, त्याचे विक्रम आणि आकडेवारी, त्याची विश्वस्तरीय कामगिरी, त्याची शैली, त्याचे कौशल्य, देशातील आणि जगभरातील लोकप्रियता याचेच वर्णन पुस्तकात येते असे नाही. तर त्या खेळाडूचे दोष, त्याच्या चुका, त्याच्या वर्तनातील विसंगती, त्याचे फसलेले निर्णय, त्याच्याविषयीचे प्रवाद आणि समज, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची 'दुसरी' बाजू असे समग्र चित्र उभे करताना राजदीप शब्दांची कंजुषी करत नाहीत. उलट त्यांच्या लिखाणाला परखडतेची धार येते.

राजदीप यांची भाषा प्रवाही आहे. त्यात लालित्य आहे आणि सौंदर्यही... विषयाच्या ओघात आलेली त्यांची काही पल्लेदार वाक्ये पाहू :

त्या सभ्य काळाचं दिलीप सरदेसाई हे 'प्रॉडक्ट' होतं...
भविष्याच्या पोटात उमेदीचा गर्भ श्वास घेऊ लागला...
त्याच्या बॅटमधून धावांचे झरे फुटत होते...
आक्रमण हाच बचावाचा उत्तम मार्ग असतो...
रिचर्ड्सच्या उंच उडालेल्या चेंडूवर कपिलची नजर रुतलेली होती...
ज्या वयात गणित शाळकरी मुलांना घाम फोडतं,
त्या वयात हा मुलगा
नवीन समीकरणं जुळवत होता...
'तो' षटकार म्हणजे आपल्या आगमनाचा तेंडुलकरी ऐलानच होता...
याच काळात क्रिकेटचं कॉमर्सशी लग्न झालं...
विकासाच्या वाटेत इंडिया पुढे निघून गेला;
भारत मात्र मागेच राहिला...

पुस्तकात ठायी ठायी असलेली अशी वाक्यं राजदीपच्या प्रतिभेची, लेखनकौशल्याची आणि कल्पनाविलासाची प्रचिती देतात. चिवडा खाताना घासात काजूचा तुकडा यावा, अशीच ही खुमासदार वाक्यं आहेत.

मेघना ढोके यांचं अनुवादकौशल्य लाजबाब आहे. अस्सल मराठीकरणाचा हा उत्तम नमुनाच आहे. राजदीपच्या लेखनाची खुमारी मेघनाने दुणावली आहे.

आजच्या काळात क्रिकेट न आवडणारा विरळाच. पण असलाच, तर त्याने हे पुस्तक आवर्जून वाचावे. कदाचित त्याला क्रिकेट श्वासाइतकेच महत्त्वाचे वाटू लागेल


**– वा. ह. कुलकर्णी**

**डेमोक्रसीज इलेव्हन**
लेखक : राजदीप सरदेसाई, अनुवाद : मेघना ढोके
पृष्ठसंख्या : ५०४, किंमत : ५९५
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत ५०० रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**धनगरगाथा**
**रामचंद्र वरक**




**स्मृतिप्रकाशाच्या उजेडात**

''धनगर हा निसर्गाला देव मनणारा समाज आहे. निसर्गाच्या सान्निध्यात त्याचे जीवन संपन्न होत असते. पशुपालन हा त्याचा व्यवसाय असल्याने डोंगरदऱ्यात त्याला राहावे लागते. त्यामुळे निसर्गातील पंचमहाभुतांवर तो श्रद्धा ठेवतो. निसर्गाची पूजा करतो. धरतीला आई आणि आभाळाला बाप मानतो. त्याची जडणघडण या सर्व निसर्गाच्या सान्निध्यात होते असते.''

आपण आणि आपला समाज याविषयी तपशीलाने खोलात जाऊन शोध घेण्याची आवश्यकता ही अनेक कारणाने सिद्ध होते. यात केवळ समाजाचा अहंकार असण्याचे कारण नाही कारण आहे ते त्याचा इतिहास समजून घेण्याचा. 'समाज' या शब्दाविषयी अनेक प्रवाद आहेत, असू शकतात, पुढेही राहतील. परंतु या प्रत्येक समाजाचा मोठा समूह आपल्या रचनेत मानाचे स्थान अधिग्रहित करून अढळ स्थानी स्थापित झालेला आहे आणि तो कुणालाही नाकारता येणार नाही. ललित लेखनातून प्रतिबिंबित होणारे समाजदर्शन आणि केवळ समाजदर्शन म्हणून केलेले शोधलेखन यात नक्कीच मोठा फरक आहे. असे शोधलेखन नक्कीच अभ्यासकांना उपयुक्त ठरते. असाच एक शोध रामचंद्र वरक यांनी घेतला आहे, 'धनगरगाथा' या नावाच्या पुस्तकातून.

रामचंद्र वरक हे लोककला आणि लोक साहित्याचे अभ्यासक आहेत. आयएनटी सारख्या संस्थेशी जोडलेले आहेत. 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते', 'जलदर-वृंदा' ही त्यांची लोकसाहित्याला वाहिलेली पुस्तके यापूर्वी प्रकाशित झालेली आहेत. 'कोकणातील दशावतारी नाट्य' या माहितीपटाची संकल्पना, लेखन व दिग्दर्शन त्यांचेच आहे. त्याच प्रवासातील पुढचा टप्पा म्हणजे हे 'धनगरगाथा' पुस्तक.

धनगर हा समाज आपल्याला परिचित आहे. शेळ्या-मेंढ्या दिसल्या की आपल्याला त्याची पटकन ओळख पटते. सतत उन्हातान्हात राबणारा, काटक, कणखर, रानावनाशी जोडलेला, आपले जग आणि आपले काम यात रमलेला! रामचंद्र वरक त्याची ओळख या पुस्तकातून करून देतात. खोलवर जाऊन त्यांनी केलेला अभ्यास आणि या समाजाची मुळे शोधून काढण्याचा केलेला प्रयत्न खरोखरच स्तुत्य म्हणायला हवा. सातवाहन, होयसाळ, मौर्य, पल्लव, राष्ट्रकुट, यादव, कदंब, कुरूब, भोज, शिलाहार, आदि राजघराणी ही भारतवर्षाची शिल्पकार आहेत. त्यांचा स्वतःचा अमिट असा ठसा आजही कायम आहे. ही क्षत्रिय राजवंशीय परंपरा होळकर घराण्यापर्यंत येते. ही सगळी राजवंशांची घराणी धनगर होती. यातून चातुर्वर्णांचा विचार करता धनगर कुठल्या वर्गात मोडतात हा प्रश्न आपोआपच निकालात निघतो. लेखकाने धनगर हे क्षत्रिय आहेत असे अनुमान सप्रमाण मांडले आहे. राज्यभिषेकाचा अधिकार फक्त क्षत्रियांनाच असतो आणि वरील सर्व राज्यकर्ते हे राज्यभिषिक्त राज्यकर्ते होते. संसदभवनाच्या प्रवेशद्वाराशी जो पुतळा बसविण्यात आलेला आहे, तो चंद्रगुप्त मौर्य यांचा आहे, यातच सारे आले.

लेखकाने धनगर या शब्दाची उत्पत्ती दिलेली आहे. धन हा शब्द 'धेनू' या शब्दापासून आलेला, म्हणजे गोधनापासून हा 'धन अधिक आगर' असे याचे रूप आहे. सणवार, चालीरिती, रुढी, परंपरा प्रत्येक समाजाच्या वेगवेगळ्या असतात. प्रसंगानुरूप त्यांचे साजरेपण अनुसरले जाते. त्याचाही शोध लेखकाने घेतलेला आहे. एकच गोत्र आणि कूळ असेल तर विवाहसंबंध होत नाहीत. विवाहप्रसंगी मंगलाष्टके म्हटली जातात, ती खास धनगर शैलीतील 'गणू' असतात. या विधींसाठी समाजातील काही घराण्यांना पौरोहित्याचा मान दिलेला असतो. ते लग्न लावतात. पुनर्विवाहाची प्रथा आहे, त्याला 'पाट लावणे' असे नाव आहे. या पुनर्विवाह केलेल्या दांपत्याला देवपूजेचा किंवा कन्यादानाचा अधिकार नसतो. लग्नापूर्वी मृत्यू झाल्यास त्या मृतदेहाचे दहन करण्यापूर्वी रूईच्या झाडाशी लग्न लावले जाते. समाजाच्या स्वतःच्या काही प्रथा, परंपरा आहेत. कुणी त्यांचा भंग केला तर त्यासाठी निर्णय घेणारी धनगर जातपंचायत आहे. वादविवाद सोडविणे, दंड आकारणे किंवा बहिष्कार घालणे, अशा शिक्षा देण्याचा अधिकार या पंचायतीला आहे.

धनगर समाजात असलेल्या पोटजातींचा तपशील यात दिलेला आहे. पूर्वी त्यांची बारा गोत्रे होती आणि त्यांची विभागणी साडेतीन पोटजातीत केलेली होती. अहिर, हटकर, आणि म्हसकर या पूर्ण जाती तर खुटेकर ही अर्धी जात. अलीकडे त्यांची संख्या तेवीस झाली आहे. ती नावे इथे दिलेली आहेत. खंडोबा हे कुलदैवत तर प्रत्येकाच्या कुलदेवता वेगवेगळ्या आहेत. गाणी, खेळ, कलाप्रकार, चालीरिती, पेहराव, आहार, भाषा, अशा सर्व घटकांचा वेध या पुस्तकातून घेतलेला दिसून येतो.


लेखकाने अतिशय तपशीलवार असा शोध घेतलेला आहे. हा शोध भाषेच्या पांडित्यात अडकलेला नाही. सहज सोपी आणि ओघवती. आपण काही वेगळे मांडतो आहोत, असा अभिनिवेश नाही. विषयाची मांडणी सुटसुटीत आणि समर्पक अशी केलेली आहे. आवश्यक तेथे फोटो दिलेले आहेत. गाणी दिलेली आहेत. महत्त्वाचे म्हणजे व्यवहारात असलेल्या बोली भाषेचे अर्थासह परिशिष्ट सोबत जोडले आहे तसेच वेगवेगळ्या राज्यात धनगर समाजाला ज्या नावांनी ओळखले जाते, त्यांचा तक्ताही जोडलेला आहे. कुणाही समाजसंशोधकाला पथदर्शक ठरावे, असे हे लेखन आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी. पेहराव, देहयष्टी आणि व्यवसाय यांच्या सोबत भंडाऱ्याचा हळदी रंग, यांचा सुंदर संगम झालेला आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**स्वल्पविराम**
**ज्ञानराज पाटकर**




## फिरूनी नवा जन्मेन मी!

अन्न, वस्त्र आणि निवारा या व्यतिरिक्त माणसाला जगण्यासाठी आणखी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, असा प्रश्न विचारला तर? तर अशा आवश्यकतांची भलीमोठी यादी समोर येईल. ती प्रत्येकाची आवड, गरज आणि स्तरानुसार भिन्न देखील असू शकेल. अर्थात यात वावगे असण्याचे कारणही असू नये परंतु या यादीत या दोन आवश्यकतांची नावे असतील का, सुदृढ शरीर आणि सुदृढ मन? सर्वकाही सुजलाम सुफलाम आहे, कुबेर हात जोडून उभा आहे, उणीव मात्र आहे ती सुदृढ शरीर आणि सुदृढ मनाची, चालेल? कोडी घालण्यासाठी हा प्रश्न विचारीत नाही. या सुदृढतेच्या व्याख्येला अपवाद ठरण्याची शक्यता ज्यांच्यावर ओढवते, त्यांच्या नजरेतून या प्रश्नाकडे पाहिले तर त्याचे महत्त्व आपोआप लक्षात यायला वेळ लगणार नाही. 'स्वल्पविराम' नावाचे हे पुस्तक या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधून घेते.

ज्ञानराज पाटकर हे आयआयटी इंजिनिअर, कलावंत. नाटक, मालिकांतून अभिनय केलेले, लेखक असलेले, असे एक उमदे व्यक्तिमत्त्व! सर्वकाही मनासारखे जगणे सुरू असताना एका आजाराच्या विळख्यात सापडतात, त्याचे नाव किडनीदोष. या एका आजाराने जगण्याच्या व्याख्या कशा बदलतात, याचे अनुभव म्हणजे हे पुस्तक. किडनीदोष निर्माण झाल्यानंतर पाटकर या आजाराला कसे सामोरे जातात, त्यावर कशी मात करतात, याचे वर्णन म्हणजे पुस्तक. परंतु तेवढेच सांगण्यासाठी त्यांनी हा लेखनप्रपंच केलेला आहे, असे मात्र नक्कीच नाही. ही गोष्ट खरी आहे, आपले अनुभव इतरांना सांगितले तर आपल्या दुःखाची तीव्रता कमी होते. मन हलके होते. परंतु पाटकरांचा हेतू तेवढा संकुचित नाही. दुःख हलके करण्याचा आहे, पण तो स्वतःचे नाही, इतरांचे. स्वतः जे अनुभवले ते इतरांच्या वाट्याला येऊ नये, अथवा आलेच तरी त्याची तीव्रता सौम्य असावी, ही त्यामागची तळमळ आहे. स्वतःच्या दुःखाकडे त्यांनी आजारी माणसाच्या नजरेने पाहिलेले नाही. आठवड्यातून तीन-तीन वेळा डायलेसिस, सूज आलेल्या पायांतून पाझरत राहणारे पाणी, पाण्याचा संचय अंगात झाल्याने वाढलेले वजन, तरीही पाटकर स्वतः कार चालवत उपचारासाठी दवाखान्यात येतात. डॉक्टरांशी हसतखेळत गप्पागोष्टी करतात. वातावरण प्रसन्न ठेवतात. इतकेच नव्हेतर उपचारानंतरचे आयुष्य पुन्हा नव्याने पूर्वीप्रमाणे त्याच उत्साहाने सुरू ठेवतात. या सगळ्या प्रवासात कुठेही हारल्याचा ओरखडा मनावर नाही, ना मनाचा तोल ढळलेला. जगण्याला आपल्या पावलावर पाऊल ठेवायला लावणारे खंबीर मन पाटकरांकडे आहे, तेही हसतमुखाने, हेच यातून दिसून येते.

पाटकर किडनी ट्रान्सप्लांट या विषयी अनुभव कथन करतात, तसा या प्रक्रियेतील कायदेशीर, वैद्यकीय बाबींवरही प्रकाश टाकतात. ऑपरेशन करण्याइतक्याच महत्त्वाच्या या बाबी आहेत. त्या पूर्ण केल्या तरच ऑपरेशन थिएटरच्या टेबलापर्यंतचा प्रवास करता येतो. याच्या जोडीला किडनीची कार्ये, किडनीविकारांना कसे दूर ठेवता येईल, या विकारांची कारणे, घ्यावयाची काळजी, असे किडनीमाहात्म्यही त्यांनी सांगितले आहे. या काळात पत्नी शुभदा, बहीण गौरी, गौरीच्या सासरकडील मंडळी, मुलगी ऋचा, मुलगा रसेश यांच्याविषयी तर तपशील आहेच परंतु या काळात देवदूतासारखी धावून आलेली आणखीही काही मंडळी आहेत, ती जगण्याला खांब देण्याचे काम करतात. त्यांच्या देण्याच्या गुणधर्माविषयी लिहिताना पाटकर म्हणतात, 'माझ्या आजारपणात मी ह्या मानवधर्माचा प्रत्यय वारंवार घेतला!'

किडनीविषयी जनजागृती करण्याचे काम पाटकर करतात. त्यांच्यातला कलावंत केवळ स्वतःच्या अंगी असलेल्या कलाप्रेमाची मशागत स्वतः साठी करीत नाही, तिचा उपयोग या आजारग्रस्तांना जागरूक करण्याचे, आधार देण्याचे काम करतो. 'नर्मदा किडनी फाऊंडेशन'शी ते स्वतःला जोडून घेतात. 'नवजीवन' नावाचे पुस्तक लिहितात. 'जीवनदान' पथनाट्याचे प्रयोग करतात. 'जिते है शानसे' हे नाटक सादर करतात.


आत्मकथन म्हटले की त्यात येणाऱ्या तपशिलांची साखळी किती लांब असेल याला मर्यादा नसते परंतु पाटकरांनी स्वतःला एका विशिष्ट अशा मर्यादेत ठेवलेले आहे, रंगमंचावर सादर करावयाच्या कलाकृतीसारखे. कुठेही पाल्हाळ वा फापटपसारा नाही. नेमकेपण जपण्याचा हा स्तुत्य प्रयत्न म्हणावा लागेल. त्यांची ओघवती शैली तर मोहात पडावी अशी आहे, प्रसन्न. तिला विनोदाची झालर आहे. प्रकरणांना लेखांसारखे स्वरूप दिलेले असून समर्पक अशी त्यांनी शीर्षके दिलेली आहेत. प्रत्येक लेख आटोपशीर, म्हणजे अवघा तीन-चार पानांचा. सगळ्यांत लक्षात राहणारी गोष्ट म्हणजे लेखांचा शेवट. कवितेच्या ओळींनी वा गझलेल्या शेराने शेवट केलेला आहे. लेख संपला तरी त्या ओळी मनात तशाच रुंजी घालीत राहतात. आपली किडनी एकदातरी तपासून पाहण्याची आवश्यकता आहे, असे पुस्तक वाचल्यानंतर प्रत्येकाला जाणवेल आणि तसे झालेतर या पुस्तकाचा हेतू साध्य झाला असे म्हणता येईल.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ अनिल दाभाडे यांनी सजवलेले आहे. 'किडनी शाबूत तर आनंदी जगणे, तेव्हा तिची काळजी घ्या,' हा संदेश हे मुखपृष्ठ देते.

**मूल्य १२५ रुपये सवलतीत ७५ रुपये**




# ग्रंथपान




**इंद्रधनू कथांचे**

ज्योती अळवणी यांचा हा पहिलाच कथासंग्रह, 'कथाविविधा'. मोजून सात कथा असलेला. रहस्य, गूढ, सामाजिक, राजकीय, विज्ञान, भावनिक आणि पौराणिक, अशा सात वेगवेगळ्या छटा असलेल्या कथा. इंद्रधनूत सात रंग असावेत तशा. पहिल्याच प्रयत्नात असे विविधांगी लेखन करणाऱ्या लेखिका स्वतःच्या कथेविषयी मनोगतात व्यक्त होतात त्या अशा, 'मला माझ्या स्त्रीजन्माचा आदरयुक्त अभिमान आहे. शिवाय अनेक वर्षे भारतीय स्त्रीशक्तीचं काम केल्याने या अभिमानाला विचारांची बैठक मिळाली आहे. त्यामुळे माझ्या कथांमधील मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व स्त्रीचंच असतं; हे तुम्हाला माझ्या कथा वाचताना नक्कीच जाणवेल.'

अळवणी यांनी मनोगतात स्पष्ट केल्याप्रमाणे कथा वाचताना त्यांचे वेगळेपण जाणवतेच. शिवाय स्त्री ही प्रत्येक कथेत मध्यवर्ती व्यक्तिरेखा असल्याचेही दिसून येते. त्यांची पहिलीच कथा 'रेडवाईन' प्रेमाची उत्कट तितकीच निर्मळ पातळी कशी असू शकते, याचे चित्रण करते. प्रेम आणि वाईन यांच्यातले साम्य व्यक्त करताना त्या लिहितात, 'रेड वाईनमध्ये एकूणच एलिगन्स आहे, नाजूकपणा आहे,वाईन घेताना ती कधी संपूच नये असं सारखं वाटत असतं. तसंच आपल्या नात्याचं... भेटलो की तो संपूच नये असं वाटत. रेड वाईन म्हटलं की एक शांत संध्याकाळ...मावळतीचा सूर्य किंवा एखादी पौर्णिमेची रात्र आठवते. समोर अथांग समुद्र... जो आपल्या दोघांनाही आवडतो.... रेड वाईनचा लाल रंग; तू असलीस की सगळं गुलाबी होतं नं. हा गुलाबी रंग पण त्या लाल रंगात मुरला आहे. अजून एक,रेडवाईनची चव बराच वेळ रेंगाळते ...तुझ्या आठवणीसारखी...सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे रेडवाईनला एस्पायरी डेट नसते... उलट ती जितकी जुनी, तेवढीच तिची चव मुरते...तिचा एलिगन्स वाढतो आणि रंग गहिरा होत जातो.'

'लालीची गोष्ट' ही कथा म्हणजे चिखल आणि कमळाची कथा. चिखलात उमलेले कमळ म्हणजे लाली. या चिखलात ती कशी शोभून दिसेल, याचे मनोरथ रचणारी कोठेवाली अम्मा, याच चिखलात स्वतः रुतलेली असूनही आता हे आयुष्य लालीच्या नशिबी नको म्हणून तिला बाहेर ढकलणारी लालीची माई आणि यासाठी मदत करणारा तिचा भाऊ रंगा, जो स्वतः हेच आयुष्य स्वीकारतो परंतु लालीला मदत करतो. लालीलाही सापडलेली वाट सरळ नाहीच. तरीही... अनेक व्यक्तिरेखांना स्वतंत्र असा आयाम देणारी ही कथा शेवटपर्यंत श्वास रोखायला लावते.

'राज की समाज...कारण! (?)' ही कथा ग्रामीण राजकारणावर प्रकाश टाकते. गावोगावी राजकारणाची बेटे असतात आणि ती एकाच कुटुंबाच्या मालकीची असतात. या बेटांना वेढा देणारा गाव हा जणू तालावर नाचणारा, प्रसंगी डोळे झाकून अन्याय पाहत राहणारा समाज असतो. परंतु हे बेट उद्ध्वस्त करणारा शिलेदार कधीतरी येतोच. तशी आण्णा आणि त्याचा मुलगा उदय यांच्या या बेटाला उद्ध्वस्त करण्यासाठी सुगंधा येते आणि कृष्णासारखी मागे राहून शैलाला निवडणुकीच्या मैदानात पुढे उभी करते.

'श्य...जपून बोल!' ही वेगळी कथा आहे. एका वाड्यात रात्री मुक्कामासाठी आलेल्या मैथिली, अवनी, मंजू, अभी, वर्धा, राजन यांना जे अद्भूत अनुभव येतात, त्याची ही गूढकथा आहे हे यातल्या रामूकाकाचे वाक्य कायम लक्षात राहावे असे आहे, 'बरं...जसं तुम्ही म्हणाल तसं जी.'

'डोळे' ही कथा मोठा पट घेऊन आलेली दीर्घकथा होय. राजघराण्याची पार्श्वभूमी असलेली ही कथा अनेक आवर्तातून साकार होत जाते. 'खिडकी पलीकडील जग' या कथेने गौरीचे जग उभे केलेले आहे. ही सुद्धा दीर्घ कथा म्हणावी अशी कथा आहे. 'तो व ती' ही महाभारताचे सार सोबत घेऊन आलेली कथा. यात कृष्ण आहे तोच्या रूपात आणि तिच्या रूपात आहेत त्याची प्रेयस राधा, बहीण सुभद्रा, सखी द्रौपदी, आत्या कुंती, आणि आठ पत्नी... रुक्मिणी, सत्यभामा, जांबवंती, मित्रविंदा, सत्या, लक्ष्मणा, भद्रा, कालिंदी. या प्रत्येकीच्या मनातले भावभावनांचे कल्लोळ आणि मध्यभागी असलेला कृष्ण, असे या कथेचे स्वरूप आहे. एक वेगळा प्रयोग म्हणजे ही कथा. तिच्यातून लेखिकेच्या दृष्टिकोनाची आणि चिंतनाची कल्पना येते.

लेखिका सामाजिक कार्याशी निगडित आहेत. समाज आणि सामाजिक भान यांच्याशी त्यांचे जोडले जाणे त्यामुळे स्वाभाविक म्हणावे लागेल. परंतु हे भान जेव्हा साहित्यातून व्यक्त होते तेव्हा त्याचे स्वरूप वैश्विक होते. लेखिकेच्या या लेखनातून त्याची जाणीव अधिक दृढपणे व्यक्त झालेली दिसून येते. कथांची पातळी आणि स्तर भिन्नभिन्न आहेत, तशा त्यातल्या व्यक्तिरेखा आपापल्या स्तरावर तितक्याच ठळकपणे चित्रित झालेल्या आहेत. व्यक्तिरेखांच्या भोवती असलेला समाज, वास्तव, भाषा, यातून एक संपूर्ण आकृतिबंध तयार होतो, त्यासाठी आवश्यक असते ती योग्य ते भान राखण्याची. या कथा त्याचा प्रत्यय देतात आणि त्यातूनच लेखिकेच्या पुढील वाटचालीची ग्वाही देतात. मधु मंगेश कर्णिक यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे.

पुस्तकाची निर्मिती आणि मांडणी यात वेगळेपण दिसून येते. तसेच मुखपृष्ठ. अनंत खासबारदार यांनी रंगांचा सुंदर आविष्कार पेश केला आहे, शीर्षकाच्या अंतरंगाशी एकरूप होणारा. सुंदर!

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

## ग्रंथपान

**डोळ्यांत अंजन घालणारी सुंदर शाळा!**

निसर्गाने थेट जर पैसे दिले असते
पैशाचेही वाटप मग समान झाले असते

बालसाहित्याविषयी असणारी आस्था सर्वत्र दिसून येते. मात्र तसे सकस आणि दाणेदार साहित्य तुलनेत फारसे आढळत नाही, असा एक सूर अलीकडच्या काळात ऐकू येतो आहे. त्याला काही अपवाद नाहीत असे नाही परंतु त्यांचे प्रमाण पुरेसे नाही, ही सत्यता नाकारता येत नाही. या सत्यतेला अपवाद करणारा बालकवितासंग्रह उपलब्ध झाला आहे, त्याचे नाव आहे, 'सुंदर माझी शाळा.' 'सुंदर' या शब्दाला न्याय देणारा असा हा संग्रह आहे हे निर्विवाद! या संग्रहातील कवितांचा मनोरंजन हा स्थायिभाव आहेच, परंतु त्या केवळ मनोरंजन करीत नाहीत, जाता जाता त्या डोळ्यांत अंजन घालायला देखील विसरत नाहीत.

गणेश घुले यांचा हा बालकवितासंग्रह आहे. यातील सर्व कविता या गेय स्वरूपात आहेत. चालीवर सहज म्हणता येतील अशा. ही चाल अंगभूत आहे. आपण वाचत असताना ती लय आपली सोबत करीत राहते. लय, नाद यांचा गोडवा सांभाळायचा तर शब्दांची मांडणी देखील त्याच लयीत आणि क्रमाने व्हावी लागते. त्यासाठी अनेकदा जुळवाजुळवी करून तो हेतू साध्य करण्याचा प्रयत्न अनेकजण करतात. त्यामुळे त्या कविता चैतन्य निर्माण करण्याऐवजी निर्जीव तरी होतात किंवा त्यांच्यातला कृत्रिमपणा ओरखडे ओढताना जाणवतो. गणेश घुले यांच्या या संग्रहातील कवितांमध्ये अशी ओढाताण नाही, कृत्रिमपणा नाही. अगदी सहज उमलत जाण्याऱ्या कळीसारख्या या कविता उमललेल्या दिसतात. त्यांच्यातले नितळपण फुलांच्या पाकळ्यांसारखे रेशमी आहे. शब्द सहजसुंदरतेच्या रसात न्हाऊन आलेली आणि प्रसन्न मुद्रेने कवितेच्या परडीत बागडत असलेली ताजी टवटवीत फुलेच आहेत, असा आनंदमय भास होत राहतो.

शाळा हे या संग्रहाच्या बागडण्याचे स्थान आहे. शाळेशी जोडलेल्या अनेक कविता यात आहेत. पूर्वी असलेली शाळा, शिक्षक, फळा, अभ्यास आता राहिलेले नाहीत. सगळे स्वरूपच बदलून गेले आहे. या दोन्ही काळाशी अनुरूप अशा कविता यात आहेत. कवी या बदलत जाणाऱ्या, अवतीभवती घडणाऱ्या घटनांकडे सजगपणे पाहत असल्याचे दिसून येते. आता विद्यार्थीच सरांना विनवणी करीत आहे, 'सर, असे शिकवा की, टीव्हीसारखी पुस्तकाची गोडी लागली पाहिजे.' परीक्षा आणि सुट्टी या परस्पर विरोधी असलेल्या शाळा नावाच्या नाण्याच्या दोन बाजू. परंतु घरात देखील अशाच दोन बाजू असतात, आई आणि बाबा यांच्या रूपात. बाबा म्हणजे परीक्षा आणि आई म्हणजे सुट्टी. सरांची छडी ही जशी शिक्षा देणारी असते, तशी संस्कार करणारीही असते. शाळेच्या चौकटीत हुशार आणि 'ढ' यांची विभागणी आलीच. परंतु 'ढ'लाही काही म्हणायचे असते. वास्तविक कुणीही 'ढ' नसतोच. त्याला भाबडा प्रश्न पडतो, इतर हुशार मुलांसारखेच सर्वकाही करायची तयारी आहे, तरी सगळे आपल्याला 'ढ' का म्हणतात? कवितांमधून झाडी, वेली, पाऊस असे कितीतरी विषय मुलांच्या भोवती फेर धरतात. इथे पाऊस येतो रिमझिम पावलांनी. त्याचे येणे किती सुखद असते पाना –फुलांसाठी, झाडांसाठी, सगळ्यांसाठी. यातली नाजूक सर कवीच्या कल्पनेतून येते, 'रिमझिम पाऊस आला छान, हिरव्या पिकांची भागली तहान.' सुंदर कल्पना तर अनेक आहेत. त्यातलच एक, 'पानाआडून लाजणारी कळी म्हणजे झाडाच्या गालावरची खळी.'

या संग्रहातल्या काही कविता तर अंतर्मुख होऊन स्वतःकडे पाहायला लावतात. महिलांना मंदिरात 'प्रवेशबंदी' हा विषय सध्या खूपच संवेदनशील झालेला आहे. या विषयाकडे एक बाळ आपल्या आईला समोर उभे राहून विचारते, 'आई, तुलाच जर मंदिरात जाता येत नसेल, तर मग देव त्याच्या आईला कसा भेटत असेल?' भ्रूणहत्या हा आणखी एक विषय. ही हत्या करू नको म्हणून मुलगीच आईला वचन देते, 'आई जन्मा आधी माझा प्राण घेऊ नको, तुला अभिमान वाटेल अशी मी वागेन. फक्त मला आई कशी दिसते ती पाहू दे.' झाडही असेच सांगते मुलाच्या स्वप्नात येऊन, माझी कत्तल करू नका. झाडाविषयीच्या कवितांमधून रंजन होते तसा संदेशही येतो, झाडे लावा! मोबाईलने घरातला संवाद कुलुपबंद केला आहे. तेव्हा बाळच म्हणते, 'पुढच्या जन्मी मला मोबाईलचा जन्म दे, म्हणजे आईबाबाच्या हातात सतत राहीन.' पाणी हा प्रश्न आहेच. मामाच्या गावाचे वर्णन करताना आताचे चित्र वेगळे आहे. मामाची सुगरण बायको आता पाण्यासाठी वणवण करते आहे.

**सुंदर माझी शाळा**

**गणेश घुले**




या संग्रहातील सर्वच कविता सुंदर आहेत. मनाची पकड घेणाऱ्या आहेत. आशयाचा आवाका मोठा ठेवलेल्या, तरी उद्देशाच्या कुंपणाच्या आवारात मनसोक्त खेळायला सोडलेल्या. एक बांधीव अनुभव देणाऱ्या. कुठल्याही वयातील वाचकाला त्यांच्या प्रेमात पडायला लावणाऱ्या. प्रत्येक घरातील पालकांनी स्वतः आनंद घेत आपल्या पाल्यांना म्हणून दाखवाव्यात अशा या कविता आहेत. काही शब्द सहजपणे कवीच्या मातीतून येतात. ताण, हिव, खोपा, सुधरत, बारका, सासवणी, पेंडवलता. हे शब्द त्या कवितेचा मृद्गंध सर्वदूर पसरविण्यात मदत करतात. तीच गोष्ट चित्रांची. प्रत्येक कवितेला चित्रांची जोड देऊन सजवलेले आहे. ही चित्रे देखील रंगीत, ठसठशीत, बोलकी, प्रसन्न दरवळ पसरवणारी, कवितेसारखीच परिपूर्ण. मांडणी देखील उत्तमप्रकारे केलेली आहे. चित्रे, मांडणी आणि मुखपृष्ठ यांचे किमयागार आहेत पुंडलिक वझे. या पुस्तकाची निर्मिती अतिशय सुबकपणे करण्यात 'ग्रंथाली'ने कुठलीही कसर ठेवलेली नाही.

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**



तुमची स्वप्ने
आम्ही करतो साकार
2 Last EMIs FREE!
महासुपर
गृह कर्ज
• फ्लॅट/व्हिला/घर खरेदी करण्यासाठी
• प्लॉटची खरेदी आणि त्यावर घर बांधणीसाठी
• अन्य बँकेकडील कर्ज टेक-ओव्हर करण्याची सुविधा
₹2.67 लाखांपर्यंत* सबसिडी मिळवा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत
कर्ज परतफेड कालावधी - 30 वर्षे, कर्जदाराच्या वयाच्या 75 व्या वर्षांपर्यंत
☑ कर्ज रकमेसाठी कमाल मर्यादा नाही
☑ सुलभ हप्ते आणि किफायतशीर व्याज दर
☑ कमी मासिक हप्त्यासाठी आपले कर्ज खाते आमच्याकडे स्विच ओव्हर करा
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
स्वच्छ अभियानाच्या यशासाठी आम्ही कटिबद्ध आहोत
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
स्वच्छता जिथे, आनंद तिथे!
• विनाकारण कचरा करू नका
• कचरा इकडे-तिकडे फेकू नका
• ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवा
• आपला परिसर स्वच्छ ठेवा
नियम व अटी लागू.
टोल फ्री नं.: 1800-233-4526 | नेट बँकिंग: https://www.mahaconnect.in

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

# सारस्वत बँक आता व्हॉट्सअॅपवर!

व्हॉट्सअॅपवर बँकिंगची सुविधा देणारी
पहिली सहकारी बँक.




रजिस्टर करण्यासाठी
९०२९०५९२७१ वर
मिस्ड कॉल द्या.

*अटी लागू.

सारस्वत बँक | 100 Years Young

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
देशातील सर्वात मोठी सहकारी बँक

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.